इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - २२१ ▸रविवार,ता.१४ डिसेंबर २०२५ ▸ पाने १२+४=१६ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

## सिडकोच्या घरांच्या किमतीत कपात

नागपूर,ता.१३–

नवी मुंबईतील सिडकोच्या वेगवेगळ्या प्रवर्गातील घरांसाठी सिडकोने जे दर निश्चित केले होते,त्यामध्ये थेट १० टक्के कपात करण्यात येत असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत निवेदनाद्वारे केली. या निर्णयामुळे आता ही घरे पूर्वीपेक्षा स्वस्त दरात उपलब्ध होणार असून नवी मुंबई परिसरात घर घेण्याचे सर्वसामान्यांचे स्वप्न अधिक सुकर होणार आहे. सिडकोतर्फे नवी मुंबईतील खारघर, वाशी, खारकोपर, तळोजा, उलवे, कळंबोली, कामोठे आणि पनवेल या परिसरात तब्बल १७ हजार घरे बांधण्यात आली आहेत.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव

BUY 2 GET 2 FREE
PETER ENGLAND
Raymond Levi's
USPA Pepe Jeans
VYANKATRAO HIGH SCHOOL ROAD,
ICHALKARANJI
9762951313, 9762778687

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

# साताऱ्यात कोट्यवधीचे एमडी ड्रग्ज जप्त

■ सातारा, ता.१३(प्रतिनिधी) –

सावरी (ता.जावली) येथे मुबंई क्राईम ब्रँचने छापा टाकून कोट्यवधी रुपयांचे एमडी ड्रग्ज जप्त केल्याने खळबळ उडाली आहे. पाच मंत्र्यांचा जिल्हा असलेल्या साताऱ्यात एमडी ड्रग्ज सापडल्याने कमालीची गुप्तता पाळली जात आहे. नेमके एमडी ड्रग्ज सापडले आहे का? असेल तर ते किती आहे? त्याचा साठा केला होता की त्या ठिकाणी बनविले जात होते, असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

- सावरीत शेडमध्ये छापा
- मुबंई पोलिसांची कारवाई
- तीन बंगालीसह स्थानिक ताब्यात
- कारवाईबाबत कमालीची गुप्तता
- पाच मंत्र्यांच्या जिल्ह्यातच ड्रग्ज सापडल्याने खळबळ

मिळालेल्या माहितीनुसार, मुबंई पोलिसांनी शनिवारी जावली तालुक्यातील निसर्गसंपन्न असणाऱ्या सावरी गावात छापेमारी केली असल्याची माहिती समोर आली आहे. सातारा पोलिसांना देखील या (पान २ वर)

सावरी येथील एका शेडमध्ये एमडी ड्रग्ज आढळून आले. ते बनवले जात होते की त्याचा साठा केला होता याबाबत पुढील तपास केल्यानंतर माहिती समोर येणार आहे. मुबंई,पुण्यातून ते सातारा (जावली) पर्यंत तपासाची चक्रे फिरून कारवाई केल्याने मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्ज आढळून आले असण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तवली जात आहे.

# सातारा–कागल राष्ट्रीय महामार्गाचे काम मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होणार

## ना.शिवेंद्रसिंहराजे भोसले

■ नागूपर,ता.१३–

सातारा –कागल राष्ट्रीय महामार्गाचे काम मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन निश्चित करण्यात आले आहे.या प्रकल्पातील एक संस्था अपेक्षित गतीने काम करत नसल्याचे निदर्शनास आले आहे.अशा ठेकेदाराला पंधरा दिवसांची अंतिम मुदत



देण्यात आली असून या कालावधीत समाधानकारक प्रगती न झाल्यास संबंधित ठेका रद्द करण्याचा निर्णय घेण्यात येईल,

### दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांना पंधरा दिवसांचा अल्टीमेटम

अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली.

सातारा– कागल राष्ट्रीय महामार्गासंदर्भात सदस्य अतुल भोसले यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम मंत्री (पान २ वर)

# ...तर मुख्य सचिवांवर हक्कभंग आणणार–नार्वेकर

■ नागपूर,ता.१३–

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन संपत आले तरी सदस्यांनी मांडलेल्या अनेक लक्षवेधींना अद्याप उत्तरे देण्यात आलेली नाहीत. भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी हा प्रश्न विधानसभेत उपस्थित केला.



त्यावर १४ डिसेंबरला सभागृहाची बैठक संपेपर्यंत या लक्षवेधींची प्रलंबित उत्तरे दिली नाहीत तर मुख्य सचिवांवर हक्कभंगाचा प्रस्ताव आणला जाईल असा इशारा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिला.

याविषयी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मांडलेला मुद्दा अगदी योग्य आहे. कोणत्याही अधिकाऱ्याला असे वाटत असेल की (पान २ वर)

# संसदेवरील हल्ल्याला चोवीस वर्षे पूर्ण

## राष्ट्रपती,पंतप्रधानांकडून शहीदांना श्रध्दांजली

■ नवी दिल्ली,ता.१३–

संसद भवनावरील दहशतवादी हल्ल्यास २४ वर्षे पूर्ण झाली. यावेळी शहीद झालेल्या जवानांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू,पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि गृहमंत्री अमित शहा यांनी श्रध्दांजली वाहिली.

१३ डिसेंबर २००१ रोजी जैश–ए–मोहम्मद आणि लष्कर–ए–तोयबाच्या पाच दहशतवाद्यांनी संसद भवनावर हल्ला केला होता. परंतू भारतीय सुरक्षा कर्मचाऱ्यांनी आपले प्राण धोक्यात घालून त्यांचे मनसुबे उधळून लावत त्या सर्वांना यमसदनी धाडले.दिल्ली पोलिसांच्या पाच कर्मचाऱ्यांनी,एका महिला कॉन्स्टेबलने (पान २ वर)



संसदेवरील हल्ल्यातील शहीदांना श्रध्दांजली वाहताना पंतप्रधान नरेंद्र मोदी शेजारी उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन.

## ज्वेलर्स दुकान फोडून नऊ लाखांचा ऐवज लंपास

■ ईश्वरपूर,ता.१३ (प्रतिनिधी)–

ताकारी (ता.वाळवा) कराड–तासगाव रस्त्यावरील बस स्थानकाजवळील राजारामबापू बँकेखाली असलेल्या महालक्ष्मी ज्वेलर्स या दुकानात अज्ञात चोरट्यांनी पाठीमागील भिंत फोडून प्रवेश करत सुमारे ९ लाख ३४ हजार ४५० रुपये किमतीचे सोन्या–चांदीचे दागिने व १० हजाराची रोकड लंपास केली.

याबाबत महेश हणमंत पाटील (वय ४२, व्यवसाय सराफ) यांनी ईश्वरपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. (पान २ वर)


# अमेडियाला दंडासह मुद्रांक शुल्क भरावा लागणार

■ पुणे,ता.१३–

मुंढवा येथील सरकारी जमीन घोटाळ्या प्रकरणी अमेडिया कंपनीने मुद्रांक शुल्कात घेतलेली सवलत बेकायदा ठरवत त्यांनी उर्वरित २० कोटी ९९ लाख ९९ हजार पाचशे रुपये दंडासह भरावेत, असा आदेश नोंदणी विभागाचे मुद्रांक जिल्हाधिकारी संतोष हिंगाणे यांनी दिला.

या आदेशामुळे 'अमेडिया'ला आता उर्वरित मुद्रांक शुल्काबरोबरच महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ३९ नुसार थकीत रकमेवर दरमहा एक टक्का दराने दंड म्हणून १ कोटी ४७ लाख रुपये भरावे लागणार आहेत.तसेच हे शुल्क भरण्यास विलंब झाल्यास दंडाच्या रकमेत दरमहा एक टक्का वाढ होत जाणार आहे, असेही त्यांनी या आदेशात स्पष्ट केले.मुद्रांक शुल्काच्या सवलतीसाठी अमेडिया कंपनीने उद्योग खात्याकडून इरादा पत्र मिळविले असले (पान २ वर)



(पान १ वरून)

## दंडास मुद्रांक शुल्क भरावे लागणार

तरी, त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेले जिल्हा उद्योग केंद्राचे ना हरकत प्रमाणपत्र त्यासोबत जोडलेले नव्हते.त्यामुळे ही सवलत बेकायदेशीर असल्याचे सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशात नमूद केले आहे.

## हक्कभंग आणणार-नार्वेकर

विधीमंडळाच्या पीठासीन अधिकाऱ्यांनी दिलेले निर्देश पाळणे बंधनकारक नाही, तर त्यावर कारवाई केली जाईल. रविवारी सभागृहाची बैठक संपेपर्यंत सभागृहाच्या पटलावर प्रलंबित लक्षवेधींची उत्तरे आली नाहीत तर मुख्य सचिवांवर हक्कभंगाची कारवाई केली जाईल, असा त्यांनी इशारा दिला.

## कोट्यवधीचे एमडी ड्रग्ज जप्त

कारवाई बद्दल गोपनीयता पाळली असल्याचे नवल वाटत आहे. कदाचित वरीष्ठ पातळीवर ही कारवाई असण्याचे तर्क लढवले जात असून साताऱ्यात याबद्दल चर्चांना उधाण आले आहे. कारवाईत कोट्यवधी रूपयांचे एमडी ड्रग्ज सापडले असल्याचे समजून येत आहे. मुबंई पोलिसांची कारवाई पूर्ण झाल्यानंतर नेमकी माहिती देण्यात येईल, असे सांगण्यात आले आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई महत्वपूर्ण मानली जात आहे.यामध्ये कोणाचा सहभाग आहे का? नेमके एमडी ड्रग्ज इथे आले कसे? कोणी साठा केला का?याबाबत कमालीची गुप्तता पाळली जात आहे. या कारवाईत तीन बंगाली कारागीरांसह एक स्थानिक अशा एकूण चार जणांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून कसून चौकशी सुरू आहे. कारवाईचे वृत्तांकन करताना देखील माध्यम प्रतिनिधींना अटकाव केला जात असून दुरून वृत्तांकन करण्यास पोलिसांकडून सांगितले जात आहे. मुंबई व पुण्यातील कारवाईनंतर थेट सातारा जिल्ह्यातील जावली तालुक्यातील सावरी गावात मुबंई पोलीस दाखल झाले. त्यांना सावरी गावात एमडी ड्रग्ज निर्मिती सुरू असल्याच्या संशयावरून तपासाची चक्रे वेगाने फिरवत त्यांनी पथकासह छापा टाकला आहे. कारवाईसंदर्भात नेमकी व अधिकृत माहिती देण्याबाबत गोपनीयता पाळली जात आहे.

## महामार्गाचे काम २०२६ पर्यंत पूर्ण होणार

शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले की, सातारा-कागल राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र सरकारच्या माध्यमातून, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने हाती घेण्यात आले असून सध्या हे काम प्रगती पथावर आहे. मात्र काही ठेकेदारांकडून कामात दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आले आहे.महामार्गाचे काम जलदगतीने पूर्ण व्हावे यासाठी यापूर्वीच केंद्रीय मंत्र्यांच्या कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर शुक्रवारी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सातारा-कागल महामार्गासंदर्भात आढावा बैठक घेतली. या बैठकीत या महामार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.कराड येथील मोठ्या पुलाचे काम सुमारे ८३ टक्के पूर्ण झाले असून, अप्रोच रोडसाठी आवश्यक असलेले भूसंपादन व अतिक्रमणाचे प्रश्न आता निकाली निघाले आहेत. त्यामुळे लवकरच पुलाचे उर्वरित कामही पूर्ण होणार असल्याचे यावेळी सांगितले.हा महामार्ग सातारा, उंब्रज,कराड,कोल्हापूर तसेच बंगळूरूकडे जाण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असून, कोकणात जाणाऱ्या वाहतुकीसाठीही मोठ्या प्रमाणावर वापरला जातो. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या दोन्ही स्तरांवरून या रस्त्याच्या कामावर विशेष लक्ष ठेवण्यात येत असून, काम वेळेत पूर्ण करण्यासाठी ठेकेदारांना कडक सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहितीही मंत्री भोसले यांनी दिली.

## नऊ लाखाचा ऐवज चोरीस

ही चोरी १२ डिसेंबर सायंकाळी ६ ते १३ डिसेंबर सकाळी १०.३० या कालावधीत झाली.शोकेसमधील सोन्याच्या चेन,मंगळसूत्राचे मणी, चांदीचे पैंजण,तोडे,वेढण,ब्रेसलेट,चेन,देवी-देवतांच्या मूर्ती आदी दागिने चोरट्यांनी चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गायकवाड करीत आहेत.

## निकालाआधीच पेणमध्ये स्ट्राँग रुम फोडली

■ रायगड,ता.१३-

**येत्या २१ डिसेंबरला नगरपंचायत आणि नगरपरिषद निवडणुकांची मतमोजणी होणार आहे. त्याआधीच सुरक्षा रक्षक आणि उमेदवारांच्या पहाऱ्यात असलेली स्ट्राँग रुम फोडल्याचा प्रकार रायगडच्या पेणमध्ये समोर आला. पण ही स्ट्राँग रुम कोणी माणसाने नाही तर चक्क उंदरांनी फोडल्याचा प्रकार स्ट्राँग रुममध्ये लावलेल्या सीसीटीव्हीत कैद झाला.**

शनिवारी पहाटेच्या सुमारास स्ट्राँग रूममध्ये ईव्हीएम मशिन ज्या कपाटावर ठेवल्या आहेत त्या लाकडी कपाटाचा दरवाजा उघडल्याने गोंधळ उडाला होता. मात्र सीसीटीव्ही फुटेजमध्ये उंदरांचा हा प्रताप उघडकीस आला आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.राज्यातील बहुतांश भागात ईव्हीएम स्ट्राँग रुमबाहेर विविध पक्षाच्या उमेदवारांसह कार्यकर्त्यांकडून कडक पहारा दिला जात असल्याचे चित्र आहे. अकोल्यातील अकोट, हिवरखेड, मूर्तीजापूर, बार्शी टाकळी आणि तेल्हारा या पाचही ठिकाणी कडक पोलीस बंदोबस्त आहे.अकोल्याच्या तापमानाचा पारा दहा अंशांच्या आसपास पोचला आहे, तर ग्रामीण भागातील तापमान दहा अंशाच्या खाली आहे. या कडाक्याच्या थंडीतही पोलीस डोळ्यात तेल घालून स्ट्राँग रुमाबाहेर कडक पहारा देत आहेत. २१ डिसेंबरला नगरपंचायतींच्या निवडणुकीची मतमोजणी होणार आहे, तोपर्यंत ईव्हीएममध्ये छेडछाड होऊ नये यासाठी जामर बसवण्याची मागणी विविध पक्षांच्या उमेदवारांनी केली.

# ट्रम्प यांच्या निर्णयाला अमेरिकेत विरोध

### वीस राज्यांनी नवीन एच-१बी व्हिसा शुल्क धोरणास दिले आव्हान

■ वॉशिंग्टन,ता.१३-



**डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाच्या नवीन एच-१ बी व्हिसा अर्जांवर शुल्क लादण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या २० अमेरिकन राज्यांनी खटला दाखल केला आहे. राज्यांचा असा युक्तिवाद आहे की, हे धोरण बेकायदेशीर आहे आणि अत्यावश्यक सार्वजनिक सेवांना धोका निर्माण करते.**

हे शुल्क गृह सुरक्षा विभागद्वारे लादले जाते.रुग्णालये,विद्यापीठे आणि शाळा यासारख्या संस्था उच्च कुशल परदेशी कामगारांना कामावर ठेवण्यासाठी क-१ बी व्हिसाचा वापर करतात. कॅलिफोर्नियाचे ॲटर्नी जनरल रॉब बोंटा यांनी सांगितले की, प्रशासनाकडे हे शुल्क लादण्याचा अधिकार नव्हता. ट्रम्प यांचे बेकायदेशीर शुल्क आर्थिक भार लादते आणि शिक्षण आणि आरोग्यसेवा यासारख्या क्षेत्रात कामगारांची कमतरता वाढवेल. ट्रम्प यांनी १९ सप्टेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या आदेशाद्वारे ही फी लागू केली. २१ सप्टेंबरनंतर दाखल केलेल्या एच-१बी अर्जांना हा नियम लागू होतो.

राज्यांचा आरोप आहे की, हे धोरण योग्य प्रक्रियेशिवाय लागू केले गेले असल्याने ते अमेरिकन कायदा आणि संविधानाचे उल्लंघन करते. अमेरिकेतील शाळा आणि रुग्णालये एच-१ बी व्हिसावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत.२०२४-२५ मध्ये, ७४ टक्के शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता असल्याचे नोंदवले गेले. आरोग्यसेवा क्षेत्रातही परिस्थिती गंभीर आहे.

२०२४ मध्ये, डॉक्टर आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांना अंदाजे १७,००० एच-१ बी व्हिसा जारी करण्यात आला. असा अंदाज आहे की २०३६ पर्यंत अमेरिकेला ८६,००० डॉक्टरांची कमतरता भासेल.ॲरिझोना, कोलोरॅडो, न्यू यॉर्क, न्यू जर्सी आणि वॉशिंग्टनसह १८ इतर राज्यांसह कॅलिफोर्निया आणि मॅसॅच्युसेट्सच्या ॲटर्नी जनरलनी हा खटला दाखल केला होता.एच-१ बी व्हिसा भारतीय व्यावसायिकांसाठी,विशेषतः तंत्रज्ञान, आरोग्यसेवा आणि संशोधन क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी देखील महत्त्वाचा आहे.

# श्री विठ्ठलाची पाद्यपूजा २१ ते ३१ डिसेंबरपर्यंत बंद राहणार



■ सोलापूर,ता.१३

**श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या पाद्यपूजेमूळे श्री विठ्ठलाचे दर्शन थांबू नये. नाताळ, एकादशी तसेच वर्षअखेरच्या सुट्ट्यांमुळे भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी होणार आहे.**

या भाविकांना जलद व सुलभ दर्शन मिळावे, यासाठी विठ्ठल-रुक्मिणी मातेची पाद्यपूजा सेवा २१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर कालावधीत बंद करण्यात येणार असल्याची माहिती श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून देण्यात आली.

डिसेंबर महिन्यात येणारा नाताळ, महिन्याची एकादशी तसेच नवीन वर्षाची सुरुवात विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनाने करण्यासाठी लाखोंच्या संख्येने भाविक येतात.तसेच, इतर सुट्ट्यांमुळे पंढरपूरला दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दी असणार आहे.या भाविकांना विनाविलंब दर्शन घेता यावे.तसेच,मंदिरातील व्यवस्थापन सुरळीत ठेवून भाविकांनाही याचा त्रास होऊ नये, म्हणून पाद्यपूजा तात्पुरत्या स्वरूपात २१ ते ३१ डिसेंबर या कालावधीत बंद ठेवण्यात आली आहे.याबाबतचा निर्णय मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी घेतला आहे.

# शिवराज पाटील-चाकूरकर यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

### लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह मान्यवरांनी घेतले अंत्यदर्शन

■ लातूर,ता.१३-

**जवळपास सहा दशके आपल्या सुसंकृत राजकारणाने जनसेवा करणारे लातूर जिल्ह्याचे सुपुत्र शिवराज पाटील-चाकूरकर यांच्या पार्थिवावर शनिवारी वरवंटी (ता.लातूर) येथे शासकीय इतमामात, मंत्रोच्चारात अंत्यसंस्कार करण्यात आले.**

यावेळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला,संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ,राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी यावेळी पुष्पचक्र अर्पण करून शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रध्दांजली वाहिली. तसेच पोलीस दलाच्या जवानांनी यावेळी बंदुकीच्या फैरींची सलामी देऊन मानवंदना दिली.

तत्पूर्वी सकाळी देवघर निवासस्थानी शिवराज पाटील यांच्या पार्थिवाला पोलीस दलातर्फे मानवंदना दिल्यानंतर अंत्ययात्रेला सुरुवात झाली.फुलांनी सजविलेल्या रथातून त्यांचे पार्थिव औसा रोड,छत्रपती शिवाजी महाराज चौक,पीव्हीआर चौकमार्गे वरवंटी येथे पाटील चाकूरकर कुटुंबियांच्या शेतामध्ये आणण्यात आले. याठिकाणी शोकाकुल जन समुदायाच्या उपस्थितीत शिवराज पाटील चाकूरकर यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उपस्थित विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शिवराज पाटील चाकूरकर यांचे पुत्र शैलेश पाटील चाकूरकर, स्नुषा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्यासह कुटुंबियांचे सांत्वन केले. कर्नाटकचे वनमंत्री ईश्वर खंड्रे,महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, खासदार डॉ. भागवत कराड, अखिल भारतीय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आदींनी यावेळी शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवाला पुष्पचक्र अर्पण करून श्रध्दांजली वाहिली.

*जळगाव,ता.१३-सोन्यासह चांदी दरात चढ उतार सुरूच असून आठवड्याच्या शेवटच्या दिवशी दोन्ही धातुंमध्ये घसरण झाली आहे. ऐन लग्नसराईच्या दिवसात सोन्याला उतरती कळा लागल्याने ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला.

## सैनिक टाकळीतील कृष्णा नदीत मगरीचा वावर

■ सैनिक टाकळी,ता.१३ (प्रतिनिधी) -



**येथील कृष्णा नदीत सुमारे सहा ते सात फूट लांबीची मगर पाण्यावर तरंगताना आढळली. सैनिक टाकळी -चंदूर पुलावरून जात असताना एका प्रवाशाने त्याचे मोबाईलमध्ये शूटिंग केले आहे. गेल्याच आठवड्यात दानवाड येथे झालेल्या मगरीच्या हल्ल्यात एकाने जीव गमावला होता. यामुळे स्थानिक शेतकऱ्यांसह मच्छीमारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. आहे.**

दरम्यान, टाकळी ते अकिवाट ओतात मोठ्या प्रमाणात मगरींचा वावर असल्याचे स्थानिक नागरिकांचे मत आहे. यामुळे शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता निर्माण झाली आहे. मगरीच्या वावरामुळे नदीमधील विद्युत मोटरीची देखभाल दुरुस्ती करताना शेतकऱ्यांच्या जीवावर बेतू शकते. शेतकऱ्यांना पाणवठ्या जवळील शेतात काम करताना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला देण्यात आला आहे. मगरीला सुरक्षितपणे पकडण्यासाठी आणि स्थलांतरित करण्यासाठी स्थानिक अधिकारी आणि वन्यजीव तज्ञांनी हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

# संसदेवरील हल्ल्याला चोवीस वर्षे पूर्ण

(पान १ वरून)

आणि दोन सुरक्षा रक्षकांनी अंतिम बलिदान दिले.या शहीदांना आठवून राष्ट्रपती म्हणाल्या, २००१ मध्ये या दिवशी आपल्या संसदेचे रक्षण करताना आपले प्राण अर्पण करणाऱ्या शूर वीरांना राष्ट्र सलाम करते.त्यांचे शौर्य आणि कर्तव्याप्रती असलेली निष्ठा आपल्या राष्ट्रीय भावनेला प्रेरणा देत राहील. राष्ट्र त्यांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे कायमचे ऋणी राहील. या दिवशी,आम्ही सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुध्द लढण्याच्या भारताच्या वचनबध्दतेची पुष्टी करतो.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेवरील दहशतवादी हल्ल्यात आपले प्राण अर्पण करणाऱ्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना श्रध्दांजली वाहिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, या दिवशी आपला देश २००१ मध्ये आपल्या संसदेवर झालेल्या भीषण हल्ल्यात प्राण गमावलेल्या वीरांचे स्मरण करतो.गंभीर धोक्याच्या प्रसंगी त्यांचे धैर्य, सतर्कता आणि अतूट कर्तव्यनिष्ठा वाखाणण्यासारखी होती. त्यांच्या सर्वोच्च बलिदानाबद्दल भारत सदैव कृतज्ञ राहील.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले, संसद भवनावरील भ्याड दहशतवादी हल्ल्यात अतूट ढाल म्हणून उभे राहिलेल्या शूर सुरक्षा कर्मचाऱ्यांना आम्ही मनापासून श्रध्दांजली वाहतो.त्यांनी आपल्या लोकशाहीच्या आत्म्याचे रक्षण करण्यासाठी आपले प्राण अर्पण केले.त्यांचे धैर्य, सर्वोच्च बलिदान आणि कर्तव्याची अटळ भावना नेहमीच राष्ट्राच्या चेतनेत जिवंत राहील आणि भारताच्या संकल्पाला प्रेरणा देईल.

गृहमंत्री शहा म्हणाले, आजचा दिवस हा दहशतवादाविरुध्दच्या लढाईत आपल्या सुरक्षा दलांच्या अदम्य धैर्याचे आणि पराक्रमाचे पुन्हा एकदा स्मरण करण्याचा दिवस आहे. २००१ मध्ये, त्यांच्या दृढनिश्चयाने आणि आत्म्याने,त्यांनी जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे मंदिर असलेल्या आपल्या संसद भवनावर झालेला भ्याड दहशतवादी हल्ला उधळून लावला. दहशतवाद्यांना योग्य उत्तर देताना शहीद झालेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो. या शूर योद्ध्यांच्या बलिदानाचे आणि हौतात्म्याचे हे राष्ट्र नेहमीच ऋणी राहील.

## राशिवडेत पाच एकरातील ऊस जळाला

■ राशिवडे,ता.१३(प्रतिनिधी)-

**येथील तांबोळ नावाच्या शेताजवळील सहा शेतकऱ्यांचा पाच एकर क्षेत्रामधील ऊस जळुन खाक झाला.यात सुमारे सात लाखांचे नुकसान झाले.ही घटना दुपारी शनिवारी तीनच्या दरम्यान घडली.आगीचे नेमके कारण समजले नाही.**

तांबोळ नावाच्या शेताजवळ अमर विलासराव पाटील यांचे दीड एकर ऊसक्षेत्र,योगेश रामचंद्र डकरे,संजय महादेव डकरे,संभाजी तापेकर,भिकाजी चापेकर,बाळासो पाटील- हेरवाडे यांचे मिळुन साडेतीन एकर ऊसक्षेत्र आहे. दुपारी तीनच्या दरम्यान अचानक ऊसाला आग लागल्याचे निदर्शनास आले.त्यानंतर आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.

परंतु ऊसाला आग लागल्याची माहिती वेळाने मिळाल्याने आग नियंत्रणात आणता आली नाही.भोगावती कारखान्याच्या अग्निशामक दलाने आग विझविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले.पाच एकरातील सर्व ऊस जळुन खाक झाल्याने सुमारे सात लाखांचे नुकसान झाले.

## ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

■ मिरज,ता.१३(प्रतिनिधी)-

**म्हैसाळ ते कागवाड रोडवर वीट भट्टी समोर ट्रॅक्टरने दुचाकीला विरुद्ध दिशेने समोरून धडक दिल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. कृष्णा वनमोरे (रा. म्हैसाळ) असेया अपघातातील जखमीचे नाव आहे. वनमोरे यांचे शेजारी राजू हनुमंत तुपे (राहणार म्हैसाळ) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे.**

कृष्णा वनमोरे हे त्यांच्या दुचाकी (एमएच १० एव्ही ८७२८) वरून कागवाड कडून म्हैसाळच्या दिशेने येत होते. यावेळी ट्रॅक्टर (एम एच ४४ एस १४५७ )च्या चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून ट्रॅक्टर चालवून वनमोरे यांच्या दुचाकीला रस्त्यावर विरुद्ध दिशेने समोरून धडक दिली. यात वनमोरे हे गंभीर जखमी झाले असून दुचाकीचेही नुकसान झाले आहे. अपघातानंतर जखमीस कोणतीही मदत न करता घटनास्थळावरून ट्रॅक्टर चालक पळून गेला.

## शिवराज पाटील यांना विधानपरिषदेत श्रध्दांजली

**नागपूर,ता.१३-** लोकसभेचे माजी अध्यक्ष, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील यांच्या निधनाबद्दल त्यांना विधान परिषदेत श्रध्दांजली वाहण्यात आली.सभापती प्रा. राम शिंदे यांनी या संदर्भातील शोक प्रस्ताव विधान परिषदेत मांडला.दिवंगत पाटील यांनी त्यांच्या कारकिर्दीत नगराध्यक्ष,उपमंत्री,महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष,अध्यक्ष, केंद्रीय राज्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री,लोकसभा उपाध्यक्ष,अध्यक्ष आणि पंजाब राज्याचे राज्यपाल अशा पदांची जबाबदारी पार पाडली असल्याचे सभापती प्रा. शिंदे यांनी दिवंगत शिवराज पाटील यांच्या स्मृतींना उजाळा देताना सांगितले.

## युवकाची आत्महत्या; सासूसह दोघींवर गुन्हा

■ सांगली, ता.१३ (प्रतिनिधी)-

**सांगलीतील साखर कारखाना परिसरातील चेतन बाळासाहेब माळी (वय २८, रा.चव्हाण चाळ, शांतिनिकेतन जवळ) याच्या आत्महत्येप्रकरणी सासू संगीता महेश कांबळे (वय ४५), सासूची आई निर्मला होवाळे (वय ६२, रा. शामनगर, कुपवाड) या दोघींविरूद्ध संजयनगर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. चेतनची आई उमा बाळासाहेब माळी (वय ४५, रा. साखर कारखाना वसाहत) यांनी फिर्याद दिली आहे.**

चेतन माळी याचा पूर्वी हिच्याशी विवाह झाला होता. विवाहानंतर पूर्वीची आई संगीता व आजी निर्मला या दोघी घटस्फोट घेण्यासाठी पूर्वी हिच्यावर दबाव आणत होत्या. पूर्वीने हा प्रकार चेतनला सांगितल्यानंतर तो चिंतेत होता. त्याला मानसिक त्रास होऊ लागला. त्यातूनच त्याने राहत्या खोलीत लाकडी तुळईस ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने चिठ्ठी लिहिली होती. त्यामध्ये त्याने सासू संगीता व तिची आई निर्मला या दोघी पूर्वीवर घटस्फोट घेण्यासाठी दबाव आणत होत्या. माझ्या आत्महत्येला त्या दोघीच कारणीभूत असतील. त्यांच्यामुळे मानसिक त्रास झाला असून त्यामुळेच मी आत्महत्या करत आहे. आत्महत्येनंतर मला न्याय मिळावा, असेही चिठ्ठीत लिहिले होते. ही चिठ्ठी चेतन याने भावाची पत्नी सानिका यांना दिली होती. सानिका हिने ही चिठ्ठी चेतनच्या आई उमा यांना दिली.

## स्कूल बसच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

■ मिरज,ता.१३(प्रतिनिधी)-

**मिरज-सांगली रोडवर सेवासदन हॉस्पिटल जवळ स्कूल बसने धडक दिल्याने दुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना घडली. महात्मा गांधी चौक पोलिसांत स्कूल बस चालक अनिल नेमा माने (वय ४३, रा. गवळीवाडी रोड, खंडेराजुरी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. जखमी रमेश केशव गाडगे (वय ५८, रा. होळी कट्टा, मंगळवार पेठ, मिरज) यांनी फिर्याद दिली.**

गाडगे हे त्यांच्या दुचाकी (एमएच १० इएफ ६९५९) वरून सांगलीतून मिरजकडे येत होते. यावेळी स्कूलबस (एमएच ०९ एफएल ४४६९)च्या चालकाने त्याच्या ताब्यातील स्कूलबस रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवून ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात गाडगे यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात गाडगे हे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर घटनास्थळी न थांबता बस घेऊन घटनास्थळावरून निघून गेल्याची नोंद पोलिसात झाली आहे.

इक्कीसवाँ पुण्यस्मरण



स्व. भंवरलालजी शंकरलालजी सोनी
(स्वर्गवास, दि. १४/१२/२००४)

हमारी यादों मे आप जिंदा हो बाबुजी ।
आपने समर्पित कर दिया अपने परिवार को जीवन सारा ।
आज भी वो पल याद है । लगता है जैसे कल की ही बात है ।
मेहनत हमारी जारी रहेगी, रोशन करते हुए आपका नाम ।
हम सभी विनम्र हृदय से अर्पित करते है श्रद्धांजली ।

- भाई : रामअवतार, श्यामसुंदर, रामप्रताप, रामस्वरुप
- पुत्र : सत्यनारायण, रामगोपाल ■ पुत्रवधु : सौ.उमा, सौ.राधा
- पुत्रीया : सौ.यशोदा लट्ुरिया,सौ. प्रेम भराडिया, श्रीमती ललिता भांगडिया
- सौ. संतोष तोष्णीवाल, सौ. सुनिता मानधना
- सुपौत्र : रविकुमार, सर्वेश्वर ■ सुपौत्र वधु : सौ. मोना, डॉ.सौ.अंशू
- सुपौत्री : सौ.रिना बियाणी, सौ. पायल जागेटिया, सौ. मीनल जाखोटिया
- पडपौत्री : पलक,कनक,अनवेशा,पारमी,शार्वी सोनी
- पडपौत्र : कुंज सोनी

एवं समस्त सोनी परिवार, इचलकरंजी.

# केरळमध्ये भाजपाचा ऐतिहासिक विजय; तिरुवनंतपुरम महापालिकेत सत्तांतर

### पंतप्रधानांकडून जनता आणि भाजपा कार्यकर्त्यांचे अभिनंदन

■ नवी दिल्ली,ता.१३-

**केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपाने ऐतिहासिक कामगिरी करत राज्याच्या राजकारणात मोठा बदल घडवून आणला आहे.आतापर्यंत केरळमध्ये नाममात्र अस्तित्व असलेल्या भाजपाने थेट राज्याची राजधानी असलेल्या तिरुवनंतपुरम महानगरपालिकेत दणदणीत विजय मिळवत तब्बल ४५ वर्षांपासून सुरू असलेली डाव्या पक्षांची सत्ता संपुष्टात आणली आहे.**

तिरुवनंतपुरम महानगरपालिकेतील एकूण १०१ जागांपैकी १०० जागांसाठी मतदान झाले होते. या १०० जागांपैकी भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएने ५० जागांवर विजय मिळवला आहे.डाव्या पक्षांची आघाडी असलेल्या एलडीएफला केवळ २९ जागांवर समाधान मानावे लागले तर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफ १९ जागांसह तिसऱ्या क्रमांकावर राहिली. उर्वरित २ जागांवर अपक्ष उमेदवारांनी विजय मिळवला. या निकालामुळे तिरुवनंतपुरम महानगरपालिकेत एनडीएची सत्ता येणे जवळपास निश्चित झाले आहे.

तिरुवनंतपुरम महानगरपालिकेवर अनेक दशकांपासून डाव्या पक्षांचे वर्चस्व राहिले आहे. तसेच तिरुवनंतपुरम लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर सातत्याने निवडून येत आहेत. मात्र गेल्या काही वर्षांत भाजपाने या भागात आपला जनाधार वाढवत डावे पक्ष आणि काँग्रेसचे राजकीय वर्चस्व मोडून काढले असून, या विजयाला केरळच्या राजकारणातील एक महत्त्वाचे वळण मानले जात आहे.

**केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप आणि एनडीए उमेदवारांना पाठिंबा दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत पंतप्रधानांनी मतदारांचे आभार मानले. ते म्हणाले की, केरळमधील लोक यूडीएफ आणि एलडीएफला कंटाळले आहेत आणि त्यांना एनडीए हाच एक 'विकसित केरळ' बांधण्याचा एकमेव पर्याय वाटतो.ज्यामध्ये सुशासन आणि सर्वांसाठी संधी उपलब्ध आहेत.**

या ऐतिहासिक यशानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिरुवनंतपुरमच्या जनतेचे आणि भाजपाच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले आहे. 'एक्स'वरून प्रतिक्रिया देताना त्यांनी धन्यवाद तिरुवनंतपुरम! असे म्हणत या जनादेशाला केरळच्या राजकारणातील ऐतिहासिक बदल असे संबोधले. राज्याच्या विकासाच्या आकांक्षा केवळ भाजपाद्वारेच पूर्ण होऊ शकतात, याची जाणीव जनतेला झाली असल्याचे नमूद करत, तिरुवनंतपुरम शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी एनडीए कटिबध्द राहील, असे आश्वासनही पंतप्रधान मोदी यांनी दिले आहे.

पंतप्रधानांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या भूमिकेचे कौतुकही केले. ते म्हणाले, लोकांमध्ये काम करणाऱ्या आणि हा उत्कृष्ट निकाल मिळवून देणाऱ्या सर्व मेहनती भाजप कार्यकर्त्यांचे मी आभार मानतो.आजचा दिवस केरळमध्ये तळागाळात पिढ्यानपिढ्या लढणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कामाचे आणि योगदानाचे स्मरण करण्याचा आहे, ज्यामुळे हा ऐतिहासिक निकाल शक्य झाला आहे. आमचे कार्यकर्ते आमची ताकद आहेत आणि आम्हाला त्यांचा अभिमान आहे.

# राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये २३८ प्रकरणे निकालात

## ५ कोटी ४२ लाख ६५ हजार २८२ रूपयांची वसुली

इचलकरंजी,ता.१३–

**हातकणंगले तालुका विधी सेवा समिती इचलकरंजीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश जे. एल. गांधी व जिल्हा न्यायाधीश एम. ए. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये दाखलपूर्व आणि न्यायालयात प्रलंबित अशी २३८ प्रकरणे निकालात काढण्यात आली. त्यातून ५ कोटी ४२ लाख ६५ हजार २८२ रुपयांची वसुली करण्यात आली.**



लोकअदालत प्रसंगी जिल्हा न्यायाधीश जे. एल. गांधी, न्यायाधीश एम. ए. भोसले, न्यायाधीश जी.एम.नदाफ, बार असो.चे अध्यक्ष आर.आर.तोष्णीवाल व अन्य मान्यवर

या लोकअदालतीमध्ये ग्रामपंचायत, वीजवितरण कंपनी आणि बँकांची दाखलपूर्व २५८० व न्यायालयातील प्रलंबित असलेली ३१५३ प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. त्यातील दाखलपूर्व प्रकरणातील ३१ व न्यायालयातील प्रलंबित प्रकरणापैकी २०७ प्रकरणे अशी एकूण २३८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. लोकअदालतीसाठी एकूण ६ पॅनेल ठेवण्यात आले होते. त्यामध्ये जिल्हा न्यायाधीश एम. ए. भोसले, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर जी. एम. नदाफ, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आर.डी. खराटे. दूसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर डॉ. डी. बी. साठे, चौथे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ए. आर. कुलकणी, पाचवे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर एम. एस. गावडे यांनी पॅनेल प्रमुख म्हणून काम पाहिले. तसेच न्यायालयातील पॅनेल सदस्य म्हणून विधीज्ञ सुहेलखान रोहिले, सुकाश बनसोडे, गोपाल लाहोटी, सुरजित नावर, वर्षाराणी चौगुले, मृणाल देशिंगकर यांनी काम पाहिले.

लोकअदालत यशस्वी होण्यासाठी इचलकरंजी न्यायालयातील पॅनेलवर नेमलेले न्यायाधीश, इचलकरंजी वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. राजगोपाल तोष्णीवाल, उपाध्यक्ष राजाराम सुतार, सचिव अभिजीत माने, सहसचिव आदित्य मुदगल, खजिनदार विजय शिंगारे, राहूल काटकर, शैलेंद्र रजपूत, महेश कांबळे व महिला प्रतिनिधी विधीज्ञ दिपाली हणबर, तसेच वकील संघटनेचे सदस्य, वार असोसिएशनचे लिपीक प्रवीण फगरे, दत्ताजीराव कदम लॉ कॉलेज (इचलकरंजी)च्या प्राचार्या डॉ. सी. एस. बागडी, ॲड. ऐश्वर्या पाटील, असिस्टंट प्रोफेसर व विद्यार्थी, हातकणंगले तालुका विधी सेवा समिती (इचलकरंजी)चे ज्ञानेश्वर मिरजकर व सर्व न्यायालयीन कर्मचारी व पक्षकार यांचे सहकार्य लाभले.

### श्री शंभुतीर्थ लोकार्पण सोहळ्यानिमित्त

# इचलकरंजीतील मुख्य मार्गावरील वाहतुकीत बदल

इचलकरंजी,ता.१३–

**इचलकरंजी येथे कॉ. मलाबादे चौकात साकारण्यात आलेल्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अर्थात श्री शंभुर्तीर्थचा लोकार्पण सोहळा सोमवारी १५ डिसेबर रोजी मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील मुख्य मार्गावरील वाहतूक मार्गामध्ये १५ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत बदल करण्यात आला आहे.**



श्री. शंभूतिर्थाचा लोकार्पण सोहळा सोमवारी १५ रोजी होत असून सोहळ्यानिमित्त मुख्य रस्त्यावर दुतर्फा विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. त्यामुळे परिसर उजळून निघाला आहे. (छाया. – अनंतसिंग)

कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे तसेच वाहतूक सुरळीत राहावी यासाठी कोल्हापूर पोलीस प्रशासनाने तात्पुरते वाहतूक बदल लागू केले आहेत. पोलीस अधीक्षक योगेश कुमार यांनी हा आदेश जारी केला आहे.

वाहतुकीस बंद असलेले प्रमुख मार्ग व पर्यायी मार्ग छ. शाहू महाराज पुतळा (कोल्हापूर–कबनूर मार्ग) या मार्गानि इचलकरंजी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारची वाहने छ. शाहू महाराज पुतळा, इंडस्ट्रीयल इस्टेट, पंचवटी टॉकीज मार्ग–शहर अशी राहिल. नदीवेस नाका इकडून छ. संभाजी चौक येथून शिवतीर्थकडे जाणारी वाहतूक छत्रपती संभाजी चौक–डी मार्ट मार्ग–तीन बत्तीचौक मार्गे अशी राहिल. राजवाडा चौकातून गांधी पुतळा व जनता चौक मार्गावरील वाहतूक महासत्ता चौक–थोरात चौक मार्गे राहिल. हातकणंगले मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून शिवतीर्थकडे येणारी वाहतूक इंडस्ट्रीयल इस्टेट–थोरात चौक मार्ग अशी राहिल. त्याचबरोबर शंभुतीर्थ मुख्य कार्यक्रम मार्गावर येणारे सर्व छोटे–मोठे रस्ते तात्पुरते बंद राहणार आहेत. कार्यक्रम कालावधीत येण्या–जाण्याच्या सर्व प्रकारच्या वाहनांवर निर्बंध असणार असून अत्यावश्यक सेवा वाहनांना परिस्थितीनुसार मुभा असणार आहे. नागरिकांनी वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे, पर्यावी मार्गाचा वापर करावा व प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक योगेशकुमार यांनी केले आहे.

**वाहन पार्किंगची सोय किसनराव आवळे मैदान, नामदेव भवन मैदान, महासत्ता चौक रिंगरोड ,महापालिका खुली जागा, व्यंकटराव हायस्कूल मैदान आणि कै. शिवाजीराव खवरे भाजी मार्केट याठिकाणी करण्यात आली आहे. लोकार्पण सोहळ्यासाठी येणाऱ्या वाहनधारकांनी याचठिकाणी वाहने पार्किंग करून सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक पल्लवी पाटील यांनी केले आहे.**

# मद्यप्रशान करून वाहन चालविणाऱ्या चौघांवर गुन्हा

इचलकरंजी,ता.१३–

**शहरातील शिवतीर्थ परिसरात शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्यावतीने करण्यात आलेल्या कारवाईत मद्यप्रशान करून वाहन चालविणाऱ्या चौघांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. प्रविण दंडाप्पा कमते (वय २९ रा. नाईट कॉलेजसमोर), अकबर सलीम मुजावर (वय ३६ रा. पिराचा माळ ,गावभाग), मुबारक रखीदीन सनदी (वय ४२ रा. सनदी मळा) आणि विरुपाक्ष राजू बडके (वय ३० रा. संकणवाडी) अशी त्यांची नांवे आहेत.**

श्री शिवतीर्थ परिसरात मद्यप्राशन करून दुचाकी ( एमएच ०९ इइ ७४४० ) वरून जाताना प्रविण कमते हा मिळून आला.पोलिस कॉन्स्टेबल सुर्यकांत गायकवाड यांनी फिर्याद दिली आहे. तर याच परिसरात मद्यप्राशन करून दुचाकी (एमएच ०९ इएक्स ५६४८) चालविणाऱ्या मुबारक सनदी याच्या विरुध्द पोलिस कॉन्स्टेबल मनोज काळे यांनी फिर्याद दिली आहे.

तसेच विरुपाक्ष बुडके हा मद्यप्राशन करून ट्रॅक्टर (केए २३ टीडी ८२५७) चालविताना मिळून आल्याने पोलिस कॉन्स्टेबल सुरेश कांबळे यांनी फिर्याद दिली आहे.

तर हत्ती चौक परिसरातील मुख्य रस्त्यावर अकबर मुजावर हा मद्यप्राशन करून दुचाकी ( एमएच ५१ इ ३८९६) चालविताना मिळून आल्याने पोलिस कॉन्स्टेबल अर्जुन कोकाटे यांनी फिर्याद दिली आहे.

## हातभट्टी विक्री करणाऱ्या महिलेवर गुन्हा दाखल

इचलकरंजी,ता.१३ –

**विनापरवाना बेकायदेशीरित्या हातभट्टी दारुची विक्री केल्या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात कविता सुरज बागडी (वय ४५ रा. रेणुकानगर झोपडपट्टी) या महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल माधुरी पुंडलिक भारमल यांनी फिर्याद दिली आहे.**

पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, रेणुकानगर झोपडपट्टी येथील कविता बागडी ही बेकायदेशीररित्या हातभट्टी दारूची विक्री करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर शिवाजीनगर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत १८०० रुपयांची १८ लिटर हातभट्टी दारू जप्त करण्यात आली आहे.तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल कौलगे करीत आहेत.

## दुचाकी चोरट्यांना अटक

मिरज,ता.१३(प्रतिनिधी)

**दुचाकी चोरणाऱ्या दोघांना गांधी चौकी पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून २ लाख ४० हजार किमतीच्या चार गाड्या जप्त करण्यात आल्या.**

आयुब अब्दुलरशीद मन्ना (वय ३४), संदीप सूर्यकांत येलूरकर (वय ३८, दोघेही रा. नम्रता कॉलनी, बुधगांव, ता. मिरज) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. दोन युवक कोल्हापूर रस्ता परिसरातील एका मंगल कार्यालयाजवळ चोरीच्या दुचाकी विक्रीसाठी येणार असल्याची माहिती प्रभारी सहायक निरीक्षक संदीप शिंदे यांना मिळाली.

# लग्नाच्या आमिषाने अल्पवयीन मुलीवर बलात्कार

सांगली, ता.१३ ( प्रतिनिधी)–

**लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर बलात्कार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. पीडिता गर्भवती असून तिने संशयीत रोहित चव्हाण ( रा.समतानगर, वेअर हाऊसनजिक गल्ली नं.९, मिरज) याच्या विरोधात सांगली शहर पोलिसांत फिर्याद दिली आहे. चव्हाण याच्याविरुध्द बलात्कार आणि पोक्सो कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हा दाखल झाला आहे.**

पीडिता ही अल्पवयीन आहे. ती शहरातील एका भागात रहात असतानाच संशयीत रोहित चव्हाण याच्याशी तिची ओळख झाली होती. त्या ओळखीचा फायदा घेत त्याने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर तिला लग्नाचे अमीष दाखवून मार्च २०२५ मध्ये आपल्या सोबत नेले. शहरातील एका उपनगरात स्वतंत्र रुम घेतली. त्या ठिकाणी त्याने १२ डिसेंबर पर्यंत तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबध ठेवले.

# चोरीचा छडा : आठ लाखाचे दागिने हस्तगत

सांगली, ता.१३ (प्रतिनिधी)–

**स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी कवठेमहांकाळ तालुक्यातील कुची येथील चोरीचा छडा लावला आहे. याप्रकरणी प्रविण विठ्ठल निकम (वय ३२, रा. कुची, ता. कवठेमहांकाळ) याला अटक करण्यात आली असून त्याने चोरलेले ७ लाख ८० हजार रुपयांचे सोन्या–चांदीचे दागिने जप्त करण्यात आल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक संजीव झाडे यांनी दिली आहे.**

कुची येथील सुरेखा अण्णासो पाटील यांचे कुटुंब ८ डिसेंबर रोजी परगावी गेले होते. ते दुसऱ्या दिवशी घरी परतल्यानंतर त्यांना घराचे कुलूप तोडून आतील दागिने चोरीला गेल्याचे लक्षात आले. त्यांनी याबाबत कवठेमहांकाळ पोलिसांत चोरीची नोंद केली.

या गुन्ह्याचा तपास करुन संशयिताला जेरबंद करण्याच्या सुचना पोलीस निरीक्षक झाडे यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज पवार यांच्या पथकाला दिल्या होत्या. चोरट्याचा शोध सुरु असतानाच पथकातील पोलीस अंमलदार संदीप नलावडे, सोमनाथ गुंड आणि अमीरशहा फकीर यांना एकजण तानंग फाटा परिसरात दागिने विक्रीसाठी घुटमळत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तात्काळ सापळा लावून संशयित प्रविण निकम याला ताब्यात घेतले. त्याच्या अंगझडतीत सोन्याचे साखळीत पदक असलेले चार तोळे वजनाचे गंठण, दोन तोळ्याचा सोन्याचा लक्ष्मीहार, मिनी गंठण, सोन्याची अंगठी आणि चांदीचे दागिने सापडले.

अधिक चौकशीत त्याने कुची येथे नातेवाईकांच्या घरी चोरी केल्याची कबुली दिली. नातेवाईक घराला कुलुप लावल्यानंतर त्याची चावी कुठे ठेवतात, याची माहिती असल्याचा फायदा घेत संशयित प्रविण निकम याने चोरी केल्याचे उघडकीस आले आहे. चोरट्याला कवठेमहांकाळ पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

आमचे नेते जेष्ठ मार्गदर्शक श्री हालसिध्दनाथ सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन,श्री लोककल्याण सौहार्द संस्थेचे संस्थापक चेअरमन
मा.श्री.एम.पी. पाटील आण्णा यांच्या
75 अमृत महोत्सवी वाढदिनी
हार्दिक शुभेच्छा



मा.श्री.एम.पी.पाटील

शुभेच्छुक
श्री.बजरंग विश्वनाथ पाटील–चेअरमन
श्री.प्रशांत मलगोंडा पाटील– व्हा. चेअरमन

श्री. सिद्धू नागाप्पा नराटे, श्री.मधुकर महादेव जासूद,श्री.कृष्णराजसागर रामचंद्र जबडे, श्री.रायगोंडा आनंत पाटील,श्री.वसंत जोती जबडे,श्री.अण्णासाहेब भिमगोंडा खोकाटे, सौ.संगीता संतोष शिरोळे,सौ.वैशाली वैभव जबडे,श्री.किशोर पुंडलिक कांबळे तसेच सेक्रेटरी व सभासद वर्ग.

शेतकरी विवि.विविदोध्देश प्राथमिक ग्रामीण कृषी सहकारी संघ नि. जत्राट

WARANA UNIVERSITY
Waranangar, Kolhapur
Tatyasaheb Kore Institute of Engineering and Technology
(Lead Institute of Warana University)
Tatyasaheb Kore College of Pharmacy
(Constituent Institute of Warana University)
Tal. - Panhala, Dist.- Kolhapur -416113 (Maharashtra)

WALK-IN-INTERVIEW

Eligible candidates are invited for walk in interview for the following posts:

| Designation | Programme |
| --- | --- |
| Professor, Associate Professor, Assistant Professor | Computer Sci. & Engineering |
| | Computer Sci. & Business Systems |
| | Computer Sci. & Engg.-AIML |
| | Cyber Security |
| | M.Pharm. (Pharmacognosy) |
| | M.Pharm. (Pharmaceutical Chemistry) |
| | M.Pharm. (Pharmacology) |

**Note:** Qualification for the above posts is as per AICTE norms and Pharmacy Council of India. The interested candidates should report:

**Date :** 21th December 2025, Time: 10:00am onwards
**Venue:** Institute of Engineers, Local Centre, Nehru Nagar, Belgavi

**Date :** 22th December 2025, Time: 10:00am onwards
**Venue :** Warana University Campus

Contact: +91 7058565499

Dr. V. V. Karjinni
Chief Executive Officer
SWVSM, Warananagar

Dr. Vinayraoji Kore
Chairman, Warana Group of Industrial & Educational Complex

# महिला प्रवाशाची रोकड लांबविली

इचलकरंजी,ता.१३–

**येथील मध्यवर्ती बसस्थानकात एस. टी. मध्ये चढत असताना चोरट्यांनी महिलेच्या सॅकमधील पर्स लांबविली. त्यामध्ये रोख रकमेसह साहित्य मिळून १५ हजार ६५० रुपयांचा ऐवज चोरीस गेला आहे. या प्रकरणी रुपाली संजय जाधव (वय ५७ रा. कळंबा, कोल्हापूर) यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.**

याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, रुपाली जाधव या नोकरीच्या निमित्ताने इचलकरंजीत येतात. शुक्रवारी सायंकाळी काम संपल्यानंतर त्या कोल्हापूरला जाण्यासाठी येथील मध्यवर्ती बसस्थानकात आल्या होत्या. एस.टी.मध्ये चढ़त असताना गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी त्यांनी पाठीला अडकविलेल्या सॅकची चेन उघडून त्यामधून पर्स लांबविली. या पर्समध्ये साडेआठ हजार रुपये तसेच महत्वाचे साहित्य असा साडेपंधरा हजार रुपयांचा मुद्देमाल होता.

## दोन गटात मारामारी

मिरज,ता.१३(प्रतिनिधी)

**बेडग येथे आर्थिक व्यवहाराच्या वादातून दोन गटात मारामारी झाली.**

याप्रकरणी संभाजी चवदार (वय ६०, रा. मरगुबाई चौक, बेडग) यांनी शंकर खाडे, प्रवीण खाडे, प्रदीप खाडे, राहुल खाडे, शशिकांत धोंड (सर्व रा.बेडग) याच्यांविरुद्ध तर शंकर खाडे (वय ६३, रा. बेडग) यांनी संभाजी चवदार, चैतन्य चवदार, गजानंद ओंबासे व अन्य दोन अनोळखी व्यक्तीविरुद्ध फिर्याद दिली

आमचे नेते जेष्ठ मार्गदर्शक श्री हालसिध्दनाथ सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन,श्री लोककल्याण सौहार्द संस्थेचे संस्थापक चेअरमन
मा.श्री.एम.पी.पाटील आण्णा यांच्या
75 अमृत महोत्सवी वाढदिनी
हार्दिक शुभेच्छा..



शुभेच्छुक
श्री.सुधाकर सिध्दू कब्बुरे चेअरमन

सदस्यः–श्री.महादेव मनगेनी खिलारे(जत्राट), श्री.आण्णासाहेब नागु नराटे,(जत्राट) श्री.मल्लू बिरा कब्बुरे(जत्राट), शिंगाडी लक्ष्मण खिलारे (जत्राट), श्री. कल्लाप्पा सिध्दू खिलारे, श्री.सुरेश सत्याप्पा भानसे(सौंदलगा), श्री. सोमराया मनगेनी यमगर (अमलझरी), सौ. गंगुबाई सदाशिव खिलारे (जत्राट), सौ. मंगल सुभाष खिलारे (जत्राट) श्री.रविंद्र धर्माजी मेस्त्री (जत्राट), श्री.शिवगेणी कलाप्पा झुणके सेक्रटरी(जत्राट), सर्व सभासद, कर्मचारी वर्ग

श्री.विठ्ठल बिरदेव कुरी संगोपन मतु उन्ने उत्पादकर सहकारी संघ,लि.जत्राट
ता.निपाणी,जि.बेळगांव

वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!



आमचे आधारस्तंभ, इचलकरंजी नगरीचे माजी उपनगराध्यक्ष मा. श्री. प्रकाश मारुती मोरबाळे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

समर्थ साथ



मा. श्री. संजय कांबळे

समर्थ साथ



मा. श्री. सागर चाळके

अभिजीत पुजारी
विल्सन वास्कर
कमलेश खंडेलवाल
अमित सावंत
गोविंद आढाव
इचलकरंजी.

प्रभाग क्र. १२ मधील
समस्त संजयदादा व मोरबाळे मामा प्रेमी

मा. श्री. प्रकाश मारुती मोरबाळे

टिप : साहेब बाहेरगावी गेले असलेने शुभेच्छा स्विकारणेस उपस्थित राहणार नाहीत.

# कोल्हापूरातील फुटपाथनी घेतला मोकळा श्वास

## न्यायालयाच्या कानउघाडणीनंतर महापालिकेची कारवाई

कोल्हापूर ता.१३ (एस.आर.माने)-

**पादचाऱ्यांसाठी राखीव असणाऱ्या फुटपाथवर अनधिकृतपणे व्यापारी, दुकानदार, विक्रेते तसेच घरमालक, अपार्टमेंटधारक यांनी अतिक्रमण करून पादचारी मार्ग गिळंकृत केले आहेत. मात्र शहरवासियांच्या पायाभूत नागरी सेवा सुविधा पाहणाऱ्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांना हे कधीच दिसले नाही,त्यांनी सोयीस्करपणे झोपेचे सोंग घेतले होते. मात्र शहरातील काही सामाजिक संघटनांनी न्यायालयीन लढा सुरु केल्यानंतर महापालिकेला जाग आली अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरु आहे.**

मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्कीट बेंचच्या सन्माननीय न्यायमूर्तींनी रस्ते व फुटपाथवरील अतिक्रमणे तात्काळ काढण्याचे निर्देश दिले. नागरी सुविधेच्या बाबतीत मा.न्यायालयास कान उघडणी करावी लागत आहे, ही बाब कोल्हापूर महापालिकेच्या अधिकाऱ्यांसाठी खरोखरच लाजिरवाणी आहे. दस्तुरखुद्द न्यायालयाने महापालिकेच्या अधिकाऱ्यांची कानउघाडणी केल्यानंतर शहरातील फुटपाथवरील अतिक्रमणे काढून फुटपाथ मोकळे करण्याची कारवाई गतीने होऊ लागली आहे.असो यानिमित्ताने का असेना शहरातील रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या मात्र आतापर्यंत अतिक्रमणांचा विळखा असलेले फुटपाथ आज मोकळा श्वास घेऊ लागले आहेत,मात्र या व्यावसायिकांना व्यवसाय परवाना देतांना त्यांच्या जागांची पाहणी न करता व्यवसाय परवाने दिले जातात ही बाब अधिकाऱ्यांनी आर्थिक लाभासाठी केली की काय? अशा चर्चा रंगल्या आहेत.

शहरातील मुख्य रस्त्यावरील तसेच बाजारपेठातील फुटपाथवर आजही व्यापारी, विक्रेत्यांची राजरोसपणे अतिक्रमणे आढळून येत आहेत.नागरिकांनी याचा जाब विचारल्यास व्यापारी व विक्रेते नागरिकांशी उध्दटपणे वर्तन करतात, त्यामुळे नागरिकही त्यांच्या नादाला न लागलेलं बरे असे म्हणून पुढे जातात.याबरोबरच शहर व उपनगरात होणाऱ्या बहुमजली अपार्टमेंटच्या समोर असणारे पूर्वापार फुटपाथ आज दिसेनासे झाले आहेत.अपार्टमेंट अथवा इमारतींचे बांधकामे पूर्ण झाले की, संबंधित इमारतीचा वा अपार्टमेंटचा विकासक इमारतीसमोरील फुटपाथवर इमारतीतील व्यापारी अथवा फ्लॅटधारकांच्या वाहनांसाठी पार्किंग करुन रिकामा होतो आहे. याची दाद कोण आणि कुणाकडे मागायची हा प्रश्न अनुत्तरीत राहतो.आज शहरातील कित्येक इमारती वा अपार्टमेंटमध्ये असे फुटपाथ गिळंकृत करण्यात आल्याचे दिसत आहे, यावर कारवाई होणार काय अशी नागरिकांतून विचारणा होत आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्कीट बेंचने महापालिका प्रशासनास शहरातील फुटपाथवरील अतिक्रमणे काढून टाकण्याची सूचना केल्यामुळे महापालिकेची कारवाई होऊ लागली आहे.मात्र एक दोन रस्त्यावरील फुटपाथवरील अतिक्रमणे काढून चालणार नाही,शहरातील व उपनगरातील सर्वच फुटपाथवरील अनधिकृत अतिक्रमणे सातत्यपूर्ण काढून सर्वच फुटपाथ मोकळे करुन पादचाऱ्यांची तसेच नागरिकांची सोय करावी.पण महापालिका अधिकाऱ्यांनी सातत्यपूर्वक, कर्तव्यबुध्दीने व निष्पक्षपणे ही कारवाई करणे तितकेच महत्वाचे आहे.



अतिक्रमणे हटविताना पालिकेचे कर्मचारी.

आजही शहरातील बहुतांशी सर्वच रस्त्यावरील फुटपाथवर नागरिक, विक्रेते यांनी अतिक्रमण केल्याने नागरिकांना रस्त्यावरुनच चालावे लागत आहे,त्यामुळे वाहतूकीस अडथळा तर होतोच आहे, उलट पादचारी अपघाताच्या घटनांमध्ये वाढ होऊ लागली आहे. फुटपाथ रिकामे केल्यास शहरातील वाहतूक सुरळित व सुरक्षित होऊन रस्त्यावर होणारे पादचाऱ्यांचे अपघात शुन्यावर येऊ शकतील. व शहरातील वाहतूकीला शिस्त लागेल.मात्र यासाठी पालिका प्रशासनाने कारवाईत नियमितपणा ठेवणे गरजेचे आहे.

# नगरपरिषद व नगरपंचायतीसाठी मतमोजणीची ठिकाणे निश्चित

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)-

**जिल्ह्यातील १० नगरपरिषद व ३ नगरपंचायतींची निवडणुकीची प्रक्रिया रविवार,ता.२१ डिसेंबर रोजी सुरु होत असुन या मतमोजणीची ठिकाणे निश्चित केली आहेत. मतमोजणी ठिकाणच्या परिसरात जिल्हा दंडाधिकारी अमोल येडगे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये २१ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजल्यापासून ते मतमोजणी संपेपर्यंत निर्बंध लागू केले आहेत.**

मतमोजणी दिवशी मतमोजणी ठिकाणापासून २०० मीटर सभोवतालच्या परीसरात मतमोजणी कर्मचारी पुरवठादार,उमेदवार व त्यांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त कोणाही व्यक्तीला प्रवेश करणे. मतमोजणी कालावधीत अथवा मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या लाऊड स्पिकरचा वापर सक्षम पोलीस अधिकाऱ्यांच्या लेखी पूर्वपरवानगी शिवाय रस्त्यावर, व्यासपीठावर किंवा फिरत्या वाहनावर बसवून करणे. मतमोजणी परिसरामध्ये मोटरगाड्या, वाहनांचा वापर करण्यास मनाई केली आहे.

मतमोजणीची ठिकाणे पुढीलप्रमाणे राहतील. **पन्हाळा** - पन्हाळा नगरपरिषद सांस्कृतिक हॉल, मयुर उद्यान, **मलकापूर** - मलकापूर नगरपरिषद कार्यालय, दुसरा मजला सभागृह, **वडगांव** - मराठा समाज सभागृह, छत्रपती शिवाजी महाराज चौक,**हुपरी**-सभागृह,केंद्रीय प्राथमिक शाळा, **हातकणंगले** - पहिला मजला सभागृह,तहसिलदार कार्यालय, **जयसिंगपूर** - सिध्देश्वर यात्री निवास येथील नगरपरिषद कार्यालय, **शिरोळ** - सभागृह पहिला मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,**कुरुंदवाड**-जिम्नॅशियम हॉल,तबक उद्यान, गडहिंग्लज-पॅव्हेलियन इमारत, गांधीनगर, **आजरा** (नगरपंचायत)- मुख्य सभागृह, नवीन प्रशासकीय इमारत,**चंदगड** (नगरपंचायत)- चंदगड तहसिलदार कार्यालय, **कागल** (नगरपंचायत)-सवित्रीबाई फुले मार्केट, जयसिंगराव पार्क आणि **मुरगूड** - डॉ. बाबासाहेब आंबडेकर बौध्द विहार येथे होणार आहे.



# राजापूर बंद: प्रशासनाच्या निषेधार्थ ग्रामस्थांचा नारा

सैनिक टाकळी,ता.१३ (प्रतिनिधी)

**राजापूर (ता.शिरोळ) येथील ग्रामस्थांनी शासनाच्या निषेधार्थ गाव बंद पुकारला. प्रशासन प्रजिमा १२३ व ईजिमा ४८ या रस्त्यांच्या दुरुस्तीकडे अक्षम्य दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी ''रस्ता आमच्या हक्काचा, नाही कुणाच्या बापाचा'' अशा नारेबाजी करत प्रशासनाचा निषेध केला.**

खिद्रापूर येथील पर्यटन स्थळामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. यासाठी हा रस्ता काँक्रीटीकरण करण्याची गरज असल्याची मागणी केली. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अनंत सुर्यवंशी आणि रविराज चव्हाण यांनी ग्रामस्थांशी चर्चा केली. यावेळी दानू पाटील, चंद्रकांत गडगे, धुळाप्पा दिवटे, अविनाश मिस्त्री, आमगोंडा पाटील, विठ्ठल ढवळे, सुरेश कांबळे, रमजान खोंदू, नवाज खोंदू, आयुब मुजावर, बाबासो कोरे, सातगोंडा पाटील, नासीर मकानदार यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# टाकळी परिसरात तीव्र थंडीची लाट

सै.टाकळी,ता.१३(वार्ताहर)-

**सैनिक टाकळी आणि आसपासच्या भागात तीव्र थंडीची लाट आली आहे, तापमानात नवीन निच्चांकी पातळी गाठली जात आहे.**

थंडीचा पारा खाली येत असताना नागरिक कडाक्याच्या थंडीचा सामना करण्यासाठी उपाययोजना करत आहेत. शेकोट्या गावांमध्ये जळत आहेत. लोक स्वेटर आणि कान टोप्या सारखे उबदार कपडे घालत आहेत.तथापि, थंडीच्या लाटेचा ऊसतोडणी कामगारांवर परिणाम होत आहे,जे गोठवणाऱ्या परिस्थितीतही काम करण्यासाठी संघर्ष करत आहेत.थंडीमुळे लोकांच्या आरोग्यावर देखील परिणाम होत आहे. सर्दी, खोकला, यासारख्या आजारांना सामोरे जावे लागत आहे.

# कोरोची ग्रामसभेत ऐतिहासिक निर्णय

## ५० टक्के घरफाळा माफीचा शासनादेश रद्द;थकबाकीदारांची नावे डिजिटल बोर्डवर लावण्याचा ठराव मंजूर

कोरोची,ता.१३(वार्ताहर)-

**कोरोची ग्रामपंचायतीच्या वतीने नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या बजेट ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांनी नियमित कर भरणाऱ्यांना न्याय देण्यासाठी आणि ग्रामपंचायतीचे उत्पन्न अबाधित राखण्यासाठी, शासनाच्या ५० टक्के घरफाळा माफीच्या अध्यादेशाला बहुमताने विरोध करत तो रद्द करण्याचा ऐतिहासिक ठराव संमत केला.**

या ग्रामसभेत शासनाने नव्याने काढलेल्या ५० टक्के घरफाळा माफीच्या संदर्भात चर्चा झाली. यावेळी ग्रामस्थांनी अत्यंत ठाम भूमिका घेतली. ग्रामस्थांनी सांगितले की, कोरोचीमध्ये नियमित घरफाळा भरणाऱ्यांची संख्या चांगली असल्याने ग्रामपंचायतीचा कारभार उत्तम चालतो. अशा परिस्थितीत नियमित कर भरणाऱ्यांवर अन्याय करून, वर्षानुवर्षे थकीत फाळा ठेवणाऱ्यांना सवलत देणे ही भूमिका कोरोचीकर कधीही मान्य करणार नाहीत.



कोरोची येथील ग्रामसभेप्रसंगी बोलताना सरपंच डॉ. संतोष भोरे

ग्रामस्थांनी सर्वानुमते बहुमताने ठराव करून,५० टक्के घरफाळा माफीचा शासनाचा अध्यादेश रद्द करण्याचा निर्णय घेतला.

**थकबाकीदारांवर कठोर कारवाईचे आदेश**

याच ग्रामसभेत थकबाकी वसुलीसाठी अत्यंत कठोर उपाययोजना करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. सरपंच संतोष भोरे यांनी ग्रामस्थांना आवाहन केले की, ज्यांचा फाळा अजूनही थकीत आहे, त्यांनी तो त्वरित ग्रामपंचायतीकडे जमा करावा. अन्यथा जो घरफाळा भरणार नाही, त्यांची नावे असलेले डिजिटल बोर्ड तयार करून ते गावातील ठीक ठिकाणी चौकाचौकात लावण्यात येतील. डिजिटल बोर्डवर नाव लावूनही जो फाळा भरणार नाही, त्याच्यावर सक्तीने जप्तीची कारवाई करून थकीत फाळा वसूल करण्यात येईल.

**सरपंचांचे जनतेला आवाहन**

सरपंच संतोष भोरे यांनी यावेळी आवाहन केले की, ज्या गावकऱ्यांनी ५० टक्के सवलत मिळेल म्हणून फाळा भरायला विलंब केला होता, त्यांनी लक्षात घ्यावे की गावकऱ्यांनी तो ठराव रद्द केला आहे. त्यामुळे, सर्व थकीत मालमत्ता धारकांनी आपली नावे बोर्डावर येऊ नयेत याची दक्षता घेऊन वेळेत फाळा भरून ग्रामपंचायतीला सहकार्य करावे, असे आवाहन केले.

कोरोची ग्रामपंचायतीच्या या निर्णयामुळे नियमित कर भरणाऱ्या नागरिकांना एक प्रकारे न्याय मिळाला असून, ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची शिस्त कायम राखण्यास मदत होणार आहे.यावेळी उपसरपंच आनंदी आमते, ग्रामविकास अधिकारी रांजा पाटील,पोलीस पाटील सावकर हेगडे यांचेसह सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अवैध गौण खनिज उत्खननावर धडक कारवाई

शिरगाव,ता.१३(प्रतिनिधी)

**राधानगरी तालुक्यात बॉक्साईट सदृश्य गौण खनिजांचे उत्खनन होत आहे.अशा तक्रारी आल्या होत्या.त्या अनुषंगाने महसुल विभाग सतर्क झाले आहे. ज्या- ज्या ठिकाणी गौण खनिज उत्खनन होण्याची शक्यता आहे. त्या ठिकाणाचे रस्ते चरी मारून बंद करण्यात आले आहेत. त्याचबरोबर एका ट्रकवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

राधानगरी तालुक्याच्या पश्चिम भागातील काही गावांमध्ये बॉक्साईट सदृश्य गौण खनिजांचे अवैधरित्या उत्खनन होत असल्याच्या तक्रारी राधानगरी महसुल विभागाकडे आल्या होत्या. या तक्रारीनंतर तहसिलदार अनिता देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महसुल विभागाने धडक मोहिम हाती घेऊन कारवाईचा बडगा उगारला आहे. उत्खनन होण्याची शक्यता असलेले ठिकाणी जेसीबीच्या सहाय्याने चरी मारून रस्ते बंद करण्यात आले आहेत.दरम्यान त्याचबरोबर एका ट्रकवर गुन्हा देखिल दाखल केला असल्याची माहिती तहसिलदार अनिता देशमुख यांनी दिली.तसेच कुठेही गौण खनिज सुरु असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी महसुल विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

# इंडिया आघाडीबरोबर चर्चेसाठी काँग्रेसची समिती

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत इंडिया आघाडी म्हणून लढण्यासाठी काँग्रेसने पुढाकार घेतला असून घटक पक्षांशी चर्चा करण्यासाठी काँग्रेसने समिती नेमली आहे. ही समिती शिवसेना ठाकरे गट , राष्ट्रवादी शरद पवार गट व इंडिया आघाडीतील इतर पक्षांशी १३ ते १६ डिसेंबर या कालावधीत चर्चा करुन त्याचा अहवाल १७ डिसेंबरला काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते तथा जिल्हाध्यक्ष आमदार सतेज पाटील यांना देणार आहे.**

काँग्रेसचे शहराध्यक्ष सचिन चव्हाण, सूर्यकांत पाटील-बुद्धीहाळकर, राजेश लाटकर, भारती पोवार, आनंद माने, तौफिक मुलानी, विक्रम जरग व भरत रसाळे यांची समिती इंडिया आघाडीतील घटक पक्षांशी चर्चा करणार आहे. यामध्ये जागांच्या अपेक्षा, प्रभागनिहाय ताकद व पक्षांचे मत यावर चर्चा केली जाणार आहे. त्यानंतर आघाडीबाबतचा निर्णय घेतला जाईल.

# पीएम किसान पोर्टलमध्ये सुधारणा करावी

## खास. महाडिक यांची वंचितांना लाभ देण्याची मागणी

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)-

**शेतकऱ्यांसाठी असलेली सर्वात मोठी आर्थिक मदत योजना पीएम किसान सन्मान निधी सध्या अनेक तांत्रिक आणि प्रशासकीय त्रुटींमुळे गरजू लाभार्थींपर्यंत पोहोचू शकत नाहीये .विशेषत: २०१९ नंतर शेतीत उतरलेल्या युवा शेतकऱ्यांपासून ते योजना सुरू असताना निधन झालेल्या शेतकऱ्यांच्या वारसांपर्यंत अनेकांना या लाभापासून वंचित राहावे लागत आहे.**

या गंभीर प्रश्नांकडे लक्ष वेधत, खासदार धनंजय महाडिक यांनी नवी दिल्लीतील संसदेच्या अधिवेशनात या योजनेतील त्रुटींवर आवाज उठवला आणि तातडीने सुधारणा करण्याची मागणी केली. त्यांच्या या भूमिकेमुळे देशातील लाखो प्रलंबित शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. संसदेत झालेल्या पी एम किसान सन्मान निधी योजनेवरील चर्चेत खासदार धनंजय महाडिक यांनी सक्रिय सहभाग घेतला.

२०१९ नंतर जमीन घेतलेल्या नव्या आणि युवा शेतकऱ्यांना सातबारा आणि८-अ दाखल्यामध्ये नाव असूनही, या योजनेचा लाभ मिळत नाही. तसेच, नावातील इंग्रजी स्पेलिंगमधील चूक, आधार क्रमांकातील त्रुटी किंवा बँक तपशिलातील त्रुटी, यामध्ये सुधारणा करूनही शेतकऱ्यांना किसान सन्मान निधीचा हप्ता मिळण्यास विलंब होत आहे.

तिसऱ्या महत्त्वाच्या मुद्द्याकडेही खासदार महाडिक यांनी संसदेचे लक्ष वेधले. शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या अधिकृत वारसांना या निधीचा लाभ मिळण्यास अनेक अडथळे येतात. शासकीय तपासणी प्रक्रिया अत्यंत संथ असल्याने, किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थी शेतकरी कुटुंबीयांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

यावर उपाय म्हणून पी एम किसान पोर्टलवर काही सुधारणा करून तांत्रिक बदल करावेत, ज्यामुळे वारसांची कागदपत्रे ऑनलाईन अपलोड होतील आणि स्थानिक स्तरावर वेगवान पडताळणी होऊन, वारसांना योजनेचा लाभ मिळू शकेल,अशी सूचना आणि अपेक्षा खासदार महाडिक यांनी व्यक्त केली. खासदार महाडिक यांनी केलेल्या या सूचनांमुळे देशातील शेतकऱ्यांच्या अडचणी सुटू शकतील. सध्या महाराष्ट्रातील अशी सुमारे २० हजार प्रकरणे प्रलंबित असून, लवकरात लवकर या शेतकऱ्यांना देखील पी एम किसान योजनेचा लाभ मिळावा, अशी विनंती खासदार महाडिक यांनी केली.

# तपोवन,राजलक्ष्मीनगरमध्ये विकासकामांचा शुभारंभ

कोल्हापूर ता.१३(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील शिवाजी विद्यापीठ, तपोवन राजलक्ष्मी नगर या प्रभागांमध्ये २५ लाख रुपये निधीतून करण्यात येत असलेल्या विविध विकासकामांचा शुभारंभ कोल्हापूर दक्षिणचे माजी आमदार ऋतुराज पाटील यांच्या हस्ते झाला.**

खासदार इम्रान प्रतापगढी यांच्या निधीतून शिवाजी विद्यापीठ प्रभागातील प्रगती हौसिंग सोसायटी येथे ओपन स्पेसला कंपाऊंड बांधणे, तसेच तपोवन प्रभागातील सोमराज कॉम्प्लेक्स येथील ओपन स्पेसमध्ये विरंगुळा केंद्र बांधण्यासाठी प्रत्येकी १० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्याचबरोबर राजलक्ष्मीनगर प्रभागातील वसंतराव सरनाईक पार्क येथील अंतर्गत गटर्स करण्यासाठी महापालिकेकडून ५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

या तीनही कामांचा शुभारंभ माजी आमदार ऋतुराज पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी काँग्रेस शहराध्यक्ष सचिन चव्हाण, प्रवीण केसरकर, शोभा कवाळे, मधुकर रामाणे, दिपा मगदूम, दुर्वास कदम यांच्यासह सुयोग मगदूम, दिग्विजय मगदूम, सचिन शेंडे, आदी मान्यवर उपस्थित होते.

# पंचगंगा नदीकाठच्या गावांना काळ्या पाण्याची शिक्षा

## शिरोळ तालुक्यात नदीच्या पाण्यास दुर्गंधी; विविध गावात याच पाण्याचा पिण्यासाठी वापर

बुबनाळ,ता.१३(वार्ताहर)-

**शिरोळ तालुक्यात पंचगंगा नदीचे पाणी पुर्णपणे दुषित झाले आहे.पाण्याला दुर्गंधी येत आहे. नदीचे पाणी काळेभोर दिसत असुन त्यावर हिरवागार तवंग निर्माण झाला आहे. शिरोळ तालुक्यातील पंचगंगा काठावर वसलेली गावे हेच पाणी नदीत जसे आहे तसे पिण्यासाठी म्हणुन वापरत असल्यामुळे या गावातील ग्रामस्थांना एकप्रकारे काळ्या पाण्याची शिक्षाच भोगावी लागत आहे.**



शिरोळ तालुक्यातील पंचगंगा नदीतील पाणी असे काळेभोर झाले असुन त्यावर रासायनिक तवंग तयार झाला आहे.(छाया : अनिल जासुद.)

''पंचगंगा नदी म्हणजे दुषित पाणी'' असा समजच दृढ झाला आहे. कारण... विविध औद्योगिक उद्योगधंदे, प्रोसेसिंग कारखान्याचे रासायनिक, मळीमिश्रित पाणी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष स्वरुपात थेट पंचगंगेत येऊन मिसळते. तसेच पंचगंगा काठावरील गावांचे सांडपाणी, गटारीचे पाणीही थेट पंचगंगेत येऊन मिसळते.यामुळे पंचगंगा अधिक प्रदुषित होत आहे.

पंचगंगा नदी शिरोळ तालुक्यातील अ.लाट, टाकवडे, शिरढोण, तेरवाड, भैरेवाडी, कुरुंदवाड अशी वाहत पश्चिमेकडून पुर्वेकडे वाहत येते व पुढे नृसिंहवाडी संगम घाटाजवळ कृष्णा नदीला येऊन मिळते.घाटाजवळ कृष्णा व पंचगंगा नदीचा संगम होऊन या दोन्ही नद्या एकत्रितपणे पुढे औरवाड,बस्तवाड, बुबनाळ, आलास, अकिवाट, सैनिक टाकळी, राजापुर,राजापुरवाडी, खिद्रापुर, अशी वाहत कर्नाटककडे जाते.

मध्यंतरी पंचगंगेच्या दुषित पाण्यामुळे तेरवाड, शिरोळ बंधाऱ्यावर हजारो मासे मृत्युमुखी पडले होते.याबाबत काही सामाजिक संस्था, संघटनांनी आवाज उठवुन प्रदुषण अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष नदीकाठावरची परिस्थिती दाखवुन हेच दुषित पाणी पाजले होते.

पंचगंगा नदीकाठावर वसलेल्या या गावांतील ग्रामस्थांना पंचगंगेचेच पाणी पिण्यासाठी म्हणुन वापरावे लागते.

सद्या पंचगंगा नदीचे पाणी इतके प्रदुषित झाले आहे की, मासे सुद्धा मृत्युमुखी पडत आहेत.तरीही हेच पाणी या काठावर वसलेली बहुतांशी गावे पिण्यासाठी म्हणुन वापरतात. या गावात ग्रामपंचायतीमार्फत नदीतील पाण्याचा उपसा करुन नळयोजनेद्वारे गावाला पाणी पुरवठा केला जातो.मात्र बहुतांशी ग्रामपंचायतीकडे जलशुद्धीकरण योजना कार्यान्वित नसल्यामुळे नदीत जसे पाणी आहे तसे उपसा करुन गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या मोठ्या टाकीत साठवले जाते. त्यामध्ये पाणी शुद्ध व्हावे म्हणुन ब्लिचिंग पावडर टाकली जाते. यानतंर तेच पाणी नळयोजनेद्वारे घराघरात पिण्यासाठी म्हणुन ग्रामस्थांना पुरवठा केले जाते. सद्या पंचगंगा नदीतील पाणी पाहता ते पिण्यायोग्य तर अजिबात नाही.यामुळे पंचगंगा काठावर असलेल्या ग्रामस्थांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

हजारो ग्रामस्थांच्या आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या व पंचगंगा नदीचे पाणी प्रदुषित करणाऱ्या घटकांवर कायदेशिर कडक कार्यवाही करण्यासाठी लोकप्रतिनिधींनीही लक्ष देणे आवश्यक आहे. मात्र लोकप्रतिनिधी याबाबत उदासिन दिसत आहेत.

पंचगंगा नदीचे पाणी प्रदुषित असुन पिण्यायोग्य नाही याची जाणीव असल्यामुळेच शिरोळ तालुक्यातील अमृतलाट ग्रामपंचायत नजीकच्या दत्तवाड गावातुन वाहणाऱ्या दुधगंगा नदीतुन ग्रामपंचायततर्फे पाणी उपसा करुन ग्रामस्थांना नळयोजनेद्वारे पिण्यासाठी म्हणुन पुरवठा करीत आहे.

# बोरगाव-कसनाळ रस्त्याची दयनीय अवस्था

## ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य; अपघातात वाढ

बोरगाव,ता.१३(प्रतिनिधी)-

**बोरगाव कसनाळ रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. बोरगाव सर्कल पासून हुपरी शहराकडे जाणारा रस्ता उखडून खड्ड्याने भरून गेल्याने वाहनधारकांचे हाल होत आहेत. तसेच या मार्गावर असलेल्या नागरिकांना या रस्त्याचा मोठा त्रास होत आहे. लवकरच या रस्त्याची डागडूजी करावी अन्यथा रस्त्यावरच उपोषण करण्याचा इशारा शेतकरी, प्रवासी व विद्यार्थ्यांनी दिला आहे.**



बोरगाव-कसनाळ रस्त्याची झालेली दूरावस्था.

या मार्गावरून दररोज शेकडो खासगी वाहने, दुचाकी, एसटी बसेस यांची सतत वर्दळ असूनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या रस्त्याकडे कायम दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले असल्याने दुचाकी, चार चाकी खड्ड्यात आदळत असल्याने वाहकांबरोबरच प्रवाशांचे ही मणके ढिले होत आहेत. खड्ड्यात जोराने बस आदळल्यानंतर अनेकदा बस मध्ये बसलेल्या प्रवाशांना दुखापतीचा सामना करावा लागत आहे.

रस्त्यांवर मोठ-मोठे खड्डे पडल्याने रस्ता दुरुस्तीची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर लागलीच या ठिकाणी पॅचवर्क कामास प्रारंभ झाले पण अद्यापही संपूर्ण रस्त्याचे पॅचवर्क झाले नसल्याने वाहनधारक व प्रवाशांना मोठा त्रास होत आहे. रस्ता डांबरीकरण व्हावे यासाठी वारंवार सांगण्यात येत असले तरीही लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ही होत आहे.

**बांधकाम खात्याचे अक्षम्य दुर्लक्ष**

रस्त्यावर खोल खोल खड्डे पडल्याने वाहन चालकांना गाडीचे नियंत्रण ठेवणे कठीण झाले आहे. विशेषता: पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघातांना धोका अधिक वाढतो. या ठिकाणी अनेक दुचाकीस्वार घसरून जायबंदी झाले आहेत. धूळ, चिखल, सततचा आवाज आणि अपघातांचा धोका यामुळे नागरिकांनाही या रस्त्याचा मोठे त्रास होत आहे. संपूर्णपणे रस्ता खराब झाल्याने घरांमध्ये मोठ्या प्रमाणावर धूळ येत असल्याचेही नागरिकांमधून बोलले जात आहे. तरीही याकडे दुर्लक्ष करीत आहेत. एकाद्याच्या जीव गेल्यानंतर रस्ता डांबरीकरण होणार का ? असा सवाल ही संतप्त प्रवासी व वाहक करीत आहेत. रोज शेतकरी या रस्त्यावरून ये जा करीत असल्याने शेतकऱ्यांनाही मोठा फटका बसत आहे.

सध्या ऊस हंगाम सुरू आहे. मात्र कोणत्याही उपाय योजना राबविण्यात आल्या नाही. प्रवासांचा जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे .त्यामुळे अनेकांचा जीव या रस्त्यामध्ये गुदमरत चाललेला आहे.हा रस्ता म्हणजे जणू मृत्यूचा सापळा बनला असल्याचेही सांगण्यात येत आहे.तरी सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी व लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देऊन त्वरित रस्ता डांबरीकरण करावे, अन्यथा लवकरच आपण रस्त्यावर उपोषणासाठी उतरू, असा इशाराही येथील नागरिकांनी दिलेला आहे.

या रस्त्यावरून प्रवास म्हणजे वाहन चालकांना शिक्षा असल्याचे बोलले जात आहे. रस्त्याची इतकी दुरावस्था झाली असताना सार्वजनिक बांधकाम विभाग मात्र हातावर हात ठेवून आहे.रस्त्याची दुरुस्ती तर त्यांनी केली नाहीच पण रस्त्यावरील खड्डेही नीटपणे त्यांना भरता आले नाहीत. रस्ता कुठे आणि खड्डा कुठे हेच कळत नाही इतकी दयनीय अवस्था या रस्त्याची झाली आहे.

# चिकोडी जिल्ह्यासाठी पाचव्या दिवशीही आंदोलन सुरूच

## अधिवेशनात जिल्ह्याची घोषणा करण्याची मागणी

चिकोडी,ता.१३(प्रतिनिधी)-

**स्वतंत्र चिकोडी जिल्ह्याच्या मागणीसाठी धरणे आंदोलन शुक्रवारी (ता.१२) पाचव्या दिवशी सुरूच राहिले.जिल्हा मागणीसाठी गेल्या तीन दशकांपासून लढा दिला जात असून बेळगाव येथील अधिवेशनात जिल्ह्याची घोषणा करावी, अशी मागणी आंदोलकांकडून केली जात आहे.**



चिकोडी : येथे जिल्हा मागणीसाठी पाचव्या दिवशी सुरु असलेल्या आंदोलनात सहभागी मान्यवर व कार्यकर्ते.

यावेळी निपाणीचे चंद्रकांत जासुद म्हणाले की, बेळगाव जिल्हा विभाजनसाठी गेल्या तीन दशकापासून स्वतंत्र चिकोडी जिल्हा मागणीसाठी संघर्षाचा लढा सुरू आहे. चिकोडी जिल्हा समितीचे अध्यक्ष संजु बडगेर, सचिव चंद्रकांत हुक्केरी व त्यांचे कित्येक कार्यकर्ते सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहेत.मात्र सरकार केवळ खोटे आश्वासन देऊन पुढे ढकलत आहेत.चालू अधिवेशन संपण्यापूर्वी चिकोडी जिल्हा जाहीर करावा,अन्यथा सीमाभागात सर्व संघटनाबरोबर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. चिकोडी भागाचे आम.गणेश हुक्केरी यांनी लोकांच्या समस्या व विकास लक्षात घेऊन या अधिवेशनात चिकोडी जिल्ह्याची घोषणा करावी, लोकांचे समाधान करावे, असे मत व्यक्त केले.

यावेळी महादेव बरगाले,जीवन गस्ते,प्रवीण हेगडे,लियाकत शिरकोळी, शब्बीर मंगावकर, लक्ष्मण नाईक, बी.ए.माने, एम.एम.पाटील, आप्पासाहेब गावडे, जिल्हा समितीचे अध्यक्ष संजू बडगेर, सचिव चंद्रकांत हुक्केरी, अनिल नावी, दुरदुंडी बडीगेर, मोहन पाटील, खानाप्पा बाड, निंगाप्पा वडगोल, शिवलिंग वग्गे, अमोल नावी, अजित वग्गे, भीमराव मड्डे,चंद्रशेखर अरभावी, आप्पासाहेब हिरेकोडी,सिद्राम नाईक, मल्लिकार्जुन मंगाजे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुरगूड येथे हुतात्म्यांना अभिवादन

मुरगूड,ता.१३(प्रतिनिधी)-

**मुरगूडमध्ये ता.१३ डिसेंबर १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत हौतात्म्य पत्करलेल्या सात हुतात्म्यांना येथील हुतात्मा तुकाराम चौकात अभिवादन करण्यात आले. यानिमित्त चौकात दिवे लावून प्रेरणोत्सव करण्यात आला.**

१३ डिसेंबर १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात गारगोटी येथील ब्रिटीश कचेरीवर हल्ला करताना झालेल्या गोळीबारात सात हुतात्म्यांनी प्राणाची आहुती दिली.त्या हुतात्मा तुकाराम भारमल (मुरगूड ता.कागल), हुतात्मा करवीरप्पा स्वामी (हुक्केरी जि.बेळगाव), हुतात्मा मल्लापा चौगले (नानीबाई चिखली ता.कागल), हुतात्मा परशुराम साळुंखे (खडकलाट ता.चिकोडी), हुतात्मा नारायण वारके (कलनाकवाडी ता.भुदरगड), बळवंत जबडे (जत्राट ता.चिकोडी) व हुतात्मा शंकरराव इंगळे (कापशी ता.कागल) यांना येथील हुतात्मा तुकाराम चौकात स्वातंत्र्य चळवळीच्या स्मृतीदिनाच्या पूर्वसंध्येला पणत्या प्रज्वलीत करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी दलितमित्र प्रा.दत्ता चौगले, मुरगूडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी करे,पी.व्ही .पाटील, स्वातंत्र्य सैनिकांचे वारसदार संदीप भारमल, राणोजी गोधडे, सुभाष अनावकर,विश्वनाथ परीट,रणजित भारमल, कॉ.बबन बारदेस्कर,ओंकार पोतदार,सर्जेराव भाट यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बी.एस.महाविद्यालयात लट्ठे, शेट्टींच्या अर्धपुतळ्याचे अनावरण

बेडकिहाळ,ता.१३(वार्ताहर)-

**येथील लट्ठे शिक्षण संस्थेच्या बी.एस. संयुक्त पदवीपूर्व महाविद्यालयाच्या परिसरात दिवाणबहादूर अण्णासाहेब लट्ठे आणि भूदान कै.रत्नाप्पा शेट्टी यांच्या अर्धाकृती पुतळा अनावरण आणि नूतन बांधण्यात आलेल्या शाळा खोल्यांचा उद्घाटन समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लट्ठे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शांतीनाथ कांते हे होते.**

सकाळी १० वाजता वाद्यांच्या गजरात मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी दिवाणबहादूर अण्णासाहेब लट्ठे यांचे पुतळा अनावरण लट्ठे फाउंडेशनचे अमेरिका व बेळगावचे अध्यक्ष डॉ.भरत लट्ठे तर भूदान रत्नाप्पा शेट्टी पुतळ्याचे अनावरण लट्ठे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजीव पाटील व शाळा खोल्यांचे उद्घाटन संस्थेचे कार्यदर्शी सुहास पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.



अण्णासाहेब लट्ठे व रत्नाप्पा शेट्टी यांच्या अर्ध पुतळ्याचे अनावरण प्रसंगी उपस्थित शांतीनाथ कांते,भरत लट्ठे,पी.आर.पाटील व इतर मान्यवर, संचालक मंडळ.

कार्यक्रमाप्रसंगी चंद्रकांत पाटील, पासगौडा पाटील, भालचंद्र पाटील, सुधीर शेट्टी,डॉ.प्रमोद चौगुले, रवींद्र लट्ठे, बाळासाहेब पाटील, उदय पाटील, राजू लट्ठे, अरुण शेट्टी, बी.ए.पाटील,संजय लट्ठे, डॉ विलास जोशी,अ‍ॅड.पी.आर.पाटील हे उपस्थित होते.स्वागत इंद्रजित पाटील यांनी तर कार्यक्रमाचे उद्घाटन पी.आर.पाटील व उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी बी.एस. संयुक्त पदवीपूर्व महाविद्यालयाचे अध्यक्ष तात्यासाहेब खोत, हालशुगरचे संचालक जयकुमार खोत, संचालक नाभीराज खोत, डॉ.विपुल सदलगे, बाबासाहेब खोत, तात्यासाहेब चौगुले, प्रदीप पाटील, संदीप पाटील, जे.एन.पाटील, प्रशांत पाटील, यांच्यासह सर्व शाळा, महाविद्यालयाच्या संचालकांच्या हस्ते मान्यवरांचे व विशेष करून शेट्टी परिवारातील सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी शांतीनाथ कांते, डॉ.भरत लट्ठे,पी.आर.पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी लट्ठे शिक्षण संस्थेच्या बेडकिहाळ , शमनेवाडी, भोज येथील स्थानिक समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, प्राचार्य,उपप्राचार्य,प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.गोपाळ महामुनी, एस.ए.कमते यांनी केले.आभार पी.एस.कोहळ्ळी यांनी मानले.



## चिकोडी जीएसई संस्थेत वेशभूषा स्पर्धा उत्साहात संपन्न

चिकोडी,ता.१३(प्रतिनिधी)-

**येथील जीएसई संस्थेच्या इंग्लिश मीडियम पूर्व प्राथमिक शाळेत नर्सरी ते युकेजी विद्यार्थ्यांसाठी वेशभूषा स्पर्धा पार पडल्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष शंकर मगदूम तर प्रमुख पाहुण्या म्हणून सीमा कवचे, मुख्याध्यापिका बी.बी.पाटील उपस्थित होत्या.फातिमा राजगोळी यांनी स्वागत केले.**

सीमा कवचे म्हणाल्या, लहान वयापासून विद्यार्थ्यांच्या कौशल्याच्या विकासासाठी असे उपक्रम आवश्यक आहेत. जीएसई संस्थेने नेहमी विद्यार्थ्यांच्या कलागुणांच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. लहानपणी मुलांवर केलेले संस्कार आणि दिलेले शिक्षण भविष्यासाठी उपयुक्त ठरते.मुख्याध्यापिका भाग्यश्री पाटील यांनी, विद्यार्थ्यांनी अभ्यासासह अन्य स्पर्धा आणि उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा परिधान करून उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शविला.कार्यक्रमास प्र.मुख्याध्यापिका निर्मला खिद्रापुरे, संतोषी खटावकर, अनुराधा उपाध्ये, अश्विनी परिट, कांचन घाटगे, वैशाली यशवंत यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## निपाणी परिसरात कडाक्याच्या थंडीमुळे साथीच्या आजारांमध्ये वाढ

निपाणी,ता.१३(प्रतिनिधी)-

**परिसरात गेल्या चार दिवसांपासून थंडीची लाटच आली असून या कडाक्याच्या थंडीमुळे अनेक साथीच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे.तर या थंडीमुळे कोणतेही काम करणे सुचेनासे झाले आहे.त्यामुळे परिसरातील जनता हैराण झाली आहे.**

चालू वर्षी पाऊसही तुफान झाल्याने बहुतेक थंडीच्या प्रमाणातही वाढच झाली आहे. प्रतिवर्षापेक्षा यावर्षी थंडीच्या प्रमाणात वाढ असून सायंकाळी ६ नंतर थंडीला सुरुवात होत असून सकाळी १० वाजले तरी थंडी कमी होत नाही.तर दिवसभर गार वारे सुटत असल्याने दिवसभरही थंडी जाणवते.त्यामुळे मानवाला काही काम सुचेनासे झाले आहे. या थंडीपासून संरक्षण करण्यासाठी लोक उबदार कपड्यांचा वापर करताना दिसत आहेत.सकाळी लवकर कामावर जाणारे लोक स्वेटर, हातमौजे,हेल्मेट आदी साधने वापर करत आहेत.त्याचबरोबर रात्री ८ वाजल्यापासूनच ठिकठिकाणी शेकोट्या पेटवून थंडीपासून संरक्षण करत आहेत.पण सद्या सुरू असलेल्या थंडीमुळे थंड, ताप, खोकला आदी साथ पसरत असून या साथीच्या आजाराने आणखीनच या परिसरातील जनता हैराण झाली असून उन्हाळा व पावसाळा बरा पण ही थंडी नको असे म्हणताना दिसत आहेत.

# भोवी-वडर समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध

**-मंत्री शिवराज तंगडगी**

निपाणी,ता.१३(प्रतिनिधी)-

**भोवी-वडर समाजाच्या विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून राज्य सरकारने या समाजासाठी भरीव निधी जाहीर करून अनेक सोयी-सुविधा व योजना लागू केल्या आहेत. याचा लाभ समाजबांधवांनी घेऊन विकास साधावा.राज्य सरकार यापुढील काळातही या समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे मत राज्याचे कॅबिनेट मंत्री शिवराज तंगडगी यांनी व्यक्त केले.**

बेळगाव येथील हॉटेल संकममध्ये पार पडलेल्या भोवी-वडर समाजाच्या चिंतन बैठकीत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भोवी वडर समाजाचे राज्याध्यक्ष एम.रामाप्पा हे होते. या बैठकीला हिम्मडी सिध्दरामेश्वर महास्वामी उपस्थित होते.प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रोपाला पाणी घालून बैठकीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.मंत्री तंगडगी म्हणाले, राज्य सरकारने समाजाच्या विविध विकासासाठी ६०० कोटी रुपये निधी मंजूर केला आहे. या माध्यमातून समाजातील गरजू घटकांना विविध व्यवसायासह रोजगारासाठी आर्थिक सवलती व योजनांचा लाभ मिळणार आहे.एम.रामाप्पा यांनी समाजातील लोकांसाठी सरकारने लागू केलेल्या सुविधा, योजना व सवलती यांची माहिती देत त्याचा समाजबांधवांनी लाभ घ्यावा,असे आवाहन केले. बैठकीस आ.ए.सी.श्रीनिवास, व्ही. व्यंकटेश,एम.चंद्रप्पा,मंजुळा निंबावळी, माजी जि.पं.सदस्य व समाजाचे राज्य संचालक राजेंद्र वडर यांच्यासह निपाणी, चिकोडी, अथणी, रायबाग,गोकाकसह जिल्ह्यातील समाजबांधव उपस्थित होते.



बेळगाव : रोपाला पाणी घालून बैठकीचे उद्घाटन करताना सिध्दरामेश्वर महास्वामी,मंत्री शिवराज तंगडगी,एम.रामाप्पा, आ.ए.सी.श्रीनिवास,राजेंद्र वडर आदी मान्यवर.

# कोगनोळी बाजारात भाजीपाल्यांचे दर तेजीत

कोगनोळी,ता.१३(प्रतिनिधी)-

**कोगनोळीचा आठवडी बाजार हा प्रत्येक शुक्रवारी भरत असतो. या बाजारामध्ये सुळगाव, मत्तीवडे, हंचिनाळ के.एस, हणबरवाडी, दत्तवाडी, कुंभळकट्टी, सुळकुड, आडी, बेनाडी, आप्पाचीवाडी, लिंगनूर दुमाला, करनूर, वंदूर आदी भागातील व्यापारी वर्ग मोठ्या प्रमाणात भाजीपाला घेऊन विक्रीसाठी येत असतात.**



कोगनोळी येथे भरलेला आठवडी बाजार.

पंधरा हजारावर लोकसंख्या असलेल्या कोगनोळी आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या प्रमाणात भाजीपाला खरेदी करण्यासाठी येत असतात. येथे दुपारी ४ ते रात्री ८ वाजेपर्यंत बाजार भरतो. या आठवड्यात भरलेल्या बाजारामध्ये बहुतांशी भाजीपाल्यांचे दर तेजीत होते तर गेल्या दोन-तीन आठवड्यापासून शेवगा बाजारातून गायब झाला आहे. त्यामुळे महिलांचे बजेट काही प्रमाणात विस्कटल्याचे दिसून आले.

**दरवाढीमुळे शेवगा गायब**

वांगी ८० रुपये किलो, गवारी १२० ते १४० रुपये किलो, दोडका ६० ते ८० रुपये किलो, भेंडी ७० ते ८० रुपये किलो, टोमॅटो ३० ते ४० रुपये किलो, कारली ५० ते ६० रुपये किलो, वरणा ७० ते ८० रुपये किलो, ऊसावरील शेंगा ५० ते ६० रुपये किलो, चारधारी शेंगा ६० ते ७० रुपये किलो, बिन्स ४० रुपये किलो, काकडी ८० ते १०० रुपये किलो, हिरवी मिरची ५० ते ६० रुपये किलो, ढब्बू मिरची ७० ते ८० रुपये किलो, कोबी १५ ते २५ रुपये गड्डा, फ्लावर २५ ते ३० रुपये गड्डा, अंबाडा १० ते १५ रुपये पेंडी, मेथी २० रुपये पेंडी, दुधी भोपळा १५ ते २० रुपये नग, पोकळा १० ते १५ रुपये पेंडी, कांदे १५ ते २५ रुपये किलो, बटाटे ३० ते ४० रुपये किलो, लसूण ७० ते ८० रुपये किलो, आले ५० ते ६० रुपये किलो, कोथिंबीर १० ते २० रुपये पेंडी याप्रमाणे दर होते.ढगाळ वातावरण आणि अति थंडीमुळे उत्पादनात घट झाली आहे. त्यामुळे भाजीपाल्याचे दर तेजीत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

## दिंडेवाडी विद्यालयाचा क्रीडा महोत्सव उत्साहात

गारगोटी,ता.१३(प्रतिनिधी)-

**विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी खिलाडी वृत्ती जोपासावी, असे आवाहन दिंडेवाडी शाळेचे मुख्याध्यापक शंकर येजरे यांनी केले.**

खो-खो व कबड्डी सामन्यांचा शुभारंभ शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजाराम भारमल व सदस्य आरती रामाने व सारिका फराकटे यांच्या हस्ते करण्यात आला.क्रीडा प्रमुख शशिकांत फराकटे,क्रीडा मंत्री वेदांत नाझरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धांचे नियोजन केले होते. प्रास्ताविक संतोष पाथरवट यांनी केले. यावेळी केंद्र प्रमुख विठ्ठल मगदूम, मुख्याध्यापक उत्तम मुळीक, क्रिडा शिक्षक रमेश पाटील,शिक्षक सुधाकर मुळीक, सुधीर शिऊडकर,अरुणा भोपळे व ज्ञानदेव घाटगे, सदाशिव शेटके व विघ्नेश मोरबाळे व सानवी जाधव उपस्थित होते.शशिकांत फराकटे यांनी आभार मानले.

# कर्नाटकात इंदिरा किटची प्रतीक्षा संपली

## नवीन वर्षापासून किटचे वितरण; मंत्री के.एच.मुनियप्पा यांची माहिती

निपाणी,ता.१३(प्रतिनिधी)-

**रेशनवरील तांदळाचा होत असणारा दुरुपयोग थांबविण्यासाठी तांदळाऐवजी वैविध्यपूर्ण पौष्टिक आहारासाठी उपयुक्त असलेल्या इंदिरा किटचे वितरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.येत्या जानेवारी २०२६ पासून म्हणजेच पुढील वर्षापासून बीपीएल शिधापत्रिका धारकांना याचा लाभ मिळणार आहे. याबाबत राज्याचे अन्न व नागरी पुरवठा खात्याचे मंत्री के.एच.मुनियप्पा यांनी सुतोवाच केले आहेत. यामुळे इंदिरा किटची प्रतीक्षा संपली आहे.**



राज्य सरकारने निवडणुक कालावधीत अन्नभाग्य योजनेंतर्गत तांदुळ पुरवठा करण्याची घोषणा केली होती. मात्र, आता तांदळाचा काळाबाजार होत असल्याचे कारण सांगून तांदळाऐवजी इंदिरा किट देण्याचा निर्णय घेतला आहे.या किटमध्ये एक किलो साखर, मीठ, तूरडाळ, एक लिटर खाद्यतेल, १०० ग्रॅम चहा पावडर, ५० ग्रॅम कॉफी पावडर आणि दोन किलो गहू या पदार्थांचा समावेश राहणार आहे. एका किटसाठी किमान चारशे रुपये खर्च येण्याचा अंदाज आहे. रेशन दुकानाद्वारे आधार लिंक झालेल्या सर्व बीपीएल शिधापत्रिकाधारकांना या किटचे वितरण करण्यात येणार आहे. याद्वारे इंदिरा किट आणि अन्नभाग्य योजनेच्या ब्रँडचा श्रीगणेशा करण्यात येणार आहे, असेही मंत्री मुनियप्पा यांनी सांगितले.

राज्य सरकारकडून सध्या प्रतिसदस्य बीपीएल शिधापत्रिका धारकांना पाच किलो तांदूळ वितरित करण्यात येत आहे. यामुळे काही कुटुंबांना मासिक ४० ते ५० किलो तांदूळ मिळत असल्याने (आवश्यकतेपेक्षा जास्त) अतिरिक्त तांदळाची खुल्या बाजारात विक्री करण्याचे प्रकार वाढले आहेत. हा काळाबाजार रोखण्यासाठी यापुढे इंदिरा किट देण्याची योजना सुरू करण्यात आली आहे. योजना राबविताना आरोग्याच्यादृष्टीने विचार केला आहे.

यामुळे सरकारी तिजोरीवर मोठा भार पडणार असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. प्रारंभी प्रायोगिकरित्या योजना लागू करण्यात येणार आहे. नंतर या योजनेचे मूल्यमापन करून संपूर्ण राज्यात विस्तार करण्यात येणार आहे. किटसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंची खरेदी राज्य नागरी पुरवठा निगमद्वारे किंवा अन्य एजन्सीद्वारे खरेदी करण्यात येणार आहे. इंदिरा किटमुळे तांदळाची होणारी नासाडी, काळा बाजार यावर आळा बसण्याची शक्यता आहे.तर शिधा पत्रिकाधारकांना सोयीचे ठरण्याचा विश्वास खात्याच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.



बोरवडे : प्रश्नमंजुषा स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळविलेल्या विद्या मंदिर बोरवडे शाळेच्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देताना मान्यवर.

## तालुकास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत विद्यामंदिर बोरवडे शाळेचे यश

बिद्री,ता.१३(प्रतिनिधी)-

**कागल तालुकास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत विद्यामंदिर बोरवडे शाळेने सुयश मिळविले. प्रश्नमंजुषा स्पर्धेत शाळेच्या संघाने तिसरा क्रमांक मिळविला.**

या संघात प्रज्योती पोवार, ऋतिका कांबळे, अक्षरा फराकटे यांचा समावेश होता तर कथाकथन स्पर्धेत आराध्या प्रदीप सुतार या विद्यार्थिनीने तालुक्यात तिसरा क्रमांक मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक जयसिंग पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य यांचे प्रोत्साहन मिळाले तर अध्यापक शशिकांत रानमाळे, नारायण वारके, दिपाली गुरव यांचे मार्गदर्शन मिळाले.

## पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

## * खरेदी विक्री *

**शाहू पुतळ्याजवळ** डिसेंट कॉलनीत स्वतंत्र बंगला विकणे आहे. जागा २८०० चौ. फूट बांधकाम २८०० चौ. फूट लाईट, पाणी कनेक्शन, कारशेड, कंपाऊंड, सिक्युरिटी रूम, टेरेसछत सर्व सोयीनियुक्त. संपर्क–८८३०५०९२६०, एजंट क्षमस्व.

**माणकापूर गावात** लाईट पाण्याची सोय. एनए डिजीटल उतारा प्लॉट विकणे. ६५०, १०००, फूटाचे प्लॉट दर ७५०/– मोजकेच प्लॉट शिल्लक–९३७०५८१००८

**२ गुंठ्याचे २ प्लॉट** ३० फूटी रोडटच विकणे आहेत. २७X७५ जवाहरनगर, जोतीबा मंदिरजवळ, इचलकरंजी. संपर्क–७७४१०४१४१५

**२ बीएचके** सर्व सोयीनियुक्त फ्लॅट विकणे आहे. सनसिटी, यड्राव. संपर्क–९४०५५८४७३३

**कपडे वाळवण्याचे सिंगल** पाईप खाली–वरती करता येणारे हॅंगिंग स्टॅण्ड, डासांची जाळी, स्लाईडींग विंडो, किचन ट्रॉली, कबनूर जाळी, राहुल– मो. ७५०७७१६६६४, ७५०७७२६६६४.

**द सेंट्रल टॉवर.** सुंदर बागेजवळ, पीएनजी पासून जवळ १५०० स्क्वे. फूटाचे आरसीसी ४ हॉल विक्री अथवा भाडे तत्वावर देणे. बेसमेंट गाळा ४०० फूट संपर्क– ८४५४०४०००७, ९८६०८५८९९४

**एन.ए. प्लॉट विकणे**– कलेक्टर व तहसिल कबनूरमध्ये जयहिंदनगर दत्तनगर, फॅक्टरी मागे, हॉटेल पॅराडाईज व गुडलकसमोर, गणेश मंदिर मागे, इचलकरंजी. मो. ८४४९९६५६९९, ९८९०२७४१७६.

**१ बीएचके फ्लॅट** अर्जंट विकणे आहे. इशा अपार्टमेंट, इचलकरंजी. मो. ९५२७९४०१४६.

**वर्ष समाप्ती धमाका**– जुन्या किचन ट्रॉलींनी त्रस्त आहात? मग चिंता सोडा The Famous किचन सम्राट घेऊन आले आहे. २०२५ मधील लेटेस्ट तेही जुन्या किचन ट्रॉली रिप्लेसमेंट करून भरघोस परतावा देऊनच मग विचार कसला करताय? आजच कॉल करा. किचन सम्राट, इचलकरंजी. मो. ९८२२२४३६९३.

**ज्युपीटर २०१९ मॉडेल** एक हाती, महिला वापरत असलेली विकणे. दोन्ही टायर, बॅटरी, सीट नवीन. संपर्क– ८२६२८३८९८३, ९३७११३३१७१.

**२ बीएचके फ्लॅट विकणे आहे.** सर्व सोयीनियुक्त तुळजाभवानी अपार्टमेंट, शहापूर. संपर्क–९८८१४५३७९१

**स्क्रॅप विकणे आहे.** कापडी चिंध्या, हिटलॉन, वेस्टेज स्पंज स्क्रॅपमध्ये विकणे आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी. ९८८१७५६०५२, इचलकरंजी.

**फ्लॅट विकणे आहे.** ४ व्हिलर पार्किंगसह संपर्क–७८४१९६६१६१

**विकणे आहे.** शेवाळ्या मशीन व चटणी कांडप मशिन विकणे आहे. संपर्क–८४३२५२०२५४

**व्हीएमसी मशीन पाहिजे.** संपर्क– ९४२३०४१०२०

**घर विकणे**– ५०० स्क्वे. फूट (१२॥X४०) आरसीसी ३ मजली सर्व सोयीनियुक्त शहराच्या मध्यवस्तीत लायकर गल्ली, इचलकरंजी. फोन–७०३५५११७११

**प्लॉट विकणे आहे.** पार्वती इंडस्ट्रियल इस्टेटच्यासमोर मरूद्यान ढाब्याच्या पाठीमागील बाजूस १ गुंठा प्लॉट विकणे आहे. संपर्क– ८०१०८२४०७४

**विकणे आहे.** शाहूनगर चंदूरमध्ये ५ गुंठा जागेमध्ये २४ मागाचा कारखाना शेड आणि घर विकणे. पूर्वमुखी, १९ एचपी लाईट. ९१७२५७३१८२

**सुंदर बागेजवळ** चालू स्थितीतील कॅफे मेन पॉंईटस सर्व सेटअपसह विकणे आहे. संपर्क– ९०२८७५१९९३.

**अर्जंट ३ बीएचके** आरसीसी घर विकणे आहे. जवाहरनगर, ठाकरे चौक, शिक्षक कॉलनी संपर्क– ७२४९१९६२११

**माणगाववाडी हद्दीमध्ये** माणगांव लक्ष्मी इंडस्ट्रिज डांबरी रोडटच रहिवाशी झोन व पूर्वेस नियोजीत समृध्दी महामार्गालगत गुंतवणूकीस फार्म हाऊस, लॉजिंगसाठी योग्य शेतजमीन योग्य विकणे आहे. संपर्क–७५५९१३३१९६

**फार्म हाऊस विकणे आहे.** जागा साडेदहा गुंठा, पूर्ण डेव्हलप, २ बीएचके स्विमिंग पूल, लॉन गार्डन. पत्ता–राजमाने हायस्कूलमागे, रूई. संपर्क–मालक–९९६०६०७८६८, केअर टेकर–९८६०४०५७०४

**२ बीएचके,** फ्लॅटपेक्षा कमी किंमतीत स्वतंत्र बंगला रेडी पझेशन उपलब्ध. पत्ता– पोद्दार इंटरनॅशनल स्कूलजवळ, सांगली रोड, यड्राव संपर्क–९१७२८२४५२८, ९७६३४७७७९९

**जुने व नवे पॉवरलूम** घेऊ व देऊ तसेच फवारा, कांडीमशिन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क– ८३१७२९१००८

## * भाड्याने देणे/घेणे *

**पेट्रोल पंपावर खाद्य** व्यवसायाकरीता जागा भाड्याने देणे आहे. संपर्क– ८३८०८११९८८.

**घर गहाणवट देणे**– २ खोल्यांचे सर्व सोयीनियुक्त पाटील मळा, सहकारनगर, बस स्टॉप समोर. संपर्क– ९१३९१६०४२६.

**मेन रोड हिरापन्ना** लस्सीसमोर आरोमा बेकरीशेजारी गाळा भाड्याने देणे आहे. (व्यवसायासाठी उपयुक्त) संपर्क–९०३९६९३९६९

**१ बीएचके आरसीसी** सर्वसोयीनियुक्त भाड्याने देणे. कबनूर. संपर्क–८६६८८४२८१४, ९५११९८४७६९

**कॅबसन हॉटेलशेजारी** हॉटेल व्यवसाय, शोरूम इलेक्ट्रॉनिक्स, फर्निचर इत्यादीसाठी जागा भाड्याने देणे आहे. संपर्क–९०३९६९३९६९

**सर्व सोयीनियुक्त** आरसीसी गोडाऊन भाड्याने देणे आहे. गारमेंट व इतर व्यवसायासाठी संपर्क– ९५९४७५१२०१.

**भाड्याने देणे**– ६०० फुट बेसमेंट माळी कॉलनी, टाकाळा कोल्हापूर, रोहिनी वांच्छाणी. मो. ८४२१८८५५०३.

**३०X५० स्क्वे. फुट** शेड, वायडिंग, लेथ गारमेंट, गोडाऊन करीता भाडे तत्तावर देणे आहे. पत्ता– आभार फाटाजवळ. मो. नं. ८०८७३६६०१८.

**शेड भाड्याने देणे**– १८०० स्क्वे. फुट सर्व सोयीनियुक्त गोडाऊन गारमेंट इतर वापरासाठी १९ एच.पी. लाईट कनेक्शन, दत्तनगर, कबनूर. मो. ९८५०५७६३१४.

**भाड्याने देणे**– मंगळवार पेठ, गांधी परिसरामध्ये सर्व सोयीनियुक्त २ रूम भाड्याने देणे. संपर्क– ९९२१२९९१५०, ९८८१८१४२८७.

**गाळा भाड्याने देणे**– मेन जनता चौक ते शाहू कॉर्नर येथे १०X१० गाळा. मो. ९५५२९१६३११.

**गहाणवट / भाड्याने देणे**– शहापूरमध्ये सर्व सोयीनियुक्त सेकंड फ्लोअरवर स्वतंत्र वन बीएचके बोरींग, आझादनगरमध्ये एक गुंठा प्लॉट विकणे. मो. ८३९०९२८०११.

**दुकानगाळा भाड्याने देणे**– ९०० स्क्वे. फूट रिंगरोड गोल्डन टॉवर महासत्ता चौकाजवळ, शोरूम/वित्तीय संस्था. संपर्क– ९८२२५९७४९७

**शेड भाड्याने देणे आहे.** १२ एअरजेट किंवा १६ रॅपिअर लूम बसतील. ३ फेज लाईट उपलब्ध. तारदाळ–इचलकरंजी. संपर्क– ९१७५६८७०७३, ९८८१३४१७५८

**प्राईम लोकेशनमध्ये** राधाकृष्ण चौक रॉयल प्लाझामध्ये २४० स्क्वे. फूट गाळा सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. कांबुरे–८३८०८०६८६८

**सर्व सोयीनियुक्त** फूल्ल कंडिशनमध्ये सलून भाडे तत्वावर अर्जंट देणे आहे. संपर्क–संगमनगर– ८६६९००५२९०

**२ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे आहे. सांगली नाका एरियामध्ये फक्त शाकाहारी कुटूंबासाठी संपर्क– ९४२०९७२८१७

**सेकंड फ्लोअर वर** सर्व सोयीनियुक्त २ बीएचके भाड्याने देणे आहे. पत्ता– कोल्हापूर रोड, जिव्हाजी भवनसमोर, डॉ. परदेशीजवळ, कर्मवीर मल्टीस्टेट पात्र संस्थेच्या वर इचलकरंजी. फोन– ९८८१८६१९०८

**गाळा भाड्याने देणे**– ८X२० फुट जनता बँकेजवळ, शाहु कॉर्नर येथे. संपर्क– ९४२११०८०८५, ९०२१७६९५९६.

**सर्व सोयीनियुक्त** चार रूम भाड्याने देणे. (स्लॅपचे) सांगली नाका, इचलकरंजी. फोन– ९०११४४२६४८, (फक्त शाकाहारी)

**गाळा भाड्याने पाहिजे.** मासे विक्री व्यवसायासाठी तयार गाळा किंवा शेड हवे आहे. ६०० ते ८०० स्क्वे. फूटपर्यंत असावा, पाणी तसेच ड्रेनेजची सोय असावी. संपर्क– ९८९०६९५९९८, ९२८४१५७३७८

**भाड्याने देणे.** ८०० स्क्वे. फूट व २०० स्क्वे. फूट गाळा सांगली रोड, ज्योती लक्ष्मीनगर, इचलकरंजी. ८३२९०६००८७

**दुकानगाळा भाड्याने देणे**– ४०० स्क्वे. फूट आरसीसी चौगुले डेअरीसमोर, व्यंकटराव हायस्कूलजवळ, इचलकरंजी. फोन–९१४५५४२८०१

**फ्लॅट भाड्याने देणे.** २ बीएचके सर्व सोयीनियुक्त फर्निचरसह फक्त शाकाहारींसाठी भोने माळ, इचलकरंजी. फोन–८४२१७८८७६०

**भाड्याने देणे**– इचलकरंजी–कोल्हापूर रोडवर १ एकर जागा व कबनूर फॅक्टरी रोडवर १५०० स्क्वे. फूट शेड भाड्याने देणे. संपर्क– ८३२९५७०२६६, ८३२९७९१२३२

**शेड भाड्याने** किंवा गहाणवट देणे. ६०X५४ आरसीसी सर्व सोयीनियुक्त पाणी व सीसीटीव्ही, संडास, बाथरूम ऑफिससहीत. संपर्क– ९७६४७८१५८३, ९८५०६१७१५१, इचलकरंजी.

**भाड्याने देणे.** विकली मार्केटमधील पहिल्या मजल्यावर १२०० स्क्वे. फूट आरसीसी गाळा भाड्याने देणे. संपर्क–श्रेणिक भोसले– ९८५०२२२००८, इचलकरंजी.

**आरके सिनेमामधील** ४००० स्क्वे. फूट ग्राऊंड फ्लोअर ३००० स्क्वे. फूट फर्स्ट फ्लोअर भाड्याने देणे आहे. संपर्क–९५४५४५८५९५

**३००० व २००० स्क्वे.** फूटाचे शेड गोडाऊन व इतर व्यवसायसाठी भाड्याने देणे. ३० फूटी रोडटच वैरण बाजारजवळ, लक्ष्मी मंदिरसमोर, इचलकरंजी. फोन– ९०९६९४८८०१

## बोअरवेल विषयक

**गंगा आली रे अंगणी**–श्री गणेश बोअरवेल ६.५ इंची बोअरवेल खुदाई करून मिळेल. संपर्क– ९८२२७७७२२६, ९४२२७५२४५६

**चौगुले बोअरवेल**–४३ वर्षांची परंपरा आमचेकडे एक दिवसात ४॥। व ६॥ इंची बोअरवेल मारून सबमर्सिबल पंप बसवून मिळेल. संपर्क–डॉ. संजय चौगुले, जुन्या स्टॅण्डसमोर, स्टेशन रोड, इचलकरंजी. मो. ९३२५१४६८८४

**चौगुले बोअरवेल जयसिंगपूर**– घरासाठी ४॥। इंची व शेतीसाठी ६॥ इंची बोअर मारून मिळेल. संपर्क–९९६०१०५४२१

## कर्ज विषयक

**श्रीशा फायनाशियल**,सोल्युशन, इचलकरंजी व परिसरामध्ये सर्व प्रकारचे कर्ज प्रकरणे कमीत कमी कागदपत्रात व वेळेत करून देणारी एकमेव कंपनी. संपर्क– ९१७२३८३५४८.

## यात्रासहल

**सुरभी टूरिझम, इचलकरंजी.** दररोज अक्कलकोट फक्त १०५०/– मध्ये फेब्रुवारी महिन्यात नेपाळ, २५,७००/– वैष्णोदेवी–७५००/–, प्रत्येक महिन्यात गिरनार यात्रा १६,७००/–, अयोध्या, काशी प्रयाग १५,०००/– संपर्क– ७३९१९६६०१९

**ओम गणेश ट्रॅव्हलर्स**– पूर्व उत्तर भारत, जगन्नाथपुरी, गंगासागर, दार्जिलिंग, नेपाळ, काशी, अयोध्यासह २३ दिवस, ५ फेब्रुवारी २०२६, निवास, भोजनासह २४,५००/–. संपर्क–नंदकुमार शिंदे–९८८१३४६६५४, ८६२३८३७९९६

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी–विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे–घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

## छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद

## * नोकरी विषयक *

**इंजिनिअरींग फिल्डमध्ये** कॉस्ट अकौंटींगचे काम करत असणारा (लेडीज किंवा जेन्टस्) हवा आहे.संपर्क–आर.व्ही.कुलकर्णी. ९४२२५८२०८८,९९२२००१६०२. Mail-r.v.kulkarni@gmtcpl.com.

**शिलाई कामगार पाहिजे**– शिकायला ३००० पगार मिळेल. पायल बॅग्ज मेन रोड, इचलकरंजी. मो. ९३२५२२९६१९, ८२०८४७७२०२.

**कामगार पाहिजेत**– अर्जंट अनुभवी ११०००/– शिकाऊ – ९००० समक्ष भेटा– पंचगंगा सर्व्हिसिंग सेंटर, स्टेशन रोड, माणिक स्टीलसमोर, इचलकरंजी.

**कामासाठी मुले** पाहिजेत वेळ– दुपारी २ ते रात्री ११ पत्ता– इचलकरंजी. मो. ८५३०३९५९६०.

**श्रीशा फायनाशियल** सोल्युशन ऑफिससाठी लेडीज स्टाफ पाहिजेत. संपर्क– ९१७२३८३५४८.

**समर्थ जॉब प्लेसमेंट** सर्व प्रकारच्या नोकरीसाठी ऑफिसबॉय सेल्समन, सेल्सगर्ल, बॅक ऑफीस क्लार्क, सिक्युरिटी गार्ड. मो. ९५५२८९०७०९.

**इलेक्ट्रॉनिक शोरूममध्ये** बॅक ऑफिससाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत. एक्सलशीट येणे आवश्यक. संपर्क– ९२२६८८१४७०.

**ऑफिस कामासाठी** लेडीज पाहिजे कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. संपर्क– आर्यन डायग्नोस्टिक्स, खोतवाडी. मो. ९३७१७१८००१.

**Required** - Junior Accountant (Male/Female) for sales Purchase/ data entry, Banking Knowledge for Textile unit. Exp.1-3 Years. Lab Asst. Female. B.Sc. Chemistry. Contact - 7720018406.

**बिअरबारमध्ये** अर्जंट वेटर पाहिजे– संपर्क– ९८८१९५७०५५, ९५४५३९०९०८

**मोटर स्कूलमध्ये** ऑफिस कामासाठी मुलगी हवी. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९८२२३५११२७.

**शेती प्रक्रिया** कारखानासाठी कामगार पाहिजेत. दिवसा रात्री पगार १० तास ५००, १२ तास ६०० सांगली– कोल्हापूर रोड, निमशिरगांव फाट्याजवळ, मो. ८४८४९८१३०१, ८०८७७६६७३३.

**हॉटेल लॉजिंगमध्ये** पुरूष/ महिला पाहिजेत. साफसफाई, रूम बॉय नॉईट मॅनेजरसाठी राहणेची सोय. मो. ८४८४९८१३०१.

**ड्रायव्हर पाहिजे**– जयसिंगपूर येथे ४ व्हीलर लोकल ड्रायव्हींगसाठी तसेच अकौंटींगसाठी पार्ट टाईम पुरूष/ महिला पाहिजे. संपर्क– ८४८४९८१३०१.

**सोलार कामासाठी** कामगार पाहिजे. तसेच सोलार कामासाठी सेल्समन नेमणे आहे. संपर्क– ८६६८८२४०९८ इचलकरंजी.

**ड्रायव्हर पाहिजे**– LMV TR लायसन्स आवश्यक. कारसाठी निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क– ९८९०८७३३३३.

**अनुभवी $CO^2$ वेल्डर व** फिटर पाहिजे. डेव्हलपमेंट कामासाठी. संपर्क– ९८९०८७३३३३.

**अर्जंट सिक्युरिटी गार्ड भरती**– हातकणंगले लक्ष्मी इंडस्ट्रीज, १२ तास ड्युटी, ३० तास १५००० पगार. संपर्क– ८३०८८७७६६०, ७२४९२६८३०१.

**फ्रेशर्स हवे** (मुले/मुली) कॉम्प्युटर टीचर बन, शिका–शिकवा आणि कमवा. तात्काळ शिक्षण+ उत्पन्न संधी. संपर्क– ९८६०१४६९७०.

**घरबसल्या,** विनागुंतवणूक काम करून दररोज ५००/– रुपये कमविण्याची सुवर्णसंधी. दररोज पगार मिळेल. सरकारमान्य कंपनी. मो.९११२४१३६७३.

**बारमध्ये कामासाठी** वेटर पाहिजेत. डायमंड बार, चिनार सोसायटी, सांगली नाका, इचलकरंजी. मो. ९८२३६१३४१५

**इचलकरंजी येथील** प्युअर व्हेज हॉटेलमध्ये सफाई कामासाठी महिला व शिकाऊ मुले भरती करणे आहे. कामाची वेळ–दु.३ ते ११. रहाणेची व जेवणाची सोय. संपर्क– ७८८७५५१३२९

**टर्नर पाहिजे.** प्रोडक्शन कामाकरिता स्किल्ड, सेमी स्किल्ड टर्नर पाहिजेत. संपर्क– ८१५१९९९१७१

**CNC** ऑपरेटर पाहिजे. ५ जागा, पगार–१६०००/– पार्वती इंड. इस्टेट, प्रगती सीएनसी संपर्क– ९९७०५७८१०८.

**फर्निचर शोरूममध्ये** कायमस्वरूपी हुशार व गरजू मुले पाहिजेत. १२०००/– पगार. प्रत्यक्ष भेटा– ८६०३१५१५१५.

**आईस्क्रीम पार्लरमध्ये** कामगार पाहिजे. वेळ–१०.३० ते ६.००. पत्ता–स्टेशन रोड, जुना नाका, इचलकरंजी. फोन–९७६६०११३०३

**चष्म्याच्या दुकानासाठी** सेल्समन पाहिजे. अनुभवी/शिकाऊ , शिकाऊ पगार ८ ते १० हजार, अनुभवींसाठी अनुभवाप्रमाणे २० हजार पर्यंत. पत्ता– भिडे गोरे कंपनी राजवाडा चौक, इचलकरंजी.

**ड्रायव्हर पाहिजे**– छोटा हत्ती, मालक वाहतूक गाडीवर लायसन धारक (LMV-TR) अनुभवी व हुशार ड्रायव्हर पाहिजे. संपर्क– ९८९०२२०९४३,, ७५१७५०६६८२.

**रूम बॉय पाहिजे**– इचलकरंजीमधील लॉजमध्ये रूम सर्व्हिस करणेसाठी सुशिक्षित कामगार पाहिजे. संपर्क– ८६६८२१९७६३, ९८६०५७०४०४.

**अकौंटंट पाहिजे**– बी.कॉम टॅलीची माहिती असणारे लेडीज/जेंटस् व कॉम्प्युटर रिपेअरीसाठी हार्डवेअर इंजिनिअरक पाहिजे. संपर्क– टर्बो कॉम्प्युटर्स, इचलकरंजी. मो. ९३७००१२६८२.

**ड्रायव्हर पाहिजे**– डिलेव्हरी ड्रायव्हर व हेल्पर मुले पाहिजेत. संपर्क– ७५८८९२०६३०.

**घरबसल्या काम करून** दिवसा कमवा ५०० ते १००० रु. संपर्क– ८४२१६६३३३२. प्रेम चव्हाण सर.

**खंजिरे इंडस्ट्रीयल** इस्टेट एअरजेट खात्यामध्ये दिवसपाळी व रात्रपाळीसाठी २ वॉचमन पाहिजेत. लिहिता, वाचता येणे आवश्यक. समक्ष भेटा– ९१५६७७८८४८.

**पाहिजे**– कपड्याच्या शोरूममध्ये सेल्समन– २ जागा. आकर्षक पगार. जनता बँकेजवळ, इचलकरंजी. मो. ८६६८९४५३५५.

**पाहिजे**– पार्ट टाईम/ फुल टाईम अनुभवी डेंटीस्ट आवश्यक आहे. संपर्क– सोमेश्वर डेंटल क्लिनिक, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९९७५६१०११४. ९१७५९४०११४.

**टू व्हिलर शोरूमकरिता** टू व्हिलर मॅकेनिकल शिकाऊ मॅकेनिकल साफसफाई करिता कामगार पाहिजेत. अर्जासह भेटा. ओम मोटर्स, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**ड्रायव्हर पाहिजे.** अनुभवी पूर्ण वेळेकरीता लायसन्स अर्जासह भेटा व ओम मोटर्स शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**फॅब्रिकेशन कामासाठी** वेल्डर–१, हेल्पर–१ शिकाऊ कामगार–२, आकर्षक पगार, दत्तनगर, शहापूर रोड संपर्क–९६०४२७३००७

**एका नामांकित बॅंकेमध्ये** व्यवसाय वृध्दीसाठी सेल्स एक्झीक्युटिव्ह त्वरीत नेमणे आहेत. संपर्क–गजानन सर–९९७५८३०८८७

**कामगार पाहिजे.** बांधकाम साईटवरील वरकामासाठी शिकाऊ गवंडी/कामगार पाहिजे. संपर्क– ८१८००४६०६०, मेसेज करावा.

**दवाखान्यातील कंपौंडर** कामासाठी मुले व मुली पाहिजेत. डॉ. परदेशी दवाखाना, जिव्हाजी मंदिराजवळ, कोल्हापूर रोड, इचलकरंजी.

**ऑफिस कामासाठी** लेडीज पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान व अकौंटींगची माहिती असणे आवश्यक. हॉलमार्क शटर्स पार्वती इंडस्ट्रियल इस्टेटजवळ, संगमनगर संपर्क– ८६९८१०२७२७

**इलेक्ट्रॉनिक्स शॉपमध्ये** लेडीज किंवा जेन्टस हेल्पर पाहिजे. संपर्क– ९४२०७७६४६०

**सायझिंगसाठी** वार्पर पाहिजेत. संपर्क–९३५९०८६६७२, ९५०३६०३००८

**वेल्डर पाहिजे.** (शिकाऊ चालतील) अनिकेत सर्व्हीसेस, शाहूनगर, गल्ली नं.१, चंदूर. मो. ९७६२८०४९५६

**पाहिजे.** टेक्स्टाईल कंपनीत प्रॉडक्शन आणि क्वॉलिटी प्लॅनिंगसाठी (PPC) अनुभवी दिवाणजी पाहिजे. सांगली रोड, हीरो शोरूमजवळ. ८४५९२०४०८१

**टेलिकॉलिंग महिला** (बेसिक कॉम्प्युटर) नॉलेज ८ तास हेल्पर (७ ते ८) पगार–१० हजार. साफसफाई लेडीज अर्जंट पाहिजेत. संपर्क– ९५०३२३३१००

**पाहिजेत.** साध्या मागाच्या कारखान्यात साफसफाई करणेसाठी कामगार पाहिजे आहे. संपर्क– ८६९८५८०१८९, ८२३७२३४२३४

**इचलकरंजी येथे** मध्यवर्ती पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजेत. ड्युटी ८ तास, जेन्टस व लेडीज. कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी. फोन– ८३२९०२८१४४

**त्वरीत पाहिजे.** जेंटस शिकाऊ किंवा अनुभवी शिफ्ट प्रॉडक्शन व क्वॉलिटी सुपरवायझर बी.एससी केमिस्ट्री. आकर्षक पगार व पी.एफ व ईएसआयसी सुविधा. श्री लक्ष्मी को–ऑप इंडस्ट्रियल इस्टेट, हातकणंगले. संपर्क–८५३००७१२१०

**रिटायर्ड आहात?** आता आयुष्यात राहिलेली स्वप्ने पूर्ण करा! गव्हंमेंट– पार्ट टाईम काम. मर्यादित जागा. वयोमर्यादा ४० ते ७० संपर्क–मो. ८८८४९८०२३०

**शॉपमध्ये कामासाठी** लेडीज पाहिजेत. जवाहरनगरमध्ये खोल्या सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. संपर्क–९९६०६२२४०८

**पिटर इंग्लंड व जॉकी** शोरूममध्ये सुशिक्षित मुली पाहिजेत. कामाची वेळ–सकाळी १० ते रात्री ९.३० जेवणाची सुट्टी–दुपारी १.३० ते ५.००, पगार–१०,००० ते १२०००. भेटा– व्यंकटराव हायस्कूल रोड, युनियन बँकेसमोर, इचलकरंजी.

**पिझ्झा आऊटलेट** किचनमध्ये कामासाठी शेफ, हेल्पर पाहिजे व बिलींगसाठी मुलगी पाहिजे. अनुभवींना प्राधान्य. संपर्क– ७२७६११७३९०, ८४२१४०८१९७

**यड्राव–तारदाळमधील** नामवंत कंपनीत कामगार पाहिजेत. * ITI-Diploma-फ्रेशर (मेल/फीमेल) * १० वी, १२ वी अनुभवी–CNC-ऑपरेटर. किमान जागा–३०, वेतन–१४००० ते १६००० पर्यंत. मो. ९१३०३९१९०७, ८७८८३२८२२८

**हातकणंगले येथील** नामांकित कंपनीत कामगार भरती चालू आहे. * हाऊस किपींग–२० जागा. * पगार–११,५०० ते १२००० पर्यंत. * मो. नं. ८८८८६६१२७० * सिक्युरिटी गार्ड–१०. संपर्क– ९८३४५७४९०६

**बस ड्रायव्हर पाहिजे.** एरिया– यड्राव/तारदाळ/इचलकरंजी. मो. नं. ९१५८८८७१७८, ७०५७९०१४९०

**बिझनेस, पर्सनल लोन,** होमलोन, प्रॉपर्टी लोन वाटप करणेसाठी गरजू सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजेत. संपर्क–९६५७१६३९८१

**लेडिज कामगार पाहिजे.** हुशार व गरजू आयुर्वेदिक क्लिनिक, गांधी पुतळा, इचलकरंजी. फोन– ७३८५११२०३९

**त्वरीत पाहिजे.** स्पेअर पार्ट इन्चार्ज, सेल्समन टेक्निशियन टेलिकॉलर ऑफिसबॉय पीडीआय इन्चार्ज ड्रायव्हर पाहिजेत. चेतक, इचलकरंजी. मो. ८९५६२६१५०३

**बिअर शॉपीमध्ये** कौन्टरवर हुशार कामगार पाहिजे. संपर्क– ९८२२५७८६००

**१) ट्रॉब व सेंटरलेस** ग्रायडिंग मशिनवर पुरूष/महिला अनुभवी किंवा शिकाऊ कामगार पाहिजेत. भेटा. श्री गजानन इंडस्ट्रिज, शहापूर, तारदाळ नाका, शहापूर. संपर्क– ८२०८१६९६४७

**अनुभवी व्हीएमसी ऑपरेटर** व सुपरवायझर पाहिजे. आकर्षक पगार, गणेशनगर, ७ वी गल्ली, इचलकरंजी. फोन–९४२३०४१०२०, ९७६३४१४३३८

**लेथ मशिनवर** रिपेअरी कामाकरिता टर्नर, वेल्डर, हेल्पर पाहिजेत. संपर्क–९२०९०६०१४३, ९९२२४९९५१४

**डॉक्टर पाहिजेत.** (MO) (B.A.M.S./B.H.M.S) स्पंदन हॉस्पिटल, वखारभाग, इचल. मो. 8421426685

**ज्वेलर्स शोरूममध्ये** अनुभवी सुशिक्षित गरजू सेल्समन, सेल्सगर्ल पाहिजे. शिक्षण–१२ वी किंवा बी.कॉम, कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. आकर्षक पगार. पत्ता–आझाद टॉकीजजवळ, इचलकरंजी. मो. ९४२१८४८४८६

**पाहिजेत.** बेकरी माल पॅकिंग कामासाठी महिला हवी आहे. येणे व जाणेसाठी गाडीची सोय आहे. फोन– ९७६६२५६६५५

**CNC/VMC** स्किल्ड ऑपरेटर पाहिजेत. CNC- २ जागा, VMC- २ जागा. संपर्क–श्री सिध्देश्वर इंडस्ट्रिज, वॉर्ड नं. २३, प्लॉट नं. ३८७, खंजीरे इंडस्ट्रिज इस्टेट, शहापूर–इचलकरंजी. फोन– ९५९५७२७४७४, ७०२६७४७४०९

**पाहिजेत.** वेल्डर, हेल्पर, पुरूष/स्त्रिया, शिकावू/अनुभवी. संपर्क– हॉलमार्क–शहापूर–इचल. ९४२३२७५२३२

**बेकरी शॉपीमध्ये** कामासाठी मुले पाहिजेत. बालाजी बेकरी एएससी कॉलेजजवळ संपर्क– ९९६००२८२८९, ७२७६१२७१११

**डेव्हलपमेंट कामासाठी** ड्रीलर–१, फॉलोअर–१, प्रोडक्शन लाईनसाठी व्हीएमसी ऑपरेटर, कामगार ५ जागा व जनरल वर्कसाठी–३ जागा भरणे आहेत. संपर्क– ९८९००६९५९८, ८६६९५९३६१७

**BSC (Chemistry)** १२ वी सायन्स मशिन ऑपरेटर हॉलमध्ये सेंटरमध्ये पाहिजे. (लेडीज/जेंटस) संपर्क–९६८९२२८२६१, ९८५०१६६९३३

**कापड पेढीवर** कामासाठी दिवाणजी पाहिजे. संपर्क–९४०४२५७८०६, ७४४७३४५०६६

**अर्जंट** फिरतीची आवड असणारा जेंटस पाहिजेत. स्वत:ची टू व्हीलर आवश्यक. आकर्षक पगार. संपर्क– ८३२९०९२०६८

**पाहिजेत.** कोरूगेटेड बॉक्स फॅक्टरीत १० वी, १२ वी पास/ नापास शिकाऊ कामगार पाहिजे. अर्जासह समक्ष भेटा. अरूंधती कलर कार्टन्स, प्लॉट नं. ६० ते ६३. पार्वती को–ऑप इस्टेट, यड्राव. फोन–९५९५८४५७७४

**पाहिजेत.** इचलकरंजीमधील नामांकित हॉस्पिटलसाठी खालील जागा भरण्याच्या आहेत. १) वॉर्डबॉय मावशी. पगार–९०००/– फिक्स. २) मेडिकलसाठी फार्मासिस्ट. संपर्क– ९७६७४९६६५४, ९०११६७४२२१

**Wanted-** * Full Time Accountant * B.Com/M.Com. * Experience 5 to 10 years. * Knowledge of IT/GST Must Salary as per Company Rule. Contact-9422043659

**कामगार पाहिजेत.** फॅब्रिकेशन व फ्रेंच डोअर कामासाठी. संपर्क– अन्नपूर्णा इंडस्ट्रिज, झुडीओसमोर, सांगली रोड, इचलकरंजी. फोन– ९१३०२०००४५

**पाहिजे.** दिवाणजी व वसुली कामासाठी अनुभवी जेंटस पाहिजेत. वयोमर्यादा ५० पर्यंत. पत्ता–बडबडे हॉस्पिटलसमोर, जयकिसान पशुखाद्य, इचलकरंजी. फोन– ९४२२०४४२९२, ९५४५६४१६१७

**उडपी हॉटेलमध्ये** जेन्टस व लेडीज वेटर पाहिजेत. संपर्क– ८८८८०८९१२९

**ऑफिस कामासाठी व** अकौंटींगसाठी कॉम्प्युटरचे ज्ञान असलेली लेडीज पाहिजे. संपर्क– अभिजीत ट्रेडर्स–८२०८७३७५७५, माळभाग, तारदाळ.

**लेडीज पाहिजेत.** कॉम्प्युटर ऑपरेटर–१, सेल्स एक्झीक्युटिव्ह– १. आकर्षक पगार, संपर्क– ९५७०५५४५५५

**सिक्युरीटी गार्डस पाहिजेत.** इचलकरंजी करीता ड्युटी ८ व १२ तास. पगार–१०,००० ते १५,००० पर्यंत मिळेल. मो. ९७०२४२४७७२, ९५२९५४५४६८

**बिअरबारसाठी** अनुभवी वेटर व हेल्पर पाहिजेत. संपर्क– ९८५०५९६९६५, ७५८८६२०५०५

**पॅन्टमेकर व शर्टमेकर** पाहिजेत अनुभवी. संपर्क–९३२६९४११७४, ८०१०९४६९२९, कोरोची.

**लेडीज अकौंटंट पाहिजे.** टॅलीचे ज्ञान आवश्यक. अनुभवींना प्राधान्य. संपर्क–९८२२११०३८३

**इचलकरंजी परिसरातील** सर्व प्रकारच्या नोकरी करीता संपर्क साधा. ८८८८९९८७५८

**८०X५२ केंब्रिक पीसी** कामाचा अनुभव असलेले दिवाणजी सायझर, बॅक सायझर भरणे आहे. संपर्क– ८८८८००४४८७

**लेडीज कॉम्प्युटर** ऑपरेटर पाहिजे. वर्ल्ड एक्सेल, पॉवर पॉईंट येणे आवश्यक. संपर्क–९६३१३१६०३०

**सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजेत.** टू व्हीलर शोरूमकरीता सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजेत. जेंटस (३ जागा) व बॅक ऑफिससाठी लेडीज (२ जागा) पाहिजेत. शिकाऊ किंवा अनुभवी अर्जासहीत समक्ष भेटा. बोरगावे टीव्हीएस, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**अर्जंट पाहिजे.** १८ फूटी लेथ मशिनवर टर्नर पाहिजे व हेल्पर पाहिजे. संपर्क– श्री सिध्देश्वर इंजिनिअरींग वर्क्स, इचलकरंजी. ९४२३८६००९१, ७३८७४५७४९०

**प्लंबिंग शोरूममध्ये** कामासाठी कामगार पाहिजेत. सेल्समन–१ जागा, हेल्पर– २ जागा. संपर्क– विनय ट्रेडर्स, हत्ती चौक, इचलकरंजी. फोन–९१७५५०७५९३

**सहारा वाईन शॉप** जयसिंगपूर येथे पार्टटाईम/फूलटाईम अकौटंट व कामगार पाहिजे. संपर्क– ९२२५८०१०७१, ८८८८७२८८३३

**पाहिजेत.** HMC, VMC, VTL मशिन ऑपरेटर–६ जागा. EPF व ESIC सुविधा उपलब्ध. समर्थ मेटॅलर्जीकल्स युनिट ३, तारदाळ. मो. ७०५८५८४२३९, ९९२२९३०७६५.

**वॉचमन पाहिजेत.** पार्वती इस्टेट व इचलकरंजीमध्ये १२ तासासाठी वॉचमन पाहिजेत. संपर्क– ८७९९९५००३३, ८७६७२३३१३४

**पाहिजेत.** पेपर कारखान्यामध्ये लेडीज/जेंटस कामगार, अकौंटींगसाठी टॅली व जीएसटी ची माहिती असणारी लेडीज व आयटी मेकॅनिक पाहिजे. संपर्क– ८०८७३६७४१८

**दवाखान्यासाठी** रिसेप्शनिस्ट पाहिजे. पात्रता–१० वी/१२ वी/ ग्रॅज्युएट/अविवाहीत–जागा २. कामाचे ठिकाण– शारदा होमिओपॅथिक दवाखाना, कल्पना टॉकीजसमोर, मराठा मंडळ इमारत, तळमजला फोन–८००७४३०६५४. भेटणेची वेळ–सकाळी १२ ते २. अर्जासह समक्ष भेटा.

**पाहिजेत.** अनुभवी वेटर व कॅप्टन पाहिजेत. पगार–१५००० महिना. फक्त अनुभवींना प्राधान्य. संपर्क– हॉटेल मुनस्टार, इचलकरंजी. फोन–८८३०१६०५५०, ९५५२९१५३६७

**अकौंटंट पाहिजे**– कॉम्प्युटर अकौंटींगची माहिती असलेले आकर्षक पगार. संपर्क– आनंदी स्विस्टस् ॲण्ड नमकीन टाकवडे. मो. ९८५००८१४४२.

**होलसेल औषध दुकानात** कामासाठी १०/१२ वी झालेली मुले/मुली पाहिजेत. सुशिल फार्मा LLP नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. (संपर्क–११ ते १) संपर्क–९०९६२६१२७२

**टर्नर पाहिजेत.** डेव्हलपमेंट कामासाठी स्किल टर्नर (लेथ मशिनवर) पाहिजे. पत्ता–५२२, शिवाजी नगर, कोरोची. ९६६५९९९८८७, ८७६६७७९११०

**जॉकी एक्सक्लूझिव्ह** इचलकरंजी, आकर्षक पगारासह खालील पदांची भरती करत आहे. पुरूष सेल्सपर्सन, महिला सेल्सपर्सन अनुभवी/ विनाअनुभवी. अमृत प्लाझा, जयहिंद मंडळ मैदानसमोर, इचलकरंजी. संपर्क–९५०३५२१००४

## हॉटेल विषयक

**हॉटेलमध्ये अनुभवी** पार्टटाईम/ फूलटाईम कॅप्टन, वेटर, हेल्पर पाहिजेत. राहणेची सोय, उत्तम पगार, इचलकरंजी. मो. ९०२२७५५१५७

## विवाह विषयक

**ब्राह्मण वधु पाहिजे**– उच्च शिक्षित, मुलीचे वय ३८ ते ४० वर्षे, १२ वी/ बी.कॉम. संपर्क– अरूण म. दंडगे– ९९१६१३४३९८, ६३६०८४१७१६.

**लिंगायत वधु–वर मेळावा** रविवार दि. २१ डिसेंबर, गुरूकृपा मंगल कार्यालय, निपाणी बस स्टॅण्डजवळ, निपाणी–बेनाडीकर. मो. ९८२३९९३४९०.

## कुपोषणामुळेच तब्बल १४.५ हजार बालमृत्यू

**नागपूर,ता.१३–**

**कुपोषणामुळेच बालमृत्यू होत असल्याचा दावा राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार ) चे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. कोट्यवधी रुपये खर्च होऊनही यातून नेमके कुणाचे पोषण होते? असा सवाल करत रोहित पवारांनी राज्य सरकारवर हल्लाबोल केला.**

ते म्हणाले,राज्यात गेल्या तीन वर्षांत तब्बल १४.५ हजार बालमृत्यू हे केवळ कुपोषणामुळं झाले आहेत. सरकारने याची संपूर्ण वस्तुनिष्ठ चौकशी करून बालकांच्या टाळूवरचं लोणी वरपणाऱ्यांचे खरे चेहरे पुढं आणावेत. यापूर्वी अनेक अधिवेशनात कुपोषणामुळं होणाऱ्या मृत्यूचा विषय मांडला, पण केवळ छापील उत्तर देण्यापलीकडं सरकारने काहीही केले नाही. २०२२–२३ ते २०२४–२५ या वर्षात राज्यात कुपोषणामुळे १४ हजार ५२६ बालमृत्यू झाले, अशी कबुली आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत दिली.

## जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन: जिल्हा कोल्हापूर, तहसिल हातकणंगले पैकी मौजे कोरोची येथील गट नंबर ४५० पैकी प्लॉट नंबर ३२ पैकी क्षेत्र १९३० चौ. फुट याचे १७९.३७ चौ.मी.ची खुली जागा मिळकत, यांसी चतुः सीमा: पुर्वेस गट नं. ४४९ ची मिळकत, पश्चिमेस: सदर गट नंबर ४५० पैकी शिल्लक मिळकत, दक्षिणेस: गट नंबर ४४८ बबन शंकर पाटूकर यांची मिळकत, उत्तरेस: रस्ता.

येणेप्रमाणे मिळकतीचे मालक श्री. बाळासो नेमाण्णा बिरनाळे, रा. अ.लाट यांचे मालकी वहिवाटीची असून त्यांनी श्री. देवानंद बापूसो कांबळे, रा. कोरोची यांना करारपत्र लिहून दिलेले आहे व श्री. देवानंद कांबळे यांनी आमचे स्नेहींना सदरील मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगून संचकार रक्कम स्विकारून करारपत्र लिहून दिलेले आहे. त्याप्रमाणे आमचे स्नेही लवकरच खरेदीखत पूरे करून घेणार आहेत.

२) सबब कोणाचे हरकत तक्रार अगर काही हितसंबंध असतील तर ही नोटीस प्रसिद्ध झाले तारखेपासून सात दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी कागदोपत्रानिशी समक्ष येवून भेटून खात्री करून द्यावी. अन्यथा आमचे स्नेही खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. म्हणून दिली जाहीर नोटीस, सही, ता. १३-१२-२०२५ इ.

**श्री. अमित पारीसा वाटेगांवे**

बॉण्ड रायटर,
पत्ता: ४ / २३७, मोठे तळे, इचलकरंजी.
मो. ९९७५४३७१४९.

## जाहीर नोटीस

शहर इचलकरंजी येथील टी.पी.स्कीम नं. २ याचा फायनल प्लॉट नं. १४७ क्षेत्र १३०.०० चौ. मीटर ची बांधीव घर मिळकत. यासी चतुः सिमा- पुर्वेस - २ फुटी बोळ व त्यानंतर भाऊसो कुंभार व आनंदा धारकाडे यांची मिळकत, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - २ फुटी बोळ व त्यानंतर सुनिल पाटील यांचे घर, उत्तरेस- श्री.भाऊसो गुंडा कुंभार यांची मिळकत. सदर मिळकत ही मूळची आयेशाबी इफामुल्लाह अन्सारी रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र करून दिले असून त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करार पत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. १३/१२/२०२५.

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बस स्टॉपजवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील अ) गट नं. ११७ पैकी क्षेत्र हे०.०८.४३ आर व ब ) गट नं. ११८ पैकी क्षेत्र हे. ०.०१.०० आर ची समाईक मिळकत. अ व ब यासी एकत्रीत चतु:सिमा- पुर्वेस- गट नं. ११८ ची मिळकत, पश्चिमेस - भारती पाटील यांची मिळकत, दक्षिणेस-मनोज पाटील यांची मिळकत, उत्तरेस गट नं.११९ ची मिळकत वर नमुद ही अरूण नरसगोंडा पाटील रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकार पावती करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता.१२/१२/२०२५

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बस स्टॉपजवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे खोतवाडी येथील गट नं ८९ /१० पैकी प्लॉट नं १५ चे क्षेत्र १८८५ चौरस फुट ची खुली जागा मिळकत यासी चतु:सिमा- पुर्वेस - प्लॉट नं २, पश्चिमेस - २० फुट रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नं १४, उत्तरेस - प्लॉट नं १६ सदर मिळकत ही श्री सदाशिव सिध्दाप्पा वाली रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असून त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकार पावती करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. १२/१२/२०२५

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बस स्टॉपजवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## बिबट्याच्या हल्ल्यात चिमुकल्याचा मृत्यू

अहिल्यानगर,ता.१३-

**बिबट्याच्या हल्ल्यात चार वर्षाच्या चिमुकल्याचा बळी गेल्याची घटना अहिल्यानगरमधील संगमनेर तालुक्यातील जवळे कडलग या गावात शनिवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली.**

जवळे कडलग येथील चिखली रस्त्यालगत सूरज दिलीप कडलग यांची वस्ती आहे. ते गोठ्यातील जनावरांना चारा टाकत होते. तर आजी गवताचे ओझे घेऊन गोठ्यात गेली होती. त्याचवेळी चार वर्षाचा चिमुकला सिद्धेश कडलग हा घराच्या दारात उभा होता. सिद्धेश एकटा असल्याची संधी साधत गिन्नी गवतात दबा धरुन बसलेल्या बिबट्याने त्याला जागेवरच ठार केले. या घटनेनंतर चिमुकल्याचे नातेवाईक व ग्रामस्थ संतप्त झाले. जोपर्यंत नरभक्षक बिबट्याला ठार केले जात नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही असा त्यांनी पवित्रा घेतला होता. त्यामुळे काही काळ वातावरण तणावपूर्ण झाल्याचे चित्र होते.

## जाहीर नोटीस

ता.हातकणंगले पैकी मौजे तारदाळ येथील गट नंबर ३०४ पैकी भुखंड क्रमांक ६० पैकी पश्चिमबाजूचे चे क्षेत्र ५००-० चौरस फुट ची जागा व यावरील ग्रामपंचायत मिळकत नंबर ५५६८ ने नोंद असलेली बंदिस्त मिळकत सर्व. यासी चतुः सिमा पुर्वेस - ७ फुट रूंदीचा रस्ता, पश्चिमेस माळगी यांची मिळकत,दक्षिणेस - नदाफ यांची मिळकत, उत्तरेस - १५ फुट रूंदीचा रस्ता. सदरची मिळकत सलमान फक्रूद्दीन मुजावर रा. इचलकरंजी यांचे स्वतंत्र मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकार पावती करुन दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. १३/१२/२०२५

**ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे**

३/१५३, देवमोरे वाडा,
टाकवडे वेस, राणाप्रताप चौक,
इचलकरंजी.
मो. ९८८१०१४७२५.

## जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन- जिल्हा व तुकडी कोल्हापूर, तालुका व पोट तुकडी हातकणंगले में सह. दुय्यमनिबंधक सो, इचलकरंजी वर्ग २, इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेतील मौजे कबनूर हद्दीतील क.ग.नं.१०१७/ २ / २ मधील बिगरशेती झालेली मिळकत भूखंड क्र. ७ यांचे क्षेत्र ९५.१६ चौ.मी ची खुली मिळकत. यासी चतु:सिमा पुर्वेस- बडवे व बापू पाटील यांची मिळकत, पश्चिमेस- रस्ता दक्षिणेस- देसाई यांची मिळकत व उत्तरेस- भूखंड क्र.६.

२) वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकतही श्री बाळासो गणपती वाकरेकर हे मूळ मालक असून यांचेकडून सौ जनाबाई बाळासो खुडे व श्री. दिपक बाबासाहेब बावडेकर यांनी वटमुखत्यारपत्र घेवू केलेली मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना त्यांनी दिलेने सदरची मिळकत आमचे अशिलांनी करारपत्राने खरेदी घेण्याचे ठरवून सदर व्यवहारा पोटी संचकार रक्कम अदा केलेली आहे.

३) सबब वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकती बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा तारण गहाण, दान, बोजा, कर्ज, आरक्षण, नोंद बोजा, जप्ती आदेश, मनाई आदेश तसेच वारसा व इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असलेस सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ दिवसाचे आत खालील नमुद पत्यावर आपले लेखी कागदपत्रासह मुदतीत कळवावे. मुदतीत तक्रार वा हरकत ना आलेस आमचे अशिल वर नमुद मिळकतीचा खरेदीपुर्व करारपत्र / खरेदीपत्र पुर्ण करतील मग नंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. म्हणुन दिली जाहीर नोटीस सही ता. १३/१२/२०२५.

**ॲड. सुनिल शंकर देसाई**

९/६८/१, अमराई रोड, शिक्षक कॉलनी, साळुंखे मळा,
इचलकरंजी. मो. ९०११९१००८८.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन- जिल्हा कोल्हापूर तालूका हातकणंगले पैकी इचलकरंजी येथील रि.स. नं. ६८३ / १ (याचा जुना रि.स. नं. ६८३) याचे क्षेत्र हे. १.३०.६० आर, आकार रू. १६.७२ पै., यापैकी बिगरशेती प्लॉट नं. १३ चे क्षेत्र २२३.०४ चौ.मी (२४०० चौ.फुट) (याचे ऑनलाईन ७/१२ प्रामणे क्षेत्र हे ०.०२.९३ आर) ची खुली मिळकत, यासी चतु:सिमा- पूर्वेस - उरणे यांची मिळकत, पश्चिमेस - देसाई यांची मिळकत, दक्षिणेस- रस्ता, उत्तरेस- बागणे यांची मिळकत येणेप्रमाणे चतुः सिमेतील खुली मिळकत त्यातील तदंगभूत वस्तूसह, ईझमेंटरी इक्कांसह सर्व.

२) वरील कलमी वर्णन केलेली मिळकत पुरुषोत्तम रामचंद्र अर्जुनवाडकर यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची आहे. त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेची ठरवून आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकत विक्री योग्य असल्याचा आणि ती निर्वेध व निष्कर्जी असल्याचा तसेच त्यावर कोणताही करार, नसुन तिच्यासंबंधी कोणत्याही न्यायालयात अथवा न्यायाधिकरणात वाद प्रलंबित नसल्याचा आणि मिळकत जप्ती / मनाई यापासुन मुक्त असल्याचा निर्वाळा मिळकतीचे मालकांकडुन देणेत आला आहे. तथापी सदर मिळकतीवर कोणाचा करार, वारसा, तारण, पोटगी, बोजा, कुळ, बक्षिसपत्र, मृत्युपत्र अगर अन्य कोणताही हक्क अगर हितसंबंध असलेस त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली नमूद वकिलांचे पत्त्यावर कागदपत्रांसहीत संपर्क साधून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस आज मुक्काम इचलकरंजी ता. १३/१२/२०२५.

**ॲड.राहुल विलास जाधव**

रा. २०/९९५/१, स्वामी मळा, साईनाथ नगर, गल्ली नं. १,
इचलकरंजी. ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. मो. ९१५६७७८४४५.

## जाहीर इशारा

तमाम लोकांना या जाहीर इशाऱ्याने सूचित करणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन :- जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले पैकी मौजे कबनूर येथील क.ग.नं. ८६२ याचे क्षेत्र हे.आर. ०.०१.०० व पो.ख. ०.०६.०० असे एकूण क्षेत्र हे.आर. ०.०७.०० यापैकी आमचे अशीलांचे मालकीची आठ आणे हिस्सेची शेतजमीन मिळकत तदंगभूत वस्तुसह व इजमेंटचे हक्कासह सर्व.

२) वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत ही आमचे अशील श्री. बापुसो आण्णासो लिगाडे, रा. कबनूर यांचे मालकी कब्जेवहिवाटीची आहे. त्यांनी सदर मिळकत अन्य मिळकतीसह नोंद दस्त क्र. २७३५/१९९३ दि.०२.०७.१९९३ इ. रोजीचे खरेदी दस्ताने श्री. भास्कर गोविंद जोशी व श्री लक्ष्मण गोविंद जोशी तर्फे वटमुखत्यार श्री. मनोहर भास्कर जोशी रा. इचलकरंजी यांचेकडून खरेदी घेतली आहे.. खरेदी घेतलेपासून आजपावेतो मिळकत आमचे अशीलांचे कब्जेवहिवाटीत असून आमचे अशील सदर मिळकतीचा उपभोग घेत आहेत.

३) सदर मिळकतीमध्ये आता श्री. भास्कर गोविंद जोशी व श्री लक्ष्मण गोविंद जोशी अथवा त्यांचे कोणत्याही वालीवारसांचा कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध राहिलेला नाही. तथापि, आमचे अशिलांना नुकतेच असे समजून आले आहे की, श्री. मनोहर भास्कर जोशी, रा. इचलकरंजी हे प्रस्तुत मिळकतीच्या ७/१२ पत्रकी असलेल्या पोकळ नोंदीआधारे सदर मिळकत त्यांचे मालकीची असल्याचे भासवून करार मदार करू पहात आहेत. ७/१२ पत्रकी असणारी सदर पोकळ नोंद रद्द होणेकरिता आमचे अशिल आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करीत आहेत.

४) सबब जाहीर इशाऱ्याने तमाम लोकांना सूचित करणेत येते की, कलम १ यात वर्णन केलेली मिळकत ही आमचे अशिलांचे निर्विवाद मालकी हक्काची आहे. सदर मिळकतीमध्ये आमचे अशीलांशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही. सबब सदर मिळकतीबाबत श्री. मनोहर भास्कर जोशी यांचेशी कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. याउपरही सदर मिळकतीबाबत कोणी व्यवहार केलेस तो सदर मिळकतीवर व आमचे अशीलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक असणार नाही, म्हणून दिला जाहीर इशारा स. ता. १३/१२/२०२५.

**ॲड. आर.एम. मराठे**

कार्यालय : फ्लॅट नं. ६, पॅलेस व्ह्यू अपार्टमेंट, झेंडा चौक,
इचलकरंजी. मोबा. ९९२२८३६३३५

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ३५० पैकी हे. ०.४८.०० आर ची शेतजमीन मिळकत. यासी चतु:सिमा- पुर्वेस - याच गट नं. पैकी मिळकत, पश्चिमेस - चौगुले यांची मिळकत, दक्षिणेस - सरकारी रस्ता, उत्तरेस-मुजावर यांची मिळकत. सदर मिळकत ही मूळची १. कै. रणवीर उदाजीराव चव्हाण म. वा. अ)राजश्री रणवीर चव्हाण, ब) सृष्टी रणवीर चव्हाण व क) मौसमी धैर्यशील रावराणे,२.पोपट पांडुरंग जाधव ३.प्रकाश बापुसो पवार ४. मोहन भाऊराव माने, ५. वहिदा शौकत शेख सर्व रा. कोल्हापुर ६. कै. सुभाष भैरू खोत म. वा. अ) वत्सला सुभाष खोत ब) स्वप्निल सुभाष खोत क) प्रविण सुभाष खोत रा. खोतवाडी ७.संतोष अनंतराव कारंजकर रा. कोल्हापुर ८. सुनिल नामदेवराव चांडोले म.वा.अ)राधा सुनिल चांडोले ब) गौरव सुनिल चांडोले क) ओम सुनिल चांडोले सर्व रा. सांगोला, ड) दिव्या अभिजीत वुंडाळे रा. शिरोळ ९. महिपती धोंडीराम पाटील १०. सुनिल बंडोपंत पाटील दोघे रा. कोल्हापुर ११. निवृत्ती विठ्ठल पिसे रा. हडपसर पुणे १२. हेमंत अरविंद बोंगाळे रा. कोल्हापुर यांचेकडून श्री.सचिन रमेश देवरूखकर रा. इचलकरंजी यांनी संचकार करून घेतलेली मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. १२/१२/२०२५

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर, बस स्टॉपजवळ, सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

मिळकतीचे वर्णन - जि. बेळगांवी, ता.निप्पाणी, मौजे माणकापूर येथील सर्व्हे नं.२१/१५ याचे क्षेत्र हे.०.११.५ आर, आकार रु.१.६८ पै. ची संपूर्ण शेतजमिन मिळकत यासी चतु:सिमा :- पुर्वेस - वलशेट्टी यांची मिळकत, पश्चिमेस - वाळवेकर यांची मिळकत, दक्षिणेस - सरकारी रस्ता, उत्तरेस - कुमार बेडक्याळे यांची मिळकत येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत व त्यामधील तदंगभूत वस्तू व इजमेंटरी व वहिवाटीच्या हक्कासह सर्व.

येणेप्रमाणे वर वर्णन मिळकत ही श्री. उमेश राजाराम नाईक, रा. इचलकरंजी यांचे मालकी हक्क कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलांना कायमखुष खरेदी देणेचे ठरवून सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा, हमी व खात्री देवून संचकारदाखल रक्कम आमचे अशिलांकडून स्विकारली आहे. त्यावरुन सदर मिळकतीचे खरेदीपत्र आमचे अशिल लवकरच पूर्ण करणार आहेत.

सबब, सदर मिळकतीवर कोणाचा, कोणत्याही प्रकारचा व कसलाही हक्क, तारण, गहाण, बोजा, पोटगी, सावकारी, दिवाणी व फौजदारी दावे, कब्जे, लागलिगाड, कुळ, इजमेंट, अटॅचमेंट, आरक्षण, संपादन वगैरे हितसंबंध असलेस त्याकरिता सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसाचे आत अस्सल कागदपत्रानिशी लेखी खुलासा करावा. मुदतीनंतर कोणाचीही, कोणतीही व कसलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही व आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही. तद्नंतर सदर मिळकत खरेदी केली जाईल. म्हणून दिली जाहीर नोटीस.ता.१२/१२/२०२५.

**ॲड.धिरज पृथ्वीराज पारख**

१०/५, पवनस् रेडिमेड, तारा हॉटेल जवळ, इचलकरंजी.
मो. ९९२२०९९५६७.

## जाहीर नोटीसीस हरकत

१) मिळकतीचे वर्णन :- जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले पैकी मौजे कबनूर येथील क.ग.नं. ९०४/ब/३ पैकी बिगरशेती भुखंड क्रं. २६ पैकी विक्री करुन शिल्लक राहीलेली उत्तर बाजुची ऑनलाईन ७/१२ प्रमाणे क्षेत्र हे. आर. पॉ. ०.००.५७ याचे ६०९.० चौ. फुट याचेच ५६.५७ चौ.मी. ची खुली जागा व बांधीव साधी कच्चे स्वरुपाची इमारत यात असणारे विज कनेक्शनसह सर्व यासी चतु:सिमा - पुर्वेस :- ३ फुट रुंदीचा बोळ व पलिकडे मारुती देऊळकर यांची मिळकत, पश्चिमेस :- संजय पाटील यांची मिळकत, दक्षिणेस :- शामराव गणपती पंदारे यांची मिळकत, उत्तरेस :- २० फुट रुंदीचा रस्ता.

२) येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकती बाबत गुरुवार दि. ११/१२/२०२५ इ. रोजीचे दै. महासत्ता या वृत्तपत्रामध्ये पान नं. ७ वर ॲड. सौ. माधुरी श्रीकांत काजवे रा. इचलकरंजी यांचे तर्फे देणेत आलेल्या जाहीर नोटीसीस आमचे अशिंल शामराव गणपती पंदारे रा. बाळासाहेब पाटील नगर, कबनूर यांची हरकत असून तसे लेखी नोटीसीद्वारे त्यांना कळविणेत आलेले आहे.

३) वर कलम १ मधील नमुद मिळकती बाबतचा करार आमचे अशिल व मिळकतीचे मालक विजय ज्ञानदेव राऊत यांचेमध्ये यापुर्वीच झालेला असून, श्री राऊत यांनी संचकार दाखल रक्कम स्विकारली आहे. तसेच आमचे अशिलांची मिळकत व वर कलम १ मधील मिळकत, एकमेकास लागून असलेने आमचे अशिलांना सदरची मिळकत प्राधान्याने खरेदी घेणेचा कायदेशिर अधिकार आहे. मात्र अशी वस्तूस्थिती असताना विजय ज्ञानदेव राऊत यांनी सदरची मिळकत तिऱ्हाईत व्यक्तीस तथाकथित कराराद्वारे विक्री करणेचा प्रयत्न करुन आमचे अशिलांची फसवणूक करीत असलेचे दिसून येते. तरी सदर मिळकतीबाबत कोणीही व कोणत्याही प्रकारे व्यवहार करु नये. आमचे अशिल पुढील योग्य ती कायदेशिर कारवाई करीत आहेत म्हणून दिली जाहीर नोटीसीस जाहीर हरकत. दि.१३/१२/२०२५

**ॲड. जी. पी. कोल्हापूरे**

७/२५०/८, सिंधु भवन, शाळा नं. २ समोर, मेन रोड,
इचलकरंजी - ४१६ ११५, मोबा. ९८५०१०४२७३

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. २९४/ब पैकी समजुतीचे नकाशाप्रमाणे भुखंड क्र. ३९ चे क्षेत्र ११५१.७६ चौ.फुट ची खुली जागा मिळकत. यासी चतु:सिमा- पुर्वेस - २० फुट रस्ता, पश्चिमेस - सदर गट नं.ची मिळकत, दक्षिणेस - प्लॉट नं. ४०, उत्तरेस - प्लॉट नं. ३८. सदर मिळकत ही मूळची सौ. सोनाली दिपक काजवे यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. १२/१२/२०२५.

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बस स्टॉपजवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे टाकवडे येथील गट नंबर ८८१ पैकी प्लॉट नंबर १ चे जागेवरील प्रत्यक्ष क्षेत्र १४८४ चौरस फुट ची खुली मिळकत यासि चतु:सिमा- पुर्वेस - २० फुट रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नंबर २, दक्षिणेस - २० फुट रस्ता, उत्तरेस - श्री. मारुती काटकर यांची मिळकत. सदर ची मिळकत श्री. सुभाष सदाशिव मशाळकर. रा. इचलकरंजी यांचे कब्जेमालकिची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे तोंडीकरारपत्र आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारुन करुन दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. १२/१२/२०२५

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बस स्टॉपजवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीसीस जाहीर खुलासा

आमचे अशिल श्री. विशाल शिवानंद हिरेमठ, रा. इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी दिले माहितीवरुन व दाखविले कागदपत्रावरुन त्यांचेकरीता ॲड. ॲड. डी. डी. पाटील, रा. इचलकरंजी यांनी ता. ०६/१२/२०२५ इ. रोजीचे दै. महासत्ता पान नं. ७ वर प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसीस हरकत वजा उत्तर देणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन -

जिल्हा व तुकडी कोल्हापूर, तहसिल हातकणंगले पैकी कबनूर येथील गट नं. ५२/१५ याचा सि.स.नं. २२७६४ यापैकी प्लॉट नं. ९ पैकी उत्तर बाजूचे क्षेत्र २७८.८१ चौ.मी. म्हणजेच ३००० चौ. फूटची खुली जागा मिळकत याचा प्रत्यक्ष जागेवरील मोजमापे पुर्व बाजू ४३ फूट, पश्चिम बाजू ४५. १० फूट, दक्षिण बाजू ७८ फूट व उत्तर बाजू ६२ फुटची मिळकत यांसी चतु:सिमा- पुर्वेस- ओपन स्पेस, पश्चिमेस - २५ फूट रस्ता, दक्षिणेस- अणुरे यांची मिळकत, उत्तरेस- २० फूट रस्ता. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकतीस प्रस्तुत हरकतीचे कारणाकरीता वाद मिळकत असे संबोधले आहे.

२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकतीचे एकूण क्षेत्र ६००० चौ. फूट इतके असून त्यापैकी आमचे अशिलांनी वर नमूद चतु:सिमेतील मिळकत ता. २६/१०/२०२३ इ. रोजी इचलकरंजी येथील दुय्यम निबंधक वर्ग २, इचलकरंजी यांचे कार्यालयातील रजि. दस्त नं. ४९५९/२०२३ च्या दस्ताने कुसूम शिवाजीराव चिंचकर यांचेकडून खरेदी केलेली आहे.

३) वर नमूद गटातील आमचे अशिलांचे खरेदी मिळकतीसह सर्व मिळकतीबाबत तारण, गहाण, लिज, हक्कसोडपत्र, करारपत्र, खरेदीपत्र, बोजा अगर अन्य स्वरुपी कोणतेही हस्तांतरणाचे व्यवहार करु नयेत अगर मिळकतीवर बोजा निर्माण करु नये अगर कर्ज अदा करु नये अशी जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. त्यास आमचे अशिलांनी वकिलांमार्फत रितसर हरकत घेतलेली आहे. आमचे अशिलांकडे ॲड. दिग्विजय दौलतराव पाटील यांचे अशिल सदर मिळकत कवडीमोल भावात मागणी केली. त्यास आमचे अशिलांनी विरोध केला म्हणून खोटेपणाने बेकायदेशीरपणे चुकीच्या माहितीच्या आधारे आमचे अशिलांचे कब्जा वहिवाट मालकीच्या मिळकतीकरीता बेकायदेशीरपणे लोकांची फसवणूक करणेकरीता आमचे अशिलांची व त्यांचे अशिलांची मिळकत म्हणजे प्लॉट नं. ९ ची मिळकत एकत्र करुन अधिकारबाह्य सर्व मिळकती करीता नमूद करुन जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे तमाम लोकांची फसवणूक होवू नये म्हणून आमचे अशिलांना सदरची जाहीर नोटीसीस खुलासा प्रसिद्ध करावा लागत आहे,

ता. १२/१२/२०२५

**ॲड. सन्मिश स. दरीबे,**

३/१६७, टाकवडे वेस, गावभाग, इचलकरंजी, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर.

## जाहीर इशारा वजा नोटीस

सर्व लोकांचे माहितीसाठी प्रसिध्द करणेत येते की,

आमचे अशिल अरुण सखाराम आवळे, रा. ७/५४०, शहापूर रोड, आवळे गल्ली, इचलकरंजी ता.हातकणंगले यांनी दिलेमाहितीवरुन व दाखवले कागदपत्राआधारे जाहीर इशारा वजा नोटीस देणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन- इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.नं. ९ हिस्सा क्र.२ क्षेत्र हे . १ . ५८ आर पो.ख.हे.०.०३ आर आकार रु.१९ = १९ पैसे यापैकी आठ आणे हिस्सेचे क्षेत्र हे. ०.८०.५ आर ची जमिन ही इचलकरंजी नगरपरिषद यांचेकडील गुंठेवारी आदेशाने नियमाधीन झाली असून यापैकी भुखंड क्र. ३ क्षेत्र ७४३.४९ चौ.मी.यापैकी समाईकातील अविभक्त हिस्सेचे क्षेत्र २२०० चौ. फुट याचे २०४.४६ चौ.मी.ची खुली मिळकत याचे खरेदीपत्राप्रमाणे चतुः सिमा - पूर्वेस - पी. बा. पाटील मळा, पश्चिमेस - ३० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - भुखंड क्र.४ ची मिळकत, उत्तरेस - भुखंड क्र. २ ची मिळकत

२) वर नमूद मिळकत ही मुळची श्री. बाबासो थबगोंडा पाटील तर्फे व.मु.राजेंद्र बाबासो पाटील यांची असून ती त्यांनी रजि.खरेदी दस्तऐवजाने श्रीमती सरोजनी आण्णासो पाटील रा. गावभाग इचलकरंजी यांना खरेदी दिलेली मिळकत असून, श्रीमती सरोजनी आण्णासो पाटील यांचेतर्फे त्यांचा मुलगा उमेश आण्णासो पाटील यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे साक्षीदारांसमक्ष ठरवून दिपावली पाडवा २०२५ चे दिवशी संचकारा दाखल रक्कम स्विकारुन तोंडी करार साक्षीदारसमक्ष पूर्ण केलेला आहे. अशी परिस्थिती असताना आमचे अशिल गेले १ ते १.५ महिना सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करणेकरीता श्रीमती सरोजनी आण्णासो पाटील यांचेकडे मागणी करीत आहे. मात्र श्रीमती सरोजनी आण्णासो पाटील या आमचे अशिलांना वेगवेगळी कारणे सांगून मिळकत खरेदी देणेस टाळाटाळ करुन त्रयस्थ व्यक्तिंना मिळकत विक्री करीता दाखवत असलेचे आमचे अशिलांना खात्रीशीर समजून आले आहे.

४) सबब, सदर जाहिर इशारा वजा नोटीसीने कळविणेत येते की, वर नमूद मिळकतीचे मालक श्रीमती सरोजनी आण्णासो पाटील यांचेशी आमचे अशिलांचा व्यवहार ठरला असलेने सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार, करार, मदार, खरेदी विक्री, बोजा, अन्य कायदेशीर व्यवहार करु नयेत. तसा व्यवहार झालेस तो आमचे अशिलांचे मिळकत खरेदीचे अग्रहक्कावर लागू व बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर इशारा वजा नोटीस सही ता.१३/१२/२०२५.

**ॲड. राजकुमार पांडुरंग निर्मळ**

(ॲडव्होकेट व नोटरी भारत सरकार)
३/३११/१, अवधुत आखाडा, इचलकरंजी.
मो. ९८६०४४११५२.

# कोल्हापुरी चप्पलांचा वारसा जगभर पोहोचणार

## प्राडा, लिडकॉम आणि लिडकार यांच्यात सामंजस्य करार

कोल्हापूर,ता.१३ (प्रतिनिधी)–

**भारतीय पारंपारिक चर्मकला कोल्हापुरी चप्पलांचा वारसा जगभर पोहोचवण्यासाठी जागतिक ब्रॅन्ड प्राडा, लिडकॉम आणि लिडकार यांच्यात मुंबईतील इटालियन वाणिज्य दूतावासात, इटलीभारत व्यापारी परिषदेनिमित्त सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. पारंपरिक चप्पल निर्मितीच्या पद्धती, प्राडाच्या आधुनिक व समकालीन डिझाईन शैली या माध्यमातून चप्पल विकसित केल्या जात आहेत.**



मुंबईतील इटालियन वाणिज्य दूतावासात आयोजित सामंजस्य कराराप्रसंगी प्राडा,लिडकॉम व लिडकारचे पदाधिकारी.

पारंपारिक कौशल्य आणि आधुनिक लक्झरी फॅशनच्या मदतीने पारंपारिक कोल्हापुरी कौशल्याला प्राडाची आधुनिक साथ मिळणार आहे. विशेष चप्पला फेब्रुवारी २०२६ मध्ये प्राडाच्या ४० विक्री केंद्रांमध्ये तसेच अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होईल. हा करार प्रधान सचिव तथा लिडकॉमचे अध्यक्ष डॉ.हर्षदीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि लिडकॉमच्या व्यवस्थापकीय संचालक, प्रेरणा देशभ्रतार यांच्या धोरणात्मक नियोजनामुळे शक्य झाला आहे. यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले, या कराराने भारतातील अनेक कारागीर, व्यावसायिक आणि उद्योजकांचा फायदा होणार आहे. या विशेष संकलनातून भारतीय कारागिरांच्या कलेला नवी दिशा मिळणार असून आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या कौशल्याची ओळख अधिक दृढ होणार आहे.

लिडकॉमच्या व्यवस्थापकीय संचालक प्रेरणा देशभ्रतार म्हणाल्या, पारंपारिक कला जपणाऱ्या कारागिरांच्या पिढ्यांचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांच्या कौशल्याला जागतिक पातळीवर योग्य ओळख देण्यासाठी ही भागीदारी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. यात एक जागतिक ब्रँड थेट महाराष्ट्र आणि कर्नाटकातील कारागिरांसोबत काम करत असल्याने त्यांच्या या कौशल्याला एक ओळख मिळेल आणि कलेचे पूर्ण श्रेय या कारागिरांना मिळेल.

लिडकारच्या व्यवस्थापकीय संचालिका डॉ. के. एम. वसुंधरा म्हणाल्या, कोल्हापुरी चप्पलांची परंपरा म्हणजे महाराष्ट्र कर्नाटकातील चप्पलकारांचे शतकांपासूनचे संचित कौशल्य या सहकार्यामुळे प्रशिक्षण, रोजगार आणि जागतिक संधींची विस्तृत दारे उघडणार आहेत.

प्राडा समूहाच्या सामाजिक उत्तरदायित्व विभागाचे प्रमुख लोरेंझो बर्टेली म्हणाले, ही भागीदारी म्हणजे सांस्कृतिक आदानप्रदानाची नवी ओळख आहे. भारतीय कारागिरांच्या अतुलनीय कलेला आधुनिक जगात योग्य स्थान देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. चप्पलांच्या कलेक्शनच्या माध्यमातून भारतीय कारागिरीचा प्राडा मेड इन इंडिया इन्स्पायर्ड बाय कोल्हापुरी चप्पल्स प्रकल्पाचा आराखडा, अंमलबजावणी आणि त्या संदर्भातील मार्गदर्शक तत्वे या करारात नमूद करण्यात आली आहेत.



शाहूवाडी तालुक्यात उसाला तुरे फुटल्याचे दिसत आहे.

# उसाला तुरे फुटल्याने वजनात घट

### ऊस तोडणी त्वरित करण्याची शेतकऱ्यांची मागणी

सरूड,ता.१३(प्रतिनिधी)–

**अवकाळी पडलेल्या पावसामुळे ऊस गळीत हंगाम पुढे गेल्यामुळे चालू असलेल्या गळीत हंगामात उसाला तुरे फुटल्याने याचा परिणाम उसाच्या वजनावर झाला असल्यामुळे यंदा शेतकरी आर्थिक अडचणीत येणार असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.**

शाहूवाडी तालुक्यातील शेतकऱ्यांचा ऊस शेतीकडे जास्त कल असल्याने या तालुक्यात ऊस शेती जास्त केली जाते पण गतवर्षी अवकाळी पडलेल्या पावसामुळे ऊस तोडणी हंगाम पुढे गेल्याने ऊसाला तुरा फुटल्यामुळे उसाच्या वजनात कमालीची घट होत असल्याचे पहावयास मिळत आहे.या परिसरातील ऊस तोडणी व वाहतूक विश्वास, उदय, वारणा ही कारखाने करीत आहेत पण ऊस शेती ही निसर्गावर अवलंबून असल्याने वातावरणात होणाऱ्या सातत्याच्या बदलामुळे अवकाळी पावसाने तसेच पिकावर पडणारा लोकरी मावा यामुळे पिकावर होणाऱ्या परिणामामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.एकीकडे ऊस दर वाढ झाली असली तरी दुसरीकडे खत, औषधे, मजुरांची वाढते दर यामुळे ऊस शेती परवडेना झाली आहे.त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे आता सुरू असलेली ऊस तोडणी जसजशी पुढे जाईल तसे उसाचे वजन घटत असल्याने या परिसरातील कारखान्यांनी लवकरात लवकर तोडणी करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

**शेतकरी आर्थिक अडचणीत**

## गरजू परिवाराला दुःखदप्रसंगी जेवण उपलब्ध करून देणार

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)–

**गरजू परिवाराला दु:खाच्या प्रसंगी जेवण उपलब्ध करुन देण्याचा नाविण्यपूर्ण उपक्रम येथील श्री महालक्ष्मी अन्नछत्रच्यावतीने राबविण्यात येत असल्याची माहिती अन्नछत्रचे संस्थापक अध्यक्ष राजू मेवेकरी यांनी दिली.**

जीवन मृत्यूचे चक्र अविरत सुरु असते. जिथे जन्म आहे, तिथे मृत्यू आहेच. मृत्युरुपाने आपल्या परिवारात एखादी दुःखद घटना घडणे खरोखर दुर्दैवच असते. मात्र या दुःखद प्रसंगात आप्तेष्ट आपल्या जवळ असतीलच असे नाही. म्हणूनच अशा दु:खाच्या प्रसंगी अशा परिवाराचे दुःख हलके करण्याचा श्री महालक्ष्मी अन्नछत्र सेवा ट्रस्ट कडून एक प्रामाणिक प्रयत्न केला जात आहे. कोल्हापूरमध्ये गेली अनेक वर्षे सामाजिक बांधिलकी जपत अन्नदान करणाऱ्या आणि आपल्या अनेक सातत्यपूर्ण उपक्रमांनी लोकसेवा करणाऱ्या श्री महालक्ष्मी अन्नछत्र सेवा ट्रस्ट कडून अशा दुःखद प्रसंगी पहिले दोन दिवस या परिवाराला घरपोच जेवण देण्यात येणार आहे. तरी ज्या परिवारात अशा दुःखद प्रसंगी जेवण मिळण्यासाठी काही अडचण असेल अशा परिवारांनी संपर्क साधल्यास त्यांच्या गरजेनुसार जेवण पोहोच करण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याचेही संस्थापक अध्यक्ष राजू मेवेकरी यांनी स्पष्ट केले.

**महालक्ष्मी अन्नछत्रचा नाविण्यपूर्ण उपक्रम**

## श्री दत्त कनिष्ठ महाविद्यालयात स्व.डॉ.सा.रे पाटील यांना अभिवादन

कुरुंदवाड,ता.१३(प्रतिनिधी)–

**कुरुंदवाड (ता.शिरोळ) येथील नवभारत शिक्षण मंडळ संचलित,श्री दत्त कनिष्ठ महाविद्यालय कुरुंदवाड या शैक्षणिक संकुलात शिरोळ तालुक्याचे भाग्यविधाते, माजी आमदार स्व.डॉ. सा रे पाटील यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य आर.जे पाटील यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.**

यावेळी महाविद्यालयातील शिक्षक एस.डी.मस्कर यांनी माजी आमदार स्व.डॉ.आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील यांच्या विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.महाविद्यालय परिसरामध्ये स्व.सा.रे पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी अभिवादन केले.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य आर.जे.पाटील विभाग प्रमुख एस.डी.भोजे,एस.डी मस्कर,वाय. डी. पिरजादे यांच्यासह सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## डॉ.बाबा आढाव, साथी पन्नालाल सुराणा यांना शेतकरी कामगार पक्षातर्फे आदरांजली

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)–

**कष्टकऱ्यांचे नेते,हमाल पंचायतीचे,नेते ज्येष्ठ समाजसेवक डॉ . बाबा आढाव तसेच समाजवादी नेते साथी पन्नालाल सुराणा यांचे वार्धक्यन नुकतेच निधन झाले.**

त्यांच्या निधनाबद्दल शेतकरी कामगार पक्षाच्या शहर कार्यालयात शहर चिटणीस बाबुराव कदम यांच्या उपस्थितीत आदरांजली वाहण्यात आली. यावेळी दिलीपकुमार जाधव, संग्राम माने, मोहन माने, बाबुराव प्रकाश शिंदे, मधुकर हरेल, धोंडीराम हवालदार उपस्थित होते.

## कारभारवाडी परिसरात बिबट्याचे दर्शन

हळदी,ता.१३(प्रतिनिधी)–

**कारभारवाडी (ता.करवीर) येथील भैरी देवस्थानजवळ बिबट्या दिसल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. सकाळी नऊ वाजता भैरीजवळील शेतात बिबट्या अचानक आढळून आल्याची माहिती मिळताच ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**




कारभारवाडीत घटनास्थळाची पाहणी करताना वनरक्षक,वनक्षेत्रपाल,पोलीस पाटील व ग्रामस्थ.

अधिक माहिती अशी की, वाकडे नावाच्या शेतात नांगरट सुरू असताना शेतातून अचानक बिबट्या बाहेर पडला. ट्रॅक्टरचालकाने तत्काळ माहिती दिली. त्याचवेळी जवळील दुसऱ्या शेतात सुमारे ५० फूट अंतरावर दुसऱ्या शेतकऱ्यालाही बिबट्या जाताना दिसल्याचे सांगितले जात आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील पंकज पाटील यांनी करवीर वनक्षेत्रपाल नंदकुमार नलवडे, वनरक्षक महादेव कुंभार तसेच माजी पंचायत समिती सदस्य राजू सुर्यवंशी, सरपंच अमित पाटील, ग्रामसेवक एम. बी. पाटील यांच्या सोबत घटनास्थळाची पाहणी केली. नांगरट झालेले शेत असल्याने पायाचे ठसे स्पष्टपणे उमटले नसल्याची माहिती वनविभागाने दिली. कारभारवाडी गाव हे घटनेच्या ठिकाणापासून हाकेच्या अंतरावर असल्याने ग्रामस्थांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बिबट्याचा अचूक ठावठिकाणा शोधण्यासाठी रात्री उशिरापर्यंत ड्रोनच्या सहाय्याने शोधमोहीम राबविण्यात येत आहे. परिसरात सीसीटीव्ही कॅमेरेही बसविण्यात आले असून वनविभाग आणि ग्रामस्थ यांच्या संयुक्त प्रयत्नांतून देखरेख वाढविण्यात आली. परिसरातील शेतकरी व नागरिकांनी खबरदारी घ्यावी, रात्रीच्या वेळी एकटे बाहेर पडणे टाळावे,अशी सूचना वनविभागाकडून देण्यात आली आहे.


Rotary RID 3170 | रोटरी व्याख्यानमाला | 50

रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी
श्री गुरुदेव आध्यात्मिक केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने
कणेरी मठाचे अधिपती
परमपूज्य
श्री अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजी
यांचे
आध्यात्मिक प्रवचन



दि. 15 ते 18 डिसेंबर 2025, दररोज सायं. 6.00 ते 7.30
चार दिवसीय प्रवचनामध्ये स्वामीजी 'पंच परिवर्तनातून राष्ट्र निर्माणाकडे' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तरी सर्व भाविकांनी याचा लाभ घ्यावा.
स्थळ : रोटरी श्रीमती सोनीदेवी रा. बाहेती सेवा केंद्र, महेश सेवा समिती जवळ, इचलकरंजी



इचलकरंजी मध्ये एकच दिवस एकच शो!
तिकीट विक्री नाट्यगृहावर सुरू
आजच रविवार दुपारी ४.३० वा.
घोरपडे नाट्यगृह, इचलकरंजी (A/C)
जादूई नगरीचा भव्य दिव्य शो
नेत्रदिपक लाईट्स भव्य सेटिंगसह १५ सह कलाकारांचा जबरदस्त संच
३ तासात हिप्नॉटिझम, मॅसमेरिझम, जापनिज, अफ्रिकन जादूचे अद्भूत चमत्कार



जादुगार विश्व सम्राट
No Logic Only Magic
Online Tickets bookmyshow
तिकीटासाठी संपर्क : 9579573855
संपर्क : गायकवाड पब्लिसिटी 9604060123 संजय लोंढे 9890980321


## करमणूक


श्रीहरी — शुक्रवार, ता.१२/१२/२०२५ पासून दुपारी १ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
ओ मनचिली
प्रौढांसाठी — सायं. ४ व ७ वा.
सपनो में आजा (A)

श्रीदत्त — शुक्रवार, ता. १२ पासून रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
सुबरान सिक्रेट
(A) शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी (A)

पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 — गर्दीचा २ रा आठवडा
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज 3 खेळ 12 ● 3.30 व रात्री 9.



BOOK YOUR TICKETS NOW
धुरंधर (हिंदी)

५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत — भाग्यरेखा DOLBY DIGITAL
वाढत्या गर्दीचा २ रा आठवडा
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
रोज ३ खेळ *११.४५ *३.१५ *६-३० वा.



BOOK YOUR TICKETS NOW
धुरंधर (हिंदी)

कल्पना — लेजर प्रोजेक्टरसहीत — शुक्रवार ता.५ पा
दु. १२, दु. ३.३०, रात्री ९ वा
सुपरहिट फुल्ल ॲक्शन चित्रपट
२ रा आठवडा — DOLBY DIGITAL QUBE



जनता दर 50/-
धुरंधर (हिंदी चित्र)
भू. रणवीर सिंग, संजय दत्त, आर.माधवन अक्षय खन्ना, अर्जुन रामपाल

गुरु — शुक्रवार ता.१२ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ३ खेळ १२ * ३.४५ * ९ वा.
संपूर्ण भारतातच नव्हे तर जगभरात चर्चेचा विषय बनलेला जबरदस्त चित्रपट



धुरंधर (हिंदी चित्रपट)
अक्षय खन्नाची बेहतरीन ॲक्टींग पहाच

RK CINEMA — 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow



" धुरंधर " ( हिंदी ) — 10:15 AM, 01:15 PM, 02:00 PM, 03:00 PM, 05:00 PM, 05:45 PM, 06:45 PM, 09:00 PM, 09:45 PM, 10:30 PM
" शोले " ( हिंदी ) — 11:00 AM
" किस किस को प्यार करू 2" ( हिंदी ) — 09:00 AM
"अखंडा 2 -3D " ( हिंदी ) — 10:00 AM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11



धुरंधर (HIN) (A) — 11.00am, 12.15, 01.30, 02.45, 05.15, 06.45, 09.15, 10.30pm
तेरे इश्क में (HIN) (U/A) — 10.30am, 10.00pm
किस किस को प्यार करूं २ (HIN) (U/A) — 07.15pm
उत्तर (MAR) (U/A) — 04.45pm,
आता पहा मॉर्निंग शो फक्त 100 पासून पुढे

# आष्ट्यात गुलाल भाऊचाच... पण कोणत्या भाऊचा ?

## मतदार तर्कवितर्कात व्यस्त तर भाऊ चिंतेने ग्रस्त

आष्टा,ता.१३(डॉ.तानाजी टकले)–

**आष्टा नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदाकरिता सांगली जिल्ह्यातील सहा नगरपरिषद व दोन नगरपंचायतमध्ये एकमेव आष्टा नगरपरिषदेत एकास एक लढत झाली.या लढतीकडे जिल्ह्याचे लक्ष होते. इथली लढत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे विशालभाऊ शिंदे विरुद्ध राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रवीणभाऊ माने या दोन भाऊंमध्ये झाली. आता मत कोणाला दिलं.. भाऊला. जिंकणार कोण... भाऊच... आणि गुलाल कोणाचा तर... भाऊचाच अशा चर्चा झडत आहेत.**




विशालभाऊ शिंदे प्रविणभाऊ माने

आष्टा नगरपालिकेची पंचवार्षिक निवडणूक अटीतटीची झाली. नऊ वर्षानंतर झालेली ही निवडणूक बहुचर्चित अशीच होती. प्रारंभी उमेदवार कोण? असं वाटणाऱ्या निवडणुकीसाठी २४ जागांसाठी २०७ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले, तर थेट नगराध्यक्षपदासाठी १० जणांनी, २४ जागांसाठी दुरंगी, तिरंगी व बहुरंगी अशी ७३ जणांमध्ये लढत झाली. थेटसाठी मात्र दोन भाऊत एकास एक असाच सामना रंगला. सत्ताधारी स्वर्गीय शिंदे गट– आमदार जयंत पाटील गट प्रणित शहर विकास आघाडीकडून विशालभाऊ शिंदे तर अ.प.राष्ट्रवादीतर्फे प्रवीणभाऊ माने यांच्यात सरळ सामना रंगला. दोन्हीकडच्या समर्थकांनी विजयासाठी जीवाचं रान केलं. घरोघरी जोरदार प्रचार यंत्रणा तसेच पाकीट यंत्रणा राबली. इथल्या विधानसभा निवडणुकीचा विरोध पालिका निवडणुकीत देखील उमटला. विधानसभेतील एकमेकांचे कट्टर विरोधक आमदार जयंत पाटील व निशिकांत पाटील पुन्हा पालिका निवडणुकीत देखील आष्ट्यात एकमेकांविरोधात मैदानात दिसले. जयंत पाटील यांनी विशालभाऊ यांच्यासाठी रान तापवले. विरोधी उमेदवारांच्या गुन्हेगारी कृत्याचा पाढा आमदार पाटील यांनी चौकाचौकात वाचला. तर निशिकांत पाटील यांनी प्रशासक काळात केलेल्या १०० कोटी रुपयांच्या विकास कामांचा हिशोब मांडला यातून पालिका निवडणुकांचा राजकीय आखाडा तापला. आरोप प्रत्यारोपांचा धुरळा उडाला. यातच मतदानाच्या आदल्या रात्री जादूटोणा आणि भानामतीचे प्रकार घडले. जनता भयभीत झाली मात्र समर्थकांनी त्यातूनही मतदारांना बाहेर काढत चुरशीने मतदान केले. ३०५७३ मतदारांपैकी २२ हजार ८५६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. ७७१७जणांनी मतदानाकडे पाठ फिरवली. ७४.७६ टक्के इतके मतदान झाले. गत निवडणुकीच्या तुलनेत हे मतदान घटले. आता घटलेले मतदान कोणाला घातक ठरणार हे निकालानंतर कळेल?



मतदानावरून आता शहरात तर्क वितर्क विजयी भव: आणि गुलाल! यावरून चर्चांना फवारे फुटले आहेत. नव्हे तर ऊत आला आहे.प्रभाग निहाय, बूथनिहाय, गल्लीनिहाय, लाडकी बहीण, लाडका भाऊ,आडाखे बांधले जात आहेत. मतांची गोळाबेरीज सुरू आहे. ही निवडणूक तशी जातीपातीच्या मतावर गेल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारातून जातीपातीच्या मतांची आकडेमोड व गोळाबेरीज सुरू आहे.

दोन्ही भाऊ समर्थक आपापल्या परीने सामाजिक गणिते,गृहीतके,मतमतांतरे व्यक्त करीत आहेत.काहींकडून तर गुलाल की भंडारा असा उपरोधीक प्रश्न फेकला जातोय.दोन भाऊंच्या राजकीय अस्तित्वाची ही लढत असल्याने दोन्ही गटाकडून मतदार आकर्षित करण्यासाठी सर्व त्या शक्त्यांचा वापर झाला आहे. थेटच्या लढती बरोबरच प्रभागातील लढती ही जोरदार झाल्याचे चित्र आहे. विजयी कोण होणार? कोणाला गुलाल लागणार? या वरून समर्थकांत चर्चा असल्या तरी दिवसागणिक उमेदवारांची चिंता व धाकधूक वाढत आहे.

> **तब्बल १९ दिवस लांबलेल्या अन् प्रतीक्षा करावी लागलेल्या निकालाने उमेदवारांच्या 'घड्याळाची टिकटिक वाजते डोक्यात... शिट्टी वाजतेय मोक्यात' अशा चर्चा गाव, गल्ली, बोळ, चौक, पारावर आणि माळावर झडत आहेत. मतदानानंतर थंडीच्या हुडहुडीने सकाळ,संध्याकाळ शेकोट्या पेटत आहेत. पेटलेल्या शेकोट्यापुढे गुलाल कोणाचा तर कार्यकर्ते मात्र भाऊचाच अशा डरकाळ्या आवळत आहेत.**



नियोजन बैठकीत बोलताना आम.सुधीर गाडगीळ,समवेत अन्य.

## अहिल्यादेवींचा अश्वारूढ पुतळा लोकार्पणाची नियोजन बैठक संपन्न

सांगली,ता.१३(प्रतिनिधी)–

**पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या अश्वारूढ पुतळ्याचा भव्य अनावरण सोहळा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवार, ता.१५ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार सुधीर गाडगीळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात भाजपा कोअर कमिटी, प्रमुख पदाधिकारी यांची महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली.**

सांगली महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ९ मध्ये तब्बल दीड कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या या भव्य अश्वारूढ पुतळ्याची उंची २१ फूट असून वजन सुमारे ४ टन आहे. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा अश्वारूढ स्वरूपातील हा महाराष्ट्रातील एकमेव पुतळा असल्याने या स्मारकाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

यावेळी आमदार सुधीर गाडगीळ,अध्यक्ष प्रकाश ढंग, संघटन मंत्री मकरंद देशपांडे, दिनकर पाटील, नितीन शिंदे, निता केळकर, पृथ्वीराज पवार, दीपक शिंदे, संगीता खोत, संतोष पाटील, रोहिणी ताई पाटील, सविता मदने, प्रशांत पाटील, स्वाती शिंदे, स्वाती खाडे, शांतीनाथ कर्वे,विश्वजीत पाटील, विशाल पवार यांच्यासह सर्व मंडल अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात

### शेतमाल हमीभाव केंद्र तालुकास्तरावर सुरू करा-पाटील

कराड,ता.१३(प्रतिनिधी)–

**पीएम किसान सन्मान योजना बंद करा आणि शेतीमालाला उत्पादन खर्चावर पन्नास टक्के नफा या धोरणाप्रमाणे हमीभाव द्या. शेतमाल हमीभावाने खरेदी करण्यासाठी तालुकापातळीवर सरकारी खरेदी केंद्र सुरू करा, अशी मागणी बळीराजा शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पंजाबराव पाटील यांनी केली आहे.**

देशाचे पंतप्रधान यांच्याकडे शेतकऱ्यांनी कधीही भीक मागितलेली नाही. तरीसुद्धा सत्ता मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना नको असणारी शेतकरी सन्मान योजना प्रतिवर्षी सहा हजार रूपये सुरू केली. या सहा हजार रूपयांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतीच्या कर्जाचे व्याज सुद्धा भागत नाही. त्यामुळे पंतप्रधानांनी योजना पूर्ण बंद करावी. महाराष्ट्रात दोन लाख ५० हजार शेतकऱ्यांची नावे या योजनेतून वगळण्यात आलेली आहेत. शेतकऱ्यांनी सरकारला अशा प्रकारची योजना मागितलेली नव्हती तरीसुद्धा शेतकऱ्यांच्या माथ्यावर सत्ता मिळवण्यासाठी ही योजना मारलेली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बळीराजा शेतकरी संघटनेच्या वतीने आम्ही विनंती करतो की, आपल्या या योजनेमुळे शेतकऱ्यांचे भले झालेले नाही. तरी ही योजना तत्काळ बंद करावी आणि शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा देऊन शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करण्यासाठी सरकारी खरेदी केंद्र तालुकापातळीवर लवकरात लवकर सुरू करावीत. त्याचबरोबर शेतकऱ्यांना जागतिक बाजार भावातील फायदा मिळण्यासाठी सरकारचे आयात निर्यात धोरण शेतकऱ्यांच्या हिताचे असावे असे धोरण तयार करावे, अशी मागणी पंजाबराव पाटील यांनी केली.

### माजगाव येथे महाराजस्व शिबिरास चांगला प्रतिसाद

पाटण,ता.१३(प्रतिनिधी)–

**माजगाव (ता.पाटण) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत तहसीलदार कार्यालय पाटण यांच्या वतीने आयोजित केलेल्या छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिरास नागरिकांनी चांगलाच प्रतिसाद दिला.**

शिबिरात शाळेतील विद्यार्थ्यांना राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, अधिवास दाखला (डोमासाईल) ५९ दाखले वाटप करण्यात आले. जातीचे दाखले व डोमासाईल दाखले विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.यावेळी मंडलाधिकारी राजेंद्र चव्हाण, माजगाव तलाठी अजय पवार, चाफळ तलाठी संजय दुधगावकर, कारखान्याचे संचालक प्रशांत पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दत्तात्रय देशमुख, सरपंच सुरेखा जाधव, उपसरपंच सुजाता हिमणे, सदस्य गोरखनाथ चव्हाण, मुख्याध्यापिका मनिषा कळसकर, ग्रामस्थ, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. शिबिराच्या माध्यमातून प्रशासकीय सेवा गावपातळीवर उपलब्ध झाल्याने ग्रामस्थ व पालकांत समाधान व्यक्त करण्यात येत आहे. शिबिर यशस्वी करण्यासाठी गणपत हिमणे व माजी मुख्याध्यापिका उषा पवार यांनी विशेष सहकार्य केले.

### युवकांच्या सकारात्मक ऊर्जेतून देश महासत्ता बनेल-कुलकर्णी

मिरज,ता.१३(प्रतिनिधी)–

**जगात आज भारत हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. युवकांची ही ऊर्जा जगातील इतर कोणत्याही देशात पहायला मिळत नाही. ही युवकांची ऊर्जा सकारात्मक मार्गाला लागली तर देश नक्कीच महासत्ता बनेल, असे उद्‌गार माधव कुलकर्णी यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज येथे बोलताना काढले.**

महाविद्यालयामध्ये अर्थशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्यावतीने आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत आयोजित व्यावसायिक दृष्टिकोन विकास अभ्यासक्रम या १० दिवस कालावधीच्या अभ्यासक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते.अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने बघा. स्वतःला सिद्ध करण्याचे ध्येय उराशी बाळगा, असा सल्ला दिला. प्रास्ताविक या अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ. स्वाती हाके यांनी केले. आभार अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत हरताळे यांनी मानले. तर सूत्रसंचालन श्रीमती अरुणा सकटे यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा. संजय पाटील, डॉ. पुष्पा पाटील, राजू शिंदे, नामदेव भोसले व कोठावळे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# साताऱ्यात दिव्यांगांचे चक्काजाम आंदोलन

## विविध मागण्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन;रस्ता बंद राहिल्याने प्रवाशांचे हाल

सातारा,ता.१३(प्रतिनिधी)–

**सरकारने फसवले म्हणत साताऱ्यात दिव्यांग बांधवांनी जिल्हाधिकारी कार्यालया बाहेर चक्का जाम आंदोलन करत सरकारवर आंदोलनातून प्रहार केला. मुख्य वर्दळीचा रस्ता सुमारे दोन तास बंद राहिल्याने प्रवाशांचे मात्र हाल बेहाल झाले.**



साताऱ्यात विविध मागण्यांसाठी दिव्यांगांनी चक्काजाम आंदोलन केले त्यामुळे काहीकाळ वाहतूक खोळंबली होती.

पोलीस प्रशासनासोबतच सर्वसामान्य नागरिकांनी दिव्यांगांच्या व्यथा व आक्रोश पाहून त्यांच्या आंदोलनाला मूक समर्थन दिले. मात्र प्रवाशांची गैरसोय टाळावी यासाठी पोलिसांनी आवाहन केल्यानंतर दिव्यांग बांधवांनी रस्ता मोकळा केला. रस्त्यावर झोपून पहिल्यांदाच सातारा जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर असे दिव्यांगाचे रास्ता रोको आंदोलन सातारा वासीयांनी पाहिले.

प्रहार दिव्यांग क्रांती संस्था (रजि.) यांच्यावतीने सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार ठिय्या आंदोलन करण्यात आले. मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव उपस्थित राहून विविध मागण्यांसाठी घोषणाबाजी केली. आंदोलनात पुरुष, महिला, ज्येष्ठ नागरिक अशा सर्व गटांतील दिव्यांगांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. दिव्यांग बांधव हातकाठ्या बाजूला ठेवून रस्त्यावर बसलेले दिसत होते. बाजूला दोनचाकी व इतर साधनांसह आंदोलनकर्ते जागा करून बसले होते. काहीजण हातात फलक घेऊन मागण्या मांडत होते, तर काहीजण अधिकारी येण्याची प्रतीक्षा करत चर्चा करत होते. संस्थेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन मागण्यांवर तात्काळ कार्यवाहीची मागणी करण्यात आली. स्थानिक आमदार निधीतून दिव्यांगांसाठी ३० लाखांपर्यंत निधी खर्चाची अंमलबजावणी, निराधार योजनेतील २५ वर्षांची अट रद्द केल्याचा निर्णय अंमलात आणणे, दिव्यांग पेन्शन रुपये १५०० वरून २५०० करणाऱ्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करावी अशा मागण्या या निवेदनात करण्यात आल्या. दिव्यांग बांधवांनी प्रशासनाने मागण्या मान्य न केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला.

## निनाईदेवी विद्यालयात कार्यशाळा संपन्न

कराड,ता.१३(प्रतिनिधी)–

**श्री निनाईदेवी विद्यालय तुळसण (ता.कराड) येथे विद्यार्थी व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा संपन्न झाली.**

इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला होता. प्रमुख पाहुणे डॉ.सुनीलकुमार पाटील म्हणाले, आजकालच्या विद्यार्थ्यांना लक्षात न राहणे, गणित, इंग्रजी या विषयांची भीती वाटणे अशा अडचणी भासत आहेत. याच्यावरती मेडिटेशन, एकाग्रता व सातत्याने सकारात्मक विचार गरजेचे आहेत.प्रास्ताविक वैभव जाधव यांनी केले. मुख्याध्यापक कल्याण कुलकर्णी यांनी स्वागत केले. यावेळी आनंदराव जानुगडे, अस्मिता पाटील, ग्रंथपाल पाटील व विद्यार्थी उपस्थित होते.

## मानवी हक्कांची पायमल्ली होऊ देऊ नका

### पो.अधीक्षक तुषार दोशी

सातारा,ता.१३(प्रतिनिधी)–

**घटनेने व कायद्याने सगळ्यांना स्वतंत्र जगण्याचा अधिकार दिला असून प्रत्येक व्यक्तीने मानवी हक्कांचे जतन केल्याने समाजातील हिंसाचार कमी होतो. त्यामुळे बंदींनी कारागृहातून शिक्षा भोगून बाहेर पडल्यानंतर स्वत:मध्ये सुधारणा करुन मानवी हक्कांची कोठेही पायमल्ली होणार नाही याची खबरदारी घ्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी केले.**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने येथील जिल्हा कारागृहामध्ये आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवसानिमित्त जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव न्या. निना बेदरकर, अप्पर जिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने, कारागृह अधीक्षक सतीश कदम, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या वैशाली जाधव, महिला व बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा सुचित्रा काटकर आदी उपस्थित होत्या.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती बेदरकर म्हणाल्या, बंदींना स्वावलंबी जगता यावे यासाठी कारागृहात विविध स्वयंरोजगारचे प्रशिक्षण देण्यात येते. याचा बंदींनी लाभ घ्यावा. कारागृहातून मुक्त होऊन बाहेर पडल्यानंतर बंदींनी मानवी हक्कांचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगितले.

बंदींना कारागृहातील मुलभूत हक्क कायद्याने व घटनेने दिले आहेत. त्यासाठी विविध शासकीय यंत्रणा काम करीत असतात. येथून बाहेर पडल्यानंतर कोणाच्याही मानवी हक्कांवर गदा येईल असे कृत्य करु नये. बंदींना आवश्यक त्या सुविधा मिळण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणासोबत प्रशासनही प्रयत्न करीत असल्याचे अपर जिल्हाधिकारी श्री. माने यांनी सांगितले.प्रारंभी सुचित्रा काटकर यांनी बंदींना असणाऱ्या कायदे व देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली.

## कराडमध्ये आज स्वा.सै.माधवराव जाधव जन्मशताब्दी सोहळा

कराड,ता.१३(प्रतिनिधी)–

**कराडचे सुपुत्र, ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी वीर माधवराव जाधव यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान आणि कराड–साताऱ्याच्या विकासातील अनन्यसाधारण कार्य भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी कराड येथे त्यांचा जन्मशताब्दी सोहळा आज (ता.१४) रोजी सायंकाळी पाच वाजता आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती वीर माधवराव जाधव सोहळा समितीचे अ‍ॅड.संभाजीराव मोहिते यांनी दिली.**



यावेळी श्रीमती सुनिता जाधव, अर्बन कुटुंबप्रमुख सुभाषराव जोशी,समितीचे सदस्य अ‍ॅड. संभाजीराव मोहिते, बँकेचे चेअरमन समीर जोशी, तसेच स्वातंत्र्य सेनानी जाधव यांचे नातू अमर जाधव आणि तनय जाधव उपस्थित होते. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत अर्बन शताब्दी हॉलमध्ये विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी अपर पोलीस अधीक्षक डॉ.वैशाली कडूकर,अर्बन कुटुंबप्रमुख सुभाषराव जोशी, बँकेचे माजी अध्यक्ष डॉ.सुभाषराव एरम, आरटीओ चैतन्य कणसे, बँकेचे अध्यक्ष समीर जोशी उपस्थित राहणार आहे. याप्रसंगी वीर माधवराव जाधव यांच्या जीवनपटलावरील चित्रफितीचे प्रदर्शन व मान्यवरांची मनोगत होणार आहेत.

स्वातंत्र्यलढ्यात माधवराव जाधव यांनी ब्रिटिश सरकारविरुद्ध रेल्वे अडवणे, पोस्ट ऑफिस लुटणे, विद्युत तारा तोडणे,त्यांनी मारलेली ऐतिहासिक क्रांती उडी यांसारख्या अनेक क्रांतिकारक कृतींमुळे त्यांच्यावर तब्बल १०७ खटले दाखल करण्यात आले होते. त्यापैकी दहा टक्के खटल्यांत ते निर्दोष सुटले.महात्मा गांधींच्या 'चले जाव' आंदोलनाला प्रतिसाद देणाऱ्या सेनानींपैकी ते अग्रस्थानी होते. परंतु दुर्दैवाने त्यांचा इतिहास काळाच्या ओघात विस्मृतीत गेला असून, तो राष्ट्रीय पातळीवर उजेडात आणण्यासाठी हा जन्मशताब्दी सोहळा आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले. या सोहळ्यासाठी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन समितीकडून करण्यात आले.

# केंद्र व राज्य सरकारकडे शाश्वत कृषी धोरणच नाही

कवठेमहांकाळ,ता.१३(प्रतिनिधी)–



**राज्यातील शेती पिकांचे नुकसान, अपुरे धोरण, पॅकेजची फसवी रचना आणि विमा कंपन्यांच्या मनमानीवर सरकारला कठोर शब्दांत जाब विचारत 'भारत कृषीप्रधान, पण केंद्र व राज्य सरकारकडे शाश्वत कृषी धोरणच नसल्याचा घणाघात आ.रोहित पाटील यांनी अधिवेशनात कृषी संकटांवर बोलताना केला.**

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सभागृहात २९३ क्रमांकाच्या प्रस्तावावर

### अधिवेशनात आम.रोहित पाटील यांचा घणाघात

आमदार रोहित पाटील यांनी सरकारला कठोरपणे सुनावले. सत्ताधारी पक्षाने मांडलेल्या २९३ क्रमांकाच्या प्रस्तावावर विधानसभेत बोलताना आमदार रोहित पाटील यांनी भाषणाच्या सुरुवातीला सांगितले की, भारत कृषीप्रधान देश असूनही आज शेतीला आधार देणारी शाश्वत धोरणे अस्तित्वातच नाहीत.बियाणे खरेदीपासून ते पीक विक्रीपर्यंत शेतकरी पूर्णपणे असुरक्षित स्थितीत असल्याचे ते म्हणाले. आज तरुणांना स्वतःला शेतकरी म्हणायलाही लाज वाटते. ही परिस्थिती शासनाच्या अपयशाचीच देण आहे,असे

### जाहिरातबाजी थांबवून प्रत्यक्ष मदतीची मागणी

त्यांनी स्पष्ट केले. यानंतर सत्ताधाऱ्यांनी जाहीर केलेल्या ₹३१,००० कोटींच्या पॅकेजवर रोहित पाटील यांनी तीव्र हल्लाबोल केला. त्यांनी सांगितले की, पॅकेज मोठे दाखवले असले तरी खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या हाती फक्त ६,५०० कोटीच जाणार आहेत. बहुतेक शेतकऱ्यांना फक्त १३,००० ते १५,००० रुपये मदत मिळणार आहे. द्राक्षबागेचा एकरी खर्च ₹२ ते २.५ लाख, आणि सोयाबीनची बॅग हजारोंमध्ये; अशावेळी ही मदत अतिशय तुटपुंजी असून निवडणुका जवळ आल्या म्हणूनच हे पॅकेज घोषित झाले; हा शेतकऱ्यांना दिलेला खुराक नव्हे, तर निवडणुकांसाठीचा खुराक आहे.

नुकसानग्रस्त तालुक्यांच्या याद्यांवर राजकीय हस्तक्षेपाचा आरोप करत पहिल्या यादीनुसार २५३ तालुके, पुढील यादीनुसार २८२ तालुके घोषित झाले. यावर पाटील यांनी तिखट प्रश्न उपस्थित केला ते म्हणाले की, तासगाव, जत, कवठेमंकाळ, मिरज येथे १३ मे पासून पावसाने नुकसान झाले. तरी आमचे तालुके यादीतून का वगळले? तर काही पुढाऱ्यांचे जिल्हे असल्यामुळे ते कसे समाविष्ट झाले? असा प्रश्न केला.

> **शेतकरी आत्महत्यांचे गंभीर संकट**
> जानेवारी ते ऑगस्टमध्ये ११०० शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या असून देशातील शेतकरी आत्महत्यांपैकी ३८.५ टक्के आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या आहेत ही परिस्थिती राज्य सरकारच्या धोरणात्मक अपयशाचे प्रतिक आहे, असे आ.पाटील म्हणाले.

तासगाव तालुक्यात दोन वर्षांत १०,००० एकर द्राक्षबागा घट, राज्यात ४०,००० हेक्टर कांदा नुकसान, भात, केळी, तूर, सोयाबीन, कापूर सर्वच पिके गंभीर संकटात असल्याचे सांगत आ.पाटील यांनी मागणी केली की, ₹५०,००० प्रति हेक्टर मदत द्यावी. कोकणातील मच्छीमार संकटात आहे. समुद्रकिनारी व नदीकाठी मासळी सडल्याने प्रचंड आर्थिक नुकसान झाले.सरकाने जाहिरातबाजी थांबवून शेतकरी व मच्छीमार केंद्रित पावले उचलावीत, अशी मागणी आ.पाटील यांनी केली.

> **राज्य सरकारने स्वतःची विमा कंपनी सुरू करावी**
> तासगाव मतदारसंघात घोणस आणि इतर प्राण्यांमुळे शेतांचे नुकसान वाढले असून त्यावर तत्काळ स्वतंत्र मदत योजना घोषित करावी, अशी मागणी त्यांनी केली. सरकारने स्वतःची विमा कंपनी सुरू करावी. एकाच नियमांचे दोन अर्थ काढून विमा कंपन्या मदत नाकारतात.मागील वर्षी मदत दिली; यावर्षी तेच नियम असूनही नकार यावर लोकप्रतिनिधींना वारंवार आंदोलन करावे लागते यासाठी राज्याने स्वतःची विमा कंपनी सुरू करावी व शेतकऱ्यांची फसवणूक थांबवावी,अशी मागणीही यावेळी आ.पाटील यांनी केली.

## कराडमधील रस्ते दुरूस्तीची मागणी

कराड,ता.१३(प्रतिनिधी)–

**शहरातील अनेक रस्त्यांवरील खड्डे कायमस्वरूपी उपाययोजनांसह बुजवावते, अशी मागणी दक्ष कराडकर ग्रुपचे प्रमोद पाटील यांनी मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांच्याकडे केली आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, शहरातील अनेक प्रमुख तसेच अंतर्गत रस्त्यांवरील खड्ड्यांची स्थिती अत्यंत गंभीर असून अजूनही दुरूस्ती झाली नाही. दैत्य निवारणी मंदिर तसेच जुन्या पुलाकडे जाणारा रस्ता, अशोक चौक ते पोस्ट ऑफिस मार्ग, दर्गा मोहल्ला मेन रोड ते कन्या शाळा पुढे कृष्णा नाका तसेच कार्वे नाका कडे जाणारा मुख्य मार्ग तसेच शहरातील बऱ्याच रस्त्यांवर मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत. हे रस्ते अत्यंत खराब स्थितीत आहेत. यापैकी दैत्य निवारणी मंदिरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील खड्डे प्रचंड मोठे असून वाहनचालक, पादचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण करीत आहेत. शहरात सुरक्षित, टिकाऊ आणि दर्जेदार रस्ते अत्यावश्यक आहेत.

● रविवार विशेष

भारत आणि इटली दरम्यान मैत्रीचा नवा सुवर्ण बंध भक्कम होत आहे. दोन्ही देशांतील राजनैतिक संबंधांना ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने इटलीच्या उपपंतप्रधानांचा भारतदौरा अनेक दृष्टीने फलदायी ठरला आहे. त्यातील मुख्य फलश्रुती या लोकशाही मूल्य रक्षणाच्या नव्या सिद्धांतावर आधारलेले आहेत, तेच या कराराचे खरे मर्म आहे.

# भारत-इटली सामायिक भागीदारीचे नवे पर्व





प्राचीन काळापासून भारत आणि इटली दरम्यान परस्पर सहकार्याचा व आदान-प्रदानाचा इतिहास आहे. भारतीय संस्कृती व रोमन संस्कृती यांच्यातील सांस्कृतिक आदान-प्रदान हे उच्च दर्जाचे होते, असे सातवाहन काळातील उत्खननावरून स्पष्ट होते. भारतीय वस्त्रोद्योग म्हणजे महावस्त्र पैठणी इटलित कमालीचे लोकप्रिय होते तसेच लाकडी कलाकुसर, हस्तीदंती वस्तू यांचीही इटलीत मागणी होती. सुवर्ण अलंकार, हिरे, माणिक, मोती व पाचू यांनाही इटालीत चांगली मागणी होती. इटालियन प्रवासी निकोलाय मनुची याच्या प्रवास वर्णावरून प्राचीन भारतातील समृद्धीचे चित्र स्पष्ट होते. प्राचीन मौर्य गुप्त व वाकाटक काळ, विजयनगरचे हिंदू साम्राज्य तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील कृषी व औद्योगिक उत्पादने यांचीही इटालीकडून चांगली मागणी होती. आधुनिक काळात झालेल्या नव्या सामंजस्य करारामुळे प्राचीन परंपरांचे वर्तमान काळात नूतनीकरण झाले आहे. नवे करार हे भूत, वर्तमान आणि भविष्यकाळात मैत्रीचा सुंदर गोफ विणण्यासाठी खरोखरच पूरक ठरले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याकाळात भारत आणि इटली दरम्यानचे संबंध हे नव्या लोकशाही सिद्धांतांवर आधारलेले आहेत. कारण समान लोकशाही मूल्यांवर श्रद्धा ठेवून दोन्ही देश मानवतेच्या भल्यासाठी आणि दोन्ही देशांतील लोकांच्या कल्याणासाठी वचनबद्ध झाले आहेत. हा नवा सिद्धांत दोन्ही देशांना अधिक प्रभावीपणे जोडणारा आहे. तत्त्व आणि व्यवहारी दृष्टीने सुद्धा या सिद्धांताचे प्रकटीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. इटली हा युरोपचा चेहरा आहे, युरोपची ओळख आहे. इटलीवर प्रभाव टाकल्यास त्या प्रभावाचे वारे सबंध युरोपमध्ये पोहोचतात. भारत संबंध जसे सुधारले आहेत, तसे इटलीच्या मैत्रीला सुद्धा आता एक नवा संदर्भ, नवा अर्थ प्राप्त झाला आहे. त्यातील काही पैलू सूक्ष्मपणे उलगडण्याचा प्रयत्न या लेखामध्ये केला आहे. त्याची मांडणी केवळ भू-राजनैतिक नव्हे, तर सांस्कृतिक दृष्टीने महत्त्वाची आहे.

राजकीय समाजशास्त्र दृष्टीने विचार केल्यास भारत- इटली मैत्री ही आता गतकालीन कालबाह्य तत्त्वांपेक्षा वर्तमानकालीन नव्या बहुधृवी जगातील समसमान मानवी कल्याणाच्या लोकशाही सिद्धांतावर आधारलेली आहेत. समान हित, समान ध्येय, उद्दिष्ट आणि समान कल्याणाचे कार्यक्रम यांमुळे दोन्ही देश अधिक समिप आले आहेत. ही समीपता केवळ राजकीय नसून ती आर्थिक, सांस्कृतिक आणि रणनैतिक भागीदारीवर आधारलेली आहे. कुटनिती तत्त्वावर तेच या नव्या मैत्रीचे खरेखुरे मर्म आहे. सबंध युरोपमध्ये इटली आणि जर्मनी या दोन देशांचे स्वतंत्र महत्त्व आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर या दोन्ही देशांनी आपल्या राजकीय व्यवस्थेत बदल करून लोकशाही मूल्यांवर आधारित सामाजिक व आर्थिक विकासाला नवी गती दिली आहे. इटलीच्या वर्तमान पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी भारताबरोबरचे संबंध अधिक भक्कम केले आहेत आणि आता स्थिर व समृद्ध जगाच्या उभारणीसाठी या दोन्ही देशांनी लोकशाही मूल्यांवर आधारित सामायिक भागीदारीचे नवे पर्व आरंभिले आहे. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी भारत- इटली संबंधांचे वर्णन लोकशाही मूल्यांची सामायिक भागीदारी या शब्दात अचूकपणे केले आहे. उभय राष्ट्रांमधील संबंधांमध्ये एक नवे सकारात्मक वळण आले आहे आणि आता दोन्ही देश पुढील वाटचालीसाठी अत्यंत सक्रियपणे परस्परपूरक भूमिका घेऊन पुढे सरसावत आहेत.

### नवा कृती आराखडा

इटलीचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री असलेले श्री. ताज्यानी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आणि अत्यंत सोहार्दपूर्ण वातावरणात झालेल्या चर्चेतून परस्परपूरक सहकार्याचे उत्साही वातावरण तयार झाले आहे. इटली-भारत संयुक्त व्यापार मंचाचे अध्यक्षपद ताज्यानी यांनी भूषविले. भारताचे उद्योग मंत्री पियुष गोयल यांनीही या चर्चेत मोलाचा सहभाग नोंदविला. वर्षभरातील ताज्यानी यांची ही दुसरी भेट आहे. त्यामुळे उभय राष्ट्रांमधील सामायिक भागीदारीच्या प्रक्रियेला आता अधिक गती मिळाली आहे. परस्पर सहकार्याचा नवा कृती आराखडा हे या चर्चेचे खरे फलित होय. स्थळ, काळ आणि परिस्थितीचा विचार करता हा आराखडा पुढील चार-पाच दशकांचा मोठा कालावधी समोर ठेवून तयार करण्यात आला आहे. परस्पर सहकार्याची नवी क्षितिजे दोन्ही देशांना आर्थिक समृद्धीकडे घेऊन जाण्यासाठी फलदायी ठरू शकतील अशी आहेत. जेव्हा दोन राष्ट्रांचे संबंध हे निश्चित मूल्यांवर आधारलेले असतात तेव्हा परस्पर मैत्री ही विचार, कृती आणि योजना या आधारे आकार घेते. त्यामुळे आता विकसित करण्यात आलेल्या नव्या कृती आराखड्यास दीर्घकालीन महत्त्व आहे. २०२५ ते २०२९ च्या दरम्यान प्रगतीचा आढावा घेणारा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे भविष्यकालीन योजना उत्तम प्रकारे कृतीत आणता येतील.

### मौलिक सामंजस्य करार

भारताची दमदार आर्थिक वाटचाल पाहता संरक्षण, ऊर्जा तसेच अंतराळ संशोधन आणि कौशल्य विकास, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम प्रज्ञा या क्षेत्रांतील भारताची मोठी गरुडझेप इटलीला मार्गदर्शक ठरू शकेल तसेच कृषी व उद्योग या क्षेत्रांतील उभय देशांतील कल्पनांचे आदान-प्रदान दोन्ही देशांना अनुभवसंपन्न करण्यासाठी आणि प्रत्यक्ष व्यवहारी सुधारणा करण्यासाठी फलदायी ठरू शकतील. संपर्क आणि कनेक्टिव्हिटी हा नव्या जगाचा आत्मा आहे. त्यामुळे याबाबतीत भारताने विविध क्षेत्रांत मिळविलेले धवल यश इटलीला पथदर्शक ठरू शकते.

भारत आणि इटली दरम्यान संमत करण्यात आलेले मौलिक सामंजस्य करार विशेष महत्त्वाचे आहेत. दोन्ही बाजूने राजकीय सहकार्याच्या पलीकडे जाऊन सागरी सुरक्षा,अवकाश संशोधन, सांस्कृतिक आदान-प्रदान व पर्यटन तसेच महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान आणि लोकसंपर्क इत्यादी पैलूंवर या सामंजस्य कराराने भर दिला आहे. ५० जणांचे उच्चस्तरीय शिष्टमंडळ सहकार्याची क्षेत्रे विकसित करण्यासाठी भारतात दाखल झाले होते.

दहशतवाद हा दोन्ही देशांना जवळ आणणारा एक समान मुद्दा आहे. त्यामुळे दहशतवादी वित्त पुरवठा रोखण्यासाठी संयुक्त पुढाकार घेण्याचे ठरले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात २०२५ ते २०२७ दरम्यान वैज्ञानिक सहकार्याची दिशा ठरवण्यासाठी कार्यक्रम आखण्यात आला आहे व अशा करारावर दोन्ही देशांनी स्वाक्षऱ्या केल्या. आर्थिक आघाडीवर व्यापार, गुंतवणूक आणि संरक्षण उत्पादन क्षेत्रांतील सहकार्याचा समावेश आहे. अंतराळ संशोधनात प्रामुख्याने अंतराळ तंत्रज्ञानामध्ये परस्परांतील सहकार्य वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. सामंजस्य करारामध्ये अंतराळ, संशोधन तसेच उच्च शिक्षण क्षेत्रांतील आदान-प्रदानाला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे इटलीतील काही विद्यापीठे भारतामध्ये प्रवेश करू शकतील. भारत-इटली व्यापार वृद्धीमध्ये काही महत्त्वाच्या पैलूंचा समावेश आहे. त्यामध्ये इटलीत लोकप्रिय होत असलेल्या कोल्हापुरी पादत्राणे यांच्या उत्पादनास गती देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. त्यामुळे कोल्हापुरी पादत्राणांना इटलीमध्ये मोठी बाजारपेठ मिळेल आणि महाराष्ट्रात रोजगार संवर्धनाची संधीही प्राप्त होईल. नव्या जगात तंत्रकुशल कामगारांचे महत्त्व लक्षात घेऊन भारत जगाची कौशल्य राजधानी बनला आहे, तेव्हा इटलीससुद्धा कुशल मनुष्यबळ भारत विविध क्षेत्रांत पुरवू शकेल. त्यामुळे दोन्ही देशांतील शिक्षण, प्रशिक्षण याबाबतीतील देवाण-घेवाण रोजगार निर्मितीसाठी हितवर्धक ठरू शकेल.

या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की, भारत आणि इटली हे आशिया व युरोप खंडातील सर्वात जवळचे भागीदार आहेत. ते समान लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी तसेच स्थिर व समृद्ध जगासाठी एका वचनबद्धतेवर आधारित मैत्रीचा सिद्धांत विकसित करत आहेत. उभयतांनी प्रकाशित केलेल्या संयुक्त निवेदनात सुद्धा हा केंद्रबिंदू म्हणून विकसित करण्यात आला आहे. दहशतवाद विरोधातील समान भूमिका आणि वित्तपुरवठा खंडित करण्यासाठी करावयाचे प्रयत्न विज्ञान-तंत्रज्ञान, संरक्षण व अंतराळ संशोधन तसेच नवोन्मेष प्रतिभेचा विकास याबाबतीत करण्यात आलेले संशोधन करार हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यामुळे दोन्ही देशांतील संबंधांना भविष्यकाळात अधिक बळकटी येणार आहे. या कृती आराखड्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. इटलीचे उपपंतप्रधान अंटानिओ ताज्यानी हे प्रगल्भ आणि अनुभवी नेते आहेत. त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक विविध सामंजस्य करारांची सखोल चर्चा करून मांडणी केली आहे. त्यांच्या शिष्टमंडळाने सुद्धा चिकित्सक दृष्टीने विचार-विनिमय करून त्यात मोलाची भर टाकली आहे. दोन्ही देशांकडून उचललेली पावले कौतुकास्पद आणि प्रशंसनीय आहेत. दोन्ही देशांतील राजनैतिक संबंधांना ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने झालेल्या सामंजस्य करारांचे महत्त्व खरोखरच लक्षणीय आहे. लोकशाही, स्वातंत्र्य तसेच स्थिरता आणि विकासाला चालना देण्यासाठी प्रेरक मूल्यांची जोपासना करताना दोन्ही देश मानवी हक्क आणि कायद्याचे राज्य या प्रमुख मूल्यांप्रती असलेल्या त्यांच्या दृढ वचनबद्धतेवर भर देतात. त्यामुळे ही मैत्री दीर्घकालीन संबंधांना कायमस्वरूपी आधार देणाऱ्या सिद्धांतांवर आधारलेली आहे. राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि धोरणात्मक हितसंबंधांच्या रक्षणासाठी उच्च पातळीवरचे प्रयत्न त्यामुळे गतिमान झाले आहेत. २०२० ते २४ दरम्यान विकसित करण्यात आलेला सहकार्याचा भावी आराखडा हा तत्त्व, सिद्धांत आणि व्यवहार यांमध्ये सुवर्णमध्य साधणारा आहे.

भारत एक उभरती अर्थव्यवस्था आहे आणि इटली व भारताची संस्कृती प्राचीन आहे. त्यामुळे लोकसंपर्क हे परस्पर हितसंबंध रक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. परिणामी, दोन्ही देश शिक्षण, पर्यटन या क्षेत्रांत काही ठोस पावले उचलू इच्छितात. आंतरराष्ट्रीय कायदा, सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडता तसेच जलवाहतुकीचे स्वातंत्र्य आणि दहशतवादी संघर्षापासून मुक्त अशा खुल्या आणि नियमांवर आधारित हिंद प्रशांत क्षेत्राच्या विकासासाठी दोन्ही देश सज्ज झाले आहेत. आंतरराष्ट्रीय सागरी वाहतूक आणि सुरक्षा हा दोघांच्याही समान चिंतेचा विषय असल्यामुळे हिंद प्रशांत क्षेत्रातील वातावरण सुरक्षित ठेवण्यासाठी एक समग्र दृष्टिकोन विकसित करण्यावर दोन्ही देशांनी भर दिला. सागर संपत्तीचे रक्षण आणि सुरक्षा याबाबतीत करावयाचे प्रयत्न दोघांच्याही संयुक्त घोषणापत्रातील तीस मुद्दे अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यातील प्रत्येक पैलू दोन्ही देशांच्या हितासाठी फायदेशीर असा आहे. दोन्ही देशांनी युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित करणे तसेच पुरवठा साखळी सुरळीत करणे, सायबर गुन्हेगारी रोखणे, दहशतवाद वित्त पुरवठा थांबविणे यासाठी घेतलेला पुढाकार लोकशाहीच्या हितासाठी पोषक असा आहे. त्यामुळे भारत-इटली मैत्रीतील संयुक्त भागीदारी भविष्यांत सुद्धा तेवढीच मजबूत ठरेल, यात शंका नाही.

**प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर**

◆◆◆

● लक्षवेधी

## उत्तरे मिळायला हवीत

'मतांची चोरी' होत असल्याच्या आरोपात कितपत तथ्य आहे, यावर मतभेद संभवतात. निष्पक्ष दृष्टीने पाहता, भाजपचा प्रत्येक विजय केवळ 'मतव्यवस्थापनामुळे'च होत आहे, असे ठामपणे म्हणणे अवघड आहे. काही राजकीय पक्षांनी आपल्या अपयशांवर पांघरूण घालण्यासाठी या कथनाचा आधार घेतला, ही शक्यताही नाकारता येत नाही. तथापि, हेही तितकेच खरे आहे की लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांमुळे या नॅरेटिव्हला बळ मिळाले आहे. त्यामुळे या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहणे आणि त्यांची विश्वासार्ह उत्तरे देणे, हे सत्ताधाऱ्यांचे कर्तव्य ठरते.

निवडणूक सुधारणा विषयावरील चर्चेदरम्यान राहुल गांधी यांनी सरकारसमोर तीन थेट प्रश्न मांडले. हे प्रश्न केवळ संसदेपुरते मर्यादित नसून, दीर्घकाळ सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी राहिलेले आहेत. त्यांनी विचारले की निवडणूक आयुक्तांच्या निवड समितीतून भारताच्या सरन्यायाधीशांना का वगळण्यात आले? पदावर असताना आयुक्तांनी केलेल्या कृतींबाबत त्यांच्यावर कोणतीही वैधानिक कारवाई करता येणार नाही, अशी तरतूद का करण्यात आली? तसेच निवडणुकीनंतर अवघ्या ४५ दिवसांत सीसीटीव्ही फुटेज आणि त्यावर आधारित डेटा नष्ट करण्याची मुभा देणारा कायदा का करण्यात आला? जर केंद्र सरकारला जनमताच्या मोठ्या वर्गात निवडणुकांची झपाट्याने कमी होत चाललेली विश्वासार्हता पुन्हा प्रस्थापित करायची असेल, तर या प्रश्नांची ठोस आणि समाधानकारक उत्तरे देणे अपरिहार्य आहे. वास्तविक, राहुल गांधी यांनी मांडलेल्या चार मागण्यांबाबत सरकारने सकारात्मक भूमिका घेतली, तर देशातील निवडणूक प्रक्रिया अधिक वादग्रस्त होण्यापासून वाचू शकते.

या मागण्या स्पष्ट आहेत : निवडणुकीच्या किमान एक महिना आधी मशीन-रीडेबल मतदार यादी जाहीर करण्यात यावी; सीसीटीव्ही फुटेज नष्ट करण्याचा कायदा मागे घेण्यात यावा; विरोधी पक्षांना ईव्हीएम यंत्रणांपर्यंत प्रवेश देण्यात यावा व त्यांचे आर्किटेक्चर सार्वजनिक करण्यात यावे; तसेच निवडणूक आयुक्तांना दंडमुक्ती देणाऱ्या



कायद्यात बदल करण्यात यावा. कोणत्याही तर्काच्या आधारे या मागण्या अवाजवी किंवा अन्यायकारक आहेत, असे म्हणता येणार नाही.

निवडणूक प्रक्रिया ही कोणत्याही एका पक्षाची मालकी नसून, सर्व राजकीय पक्ष तिचे समान भागीदार आहेत. त्यामुळे या मागण्यांचे औचित्य आपोआप सिद्ध होते. 'मतांची चोरी' या आरोपात तथ्य आहे की नाही, हा प्रश्न वादग्रस्त असू शकतो; मात्र या आरोपांना कारणीभूत ठरणाऱ्या शंकांचे निरसन न करणे, हे लोकशाहीसाठी धोकादायक ठरू शकते.

◆◆◆

● यशोगाथा

## कृषीरागिणीची यशोगाथा

हरियाणातील महमूदपूर गावातील सरला देवी यांनी आपल्या पतीच्या उपचारांसाठी औषधी उत्पादनांचा शोध घेतला आणि त्यातूनच त्यांनी स्थानिक महिलांना व शेतकऱ्यांना शेवग्याच्या उत्पादनांच्या माध्यमातून रोजगाराचे नवे दालन मिळवून दिले. शेवग्याच्या उच्च गुणवत्तेमुळे मिळणाऱ्या फायद्यांची जाणीव झाल्यानंतर त्यांनी शेतीत अनेक प्रयोग केले आणि या प्रयत्नांमुळे त्यांना दिवसेंदिवस नवी ओळख मिळत गेली. औषधी उत्पादनांच्या वाढत्या मागणीचा अभ्यास करून त्यांनी शेवग्याच्या पानांपासून ते शेंगांपर्यंत सर्व घटकांचा वापर करण्याचे प्रशिक्षण घेतले. त्यानंतर मुळांपासून देठांपर्यंतही विविध आरोग्यदायी पदार्थ तयार करण्याचे काम त्यांनी सुरू केले. त्या शेतकऱ्यांना मोफत बियाणे उपलब्ध करून देतात आणि शेती प्रशिक्षणही देतात.



सरला सांगतात की त्यांचे पती दिल्लीत ११ वर्षे कॉर्पोरेट क्षेत्रात काम करत होते. त्या काळात त्यांना आरोग्यविषयक अनेक समस्या भेडसावत होत्या आणि घरच्या डॉक्टरांकडून मिळणारे उपचार उपयोगी पडत नव्हते. एके दिवशी त्यांच्या एका मित्राने शेवगा (मोरिंगा) वापरण्याचा सल्ला दिला. त्यांनी घरच्या बागेत झाडे लावली आणि त्याचा नियमित वापर केल्यावर पतींच्या पचनसंस्थेशी, हृदयाशी आणि इतर आरोग्यदायी घडामोडींशी निगडित तक्रारी कमी होत गेल्या. हे परिणाम पाहून सरलांनीही २०१७ मध्ये शेवग्याची लागवड सुरू केली.


शेवग्याचे अनेक औषधी उपयोग आहेत, ही जाणीव झाल्यावर त्यांनी नोकरी सोडली आणि पूर्णपणे गावात स्थिरावून या उत्पादनावर लक्ष केंद्रित केले. उत्तम दर्जाचे बियाणे उपलब्ध झाल्याने शेवग्याचे प्रभावी औषधी गुण अधिक स्पष्ट झाले. त्याच काळात त्यांनी जमिनीतील सुपीकता वाढवण्यावरही काम केले. जमिनीतील सेंद्रिय घटक वाढवण्यासाठी अनेक लोकांकडून माहिती गोळा केली आणि मोरिंगाच्या पानांपासून तयार होणाऱ्या खतांचा प्रयोग केला. दोन वर्षे हा मल्चिंग आणि जमिनीच्या गुणवत्तेचा अभ्यास करत त्यांनी नवीन पद्धती विकसित केली. त्यानंतर २०१८ मध्ये त्यांनी शेवग्याचे व्यावसायिक उत्पादन सुरू केले आणि त्यात त्यांना उत्तम यश मिळाले. आज त्यांना देश-विदेशातही यामुळे ओळख मिळाली आहे. त्यांच्या शेवग्याच्या उत्पादनांना अमेरिकेत आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये पसंती मिळत आहे.

● श्रद्धांजली

## सभ्य,सुसंस्कृत राजकारणी

शिवराज पाटलांनी वयाच्या ९० व्या वर्षी इहलोकीचा निरोप घेतला. लोकसभेच्या सभापतीपदापासून देशाच्या गृहमंत्री पदापर्यंत अनेक उच्च पदे भूषविलेला हा माणूस लौकिकार्थाने राजकारणी कधी नव्हताच. १९७८ पासून सक्रीय राजकारणात असूनही आपला गट, समर्थकांचा कंपू बनवून राजकारणाच्या स्पर्धेत ते कधीच उतरले नाहीत. हेच त्यांचे वेगळेपण ठरले. गांधी घराण्याशी एकनिष्ठ असूनही त्यांना या निष्ठेचे प्रदर्शन कधीच करावेसे वाटले नाही. सभ्य, सुसंस्कृत राजकारणाचा वस्तुपाठ घालून दिलेल्या शिवराजजींनी सत्ता पदासाठी पक्ष श्रेष्ठींकडे कधीच याचना केली नाही. १९८० च्या दशकातले काँग्रेस अंतर्गत राजकारण ज्यांना आठवत असेल त्यांना शिवराजजींचे मोठेपण प्रकर्षाने जाणवेल. त्याकाळात वसंतदादा पाटील एकीकडे आणि दुसरीकडे बॅरिस्टर अंतुले, बॅरिस्टर रामराव आदिक या निष्ठावंतांचा गट एकमेकांच्या विरोधात सतत दंड थोपटून असत.

शिवराज पाटील हे जाहीरपणे कुठल्याच नेत्याच्या कळपात गेले नाहीत. असे असले तरी वसंतदादांनी किंवा दादांच्या विरोधकांनी शिवराजजींना लोकसभेची उमेदवारी देऊ नये म्हणून प्रखर विरोध केला नाही. अर्थात इंदिरा , राजीव आणि नंतर सोनिया अशा समस्त गांधी कुटुंबाचा त्यांच्यावर वरदहस्त होताच. विद्वत्ता लाभलेल्या शिवराजजींचे वेगळेपण गांधी कुटुंबियांना ठाऊक होते. काँग्रेसच्या दरबारी राजकारणात त्यांच्यासारख्या कोणत्याच गटा तटाच्या नसलेल्या व्यक्तीला अनेक मोठी सत्ता पदे मिळावीत याचे अनेकांना आश्चर्य वाटत असे. त्यांनी महाराष्ट्रातील एखाद्या नेत्याच्या विरोधात दिल्लीश्वरांकडे तक्रारी केल्या नाहीत किंवा कट कारस्थाने केली नाहीत. मी खासदार आहे , देशाची राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरील धोरणे ठरविण्यासाठीच्या सर्वोच्च



व्यासपीठावर माझी मते व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे , स्थानिक प्रश्नांवर , समस्यांवर मी बोलणार नाही, असे ते सांगत असत. आपला मतदार जपण्यासाठी त्यांनी कधीच लोकानुनय केला नाही . गेला माणूस दे चिठ्ठी , दे पत्र , कर फोन अशी त्यांची राजकारणाची पद्धत नव्हती. त्या अर्थाने त्यांनी आपल्याभोवती मर्यादित चौकट आखून घेतली होती. लातूर जिल्ह्यातील जातींच्या समीकरणाचे गणित जुळत असल्यामुळे त्यांचा पराभव होत नाही असं बोललं जात असे . काही अंशी ते खरं असेलही, पण कोणाशी शत्रुत्व नसल्याचा फायदा शिवराजजींना मिळत असे.


राजकारणातल्या विरोधकांशी सूडबुद्धीने वागणे , विरोधकांना सतत नडणे असले संकुचित राजकारण त्यांनी कधीच केले नाही. विद्वत्ता , निगर्वी स्वभाव , निष्कपट वृत्ती, उदारमतवादी असलेल्या शिवराजजींनी आपल्या गुणांच्या बळावर १९९१- ते १९९६ या कठीण काळात लोकसभेचे कामकाज अतिशय कुशलतेने हाताळले. विरोधकांच्या मनातही त्यांच्याबद्दल आदराची भावना होती.

मला आठवतंय १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपातर्फे विलासरावांचे जवळचे नातलग डॉ. गोपाळराव पाटील यांना रिंगणात उतरवले गेले होते. डॉ.गोपाळराव पाटलांच्या प्रचारासाठी अटलजी लातूरला आले होते. प्रतिस्पर्धी उमेदवाराविरुद्ध म्हणजे शिवराज पाटील यांच्या विरोधात मी काहीही बोलणार नाही , कारण मला त्यांच्याबद्दल आदर आहे , असे अटलजींनी सभेतच सांगितले होते. ८०, ८४, ८९ , ९१, ९६, ९८ , ९९ अशा सलग सात वेळेस लोकसभेवर निवडून जाण्याचा विक्रम त्यांनी केला. यावेळी शिवराज पाटलांचे अवघड आहे , असं प्रत्येक निवडणुकीत बोललं जायचं , पण ते निवडून येत. २००४ मध्ये मात्र शिवाजीराव पाटलांच्या सुनबाईंनी - रुपाताईंनी शिवराजजींना पराभूत केले. पराभूत होऊनही त्यांना देशाचे गृहमंत्रीपद मिळाले. अशा आगळ्या वेगळ्या शिवराजजींना श्रद्धांजली.

**- चंद्रहास मिरासदार,**

ज्येष्ठ पत्रकार - राजकीय विश्लेषक ◆◆◆

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**रविवार,ता.१४.१२.२०२५,** विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५२, शालिवाहन शके १९४७, विश्वावसुनाम संवत्सरे दक्षिणायणे, हेमंत ऋतो, मार्गशीर्ष मासे, कृष्ण पक्षे, दशमी तिथी, १८.५० नंतर एकादशी तिथी, हस्त नक्षत्र, ८.१९ नंतर चित्रा नक्षत्र, कन्या रास, २१.४१ नंतर तुळ रास, सौभाग्य योग, ११.४५ नंतर शोभन योग, विष्ठी करण १८.५० नंतर बवकरण, दिनमान ११.००, सुर्योदय ६.५७, सुर्यास्त १७.५७,(कोल्हापूरचे) राहू काळ सायं. ४.३० ते ६, ब्रम्हचैतन्य महाराज पु.दि.गोंदवले, महावीर दिक्षोत्सव, भद्रा १८.५० पर्यंत, अमृत ८.१९ पर्यंत,घबाड ८.१९ पर्यंत.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## * राशीभविष्य

**मेष-** अत्यंत व्यस्त वेळापत्रकात देखील आपले आरोग्य चांगले असेल. तुमच्या जवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि या सोबतच मनाची शांती असेल.

**वृषभ-**तुमचे धन तुमच्या कामी तेव्हाच येते जेव्हा तुम्ही व्यर्थ खर्च करण्यात स्वतःला थांबवतात ही गोष्ट आज तुम्हाला चांगल्या प्रकारे लक्षात येईल.

**मिथून-** तुमचा आनंदी उत्साही स्वभाव इतरांना आनंद देणारा असेल. आज केवळ बसून राहण्यापेक्षा काहीतरी असे करा ज्यामुळे तुमची मिळकत क्षमता वाढू शकेल.

**कर्क-** आपल्या व्यवसायात उत्तम प्रगती करू शकतात. ज्यामुळे तुम्हाला आर्थिक लाभही होईल.थोडेसे अधिक प्रयत्न केलेत तर आजचा दिवस अधिक चांगला जाईल.

**सिंह-** तुम्ही जे काही कराल त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा निम्माच वेळ लागेल. व्यापारात मजबुती येण्यासाठी तुम्ही आज काही महत्वाचे पाऊल उचलू शकता.

**कन्या-** कलात्मक छंद तुम्हाला आराम मिळवून देतील. आणखी पैसा कमावण्यासाठी तुमच्याजवळील नावीन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करा.

**तुळ-**आजच्या दिवशी घडणाऱ्या घटना एकाच वेळी चांगल्या आणि निराशाजनक असतील, त्यामुळे तुम्ही गोंधळून आणि थकून जाल. जीवनाला आज तुम्ही जवळीकतेने जाणून घ्याल.

**वृश्चिक-**तुमचे धन कुठे खर्च होत आहे यावर तुम्हाला नजर ठेवण्याची आवश्यकता आहे अथवा येणाऱ्या काळात तुम्हाला समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**धनु-**आज घरातून बाहेर जातांना मोठ्यांचा आशीर्वाद घेऊन निघा यामुळे तुम्हाला धन लाभ होऊ शकतो. तुमचे विनयशील वागण्याबद्दल कौतुक होईल.

**मकर-**चांगला काळ सदैव टिकून रहात नाही. माणसाच्या गरजा या ध्वनीलहरींप्रमाणे असतात. तुमचे अनपेक्षित वागणे तुमच्या अवतीभवतीच्या लोकांना गोंधळात टाकेल.

**कुंभ-**आज तुम्हाला आपले धन खर्च करण्याची गरज पडणार नाही कारण, घरातील कुणी मोठे व्यक्ती तुम्हाला धन देऊ शकतात. रिकाम्या वेळेचा आज तुम्ही सदुपयोग कराल.

**मीन-**आर्थिक दृष्टीने चांगला राहील आणि तुम्हाला पर्याप्त धन प्राप्ती होईल. सहकुटूंब सामाजिक कार्य केल्याने प्रत्येकजण आनंदी आणि निवांत राहील.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अ‍ॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# शियेत मावा विक्रेत्यावर कारवाई

## तीन हजाराचे साहित्य जप्त

टोप,ता.१३(प्रतिनिधी) –

**शिये ता. करवीर येथील हनुमान नगर येथील पाण्याच्या टाकीजवळ अवैद्यरित्या मावा बनवून विक्री करणाऱ्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाकडून कारवाई केली त्याच्या कडून तिन हजाराचे मावा बनविण्यासाठी लागणारे साहित्य जप्त केले .**

शिये हनुमान नगर येथील पाण्याच्या टाकीजवळ आर के पान शॉप नावाची पान टपरी असून यामध्ये ऋतुराज शशिकांत कलकुटकी ( वय २१ रा. वड्डु गल्ली भादोले ) हा अवैद्यरित्या सुगंधी तंबाखू,सुगंधी सुपारी व वेगवेगळ्या पत्यांचे मिश्रण तयार करुन त्याचा मावा बनवुन त्यावर कोणतेही लेबल न लावता अथवा त्याचेवर सुरक्षेबाबत कोणताही वैधानिक इशारा लिहीलेला नसताना विक्री करताना सापडला असून पोलिसांनी सुपारीचे १ किलोचे २ पॅकेट, सुंगधी तंबाखु ची सुमारे १ किलोचे १ पॅकेट, त्यात एकुण ३८ माव्याच्या पुड्या, त्यामध्ये सुगंधी तंबाखु, चुन्याचे पाणी, सुपारीचे मिश्रण व वेगवेगळया पत्यांचे मिश्रण असलेली प्लास्टीक च्या कागदामध्ये गुंडाळलेल्या पुड्या असे एकूण ३,१६०/ रुपयाचा मुददेमाल जप्त केला.



# शासकीय योजनांचे लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात राजे फौंडेशनचा पुढाकार

## राजे समरजितसिंह घाटगे

कागल,ता.१३(प्रतिनिधी)–

**कागल–गडहिंग्ल–जउत्तूर विभागातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासह समाजहिताचे विविध उपक्रम सातत्याने राबविण्याचे कार्य राजे विक्रमसिंह घाटगे फाउंडेशन करीत आहे. या उपक्रमांचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शाहू उद्योग समूहाचे अध्यक्ष राजे समरजितसिंह घाटगे यांनी केले.**

येथे फाउंडेशनच्या कार्यालयात शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळालेल्या बड्याचीवाडी (ता. गडहिंग्लज)येथील लाभार्थ्यांच्या वतीने राजे समरजितसिंह घाटगे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उत्तूर येथील प्रसाद येसादे यांच्यावर राजे फाउंडेशनच्या माध्यमातून मोफत शस्त्रक्रिया केल्याबद्दल त्यांनीही घाटगे यांचा सत्कार करत कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी ते बोलत होते. यावेळी घाटगे पुढे म्हणाले की,राजे विक्रमसिंह घाटगे फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही समाजासाठी विविध उपक्रम राबवत आहोत. प्राथमिक शाळांना ई–लर्निंग संच, गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार, वॉटर एटीएम सुविधा, तसेच इतर मूलभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध करून देणे अशी कार्ये सातत्याने सुरू आहेत. शासनाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचाव्यात, यासाठी फाउंडेशन कटिबद्ध आहे.या कार्यक्रमाला सरपंच बाजीराव खोत, उपसरपंच वसंत पवार, सदस्य बाजीराव खोत, दिलीप राक्षे, किरण खोत, सुरेश पवार, सुनील पवार, राजू अर्जुनवाडे यांसह परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

# अपघातप्रकरणी पीडित कुटुंबाला १ कोटींची भरपाई

कराड,ता.१३(प्रतिनिधी)–

**कराड येथे घडलेल्या गंभीर मोटार वाहन अपघात प्रकरणात लोकन्यायालयाच्या माध्यमातून तडजोड साध्य होत, पीडित अर्जदार मोहन मारुती शेवाळे व त्यांच्या कुटुंबीयांना तब्बल १ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली.**

या प्रकरणात जिल्हा न्यायाधीश यु. एल. जोशी व डी.बी. पतंगे, तसेच ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.एस.बी. गोवेकर यांनी प्रभावी मध्यस्थींची भूमिका बजावली. अर्जदारांच्या वतीने ॲड. निरज फिरंगे, ॲड. अजिंक्य डुबल, ॲड. मच्छिंद्र पवार, ॲड. यशवंतदत्त बेंद्रे व ॲड. ऋषिकेश यादव यांनी बाजू मांडली, तर विमा कंपनीकडून ॲड.एस.एस. फडतरे यांनी काम पाहिले.

# डंपर खाली सापडल्याने महिलेचा जागीच मृत्यू

## जुना बुधवार पेठेतील घटना

कोल्हापूर ता. १३ (प्रतिनिधी)–

**कामावरून घरी जाताना डंपरची मोपेडला धडक लागून डंपरखाली सापडून महिलेचा जागीच मृत्यू झाला. जुना बुधवार पेठेतील शहीद भगतसिंग तरुण मंडळाजवळ शनिवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास हा अपघात घडला.**

सुषमा धोंडीराम पाटील (वय ३८, रा. वडणगे, ता. करवीर) असे मृत महिलेचे नाव आहे. पोलिसांनी डंपर जप्त केला असून चालक योगेश गोविंद खुटाळे (वय ३५, रा. पिराची खडी, शिये, ता. करवीर) याला ताब्यात घेतले आहे.

वडणगे येथील सुषमा पाटील या लक्ष्मीपुरीतील एका होलसेल औषध विक्री दुकानात नोकरी करीत होत्या. त्यांचे पती एमआयडीसीमध्ये खासगी कंपनीत नोकरी करतात. शनिवारी सायंकाळी त्या काम संपवून घरी निघाल्या होत्या. जुना बुधवार पेठेत शहीद भगतसिंग तरुण मंडळाजवळ त्यांच्या मोपेडला समोरून आलेल्या डंपरच्या उजव्या बाजूने धडक बसली, त्यामुळे त्या चाकाखाली सापडल्या. चालकाने डंपर थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, चाक डोक्यावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. परिसरातील नागरिकांनी तातडीने त्यांना सीपीआरमध्ये दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले. अपघाताची माहिती मिळताच सुषमा यांच्या नातेवाईकांनी सीपीआरमध्ये गर्दी केली. अपघाताची नोंद लक्ष्मीपुरी पोलिस ठाण्यात झाली आहे.

# निस्वार्थी व्यक्तिमत्व : एम.पी.पाटील यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस

**गेल्या ५० वर्षापासून जत्राटसह परिसरात सामाजिक, राजकीय, सहकार, धार्मिक अशा सर्वच क्षेत्रात कार्यरत असणारे हालसिद्धनाथ सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान चेअरमन तथा लोककल्याण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम.पी. पाटील यांचा ७५ वा अमृतमहोत्सवी वाढदिवस आज रविवार दि.१४ डिसेंबर रोजी साजरा होत आहे त्यानिमित्त.....**

वेदगंगा नदीकाठावरील प.पू सद्गुरु बाबा महाराज यांच्या आध्यात्मिक चैतन्याचा स्पर्श झालेल्या जत्राट गावामध्ये ३ ऑगस्ट १९५० रोजी पिरगोंडा नारायण पाटील व श्रीमतीबाई पिरगोंडा पाटील यांच्या पोटी एम.पी पाटील यांचा जन्म झाला. बालपणीच त्यांच्या वडिलांचे छत्र हरपले.त्याना तीन बहिण होत्या.अगदी लहान वयातच त्यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी पडली. आल्लूर हे त्यांचे आजोळ होय. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण व्हीएसएम निपाणी व देवचंद महाविद्यालय येथे पूर्ण झाले. गडहिंग्लज येथील बहिणीची कन्या रेखा पाटील यांच्याशी त्यांचा विवाह झाला.

त्यांचे थोरले चिरंजीव रविंद्र हे वकिल म्हणून तर लहान चिरंजीव प्रशांत हे राजकीय व सहकार क्षेत्रात कार्यरत आहेत. अण्णांचे श्रद्धास्थान असलेल्या प.पू.सद्गुरू बाबा महाराज सेवा संस्था या नावाने संस्था स्थापन करून विविध उपक्रम राबविले आहेत. गावातील विविध मंदिरांच्या विकासासाठी पाठपुरावा केला.



त्यांनी १९७४ साली वेदगंगा दूध उत्पादक सहकारी संघाची स्थापना केली. त्यानंतर माजी केंद्रीय मंत्री बी.शंकरानंद, माजी आम.रघुनाथराव कदम, देवचंदजी शहा, आप्पासाहेब कुरबेट्टी, चिकोडीचे एम.के कवटगीमठ यांच्याशी संबंध आला. यावेळी त्यांनी चिक्कोडी तालुका कृषी उत्पन्न मार्केटिंग सोसायटीचे अध्यक्षपद भूषविले. काँग्रेस पक्षाचे खजिनदार म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली. १९८५ झाली काँग्रेस पक्षाकडून जिल्हा पंचायत निवडणुकीची उमेदवारी दिली. यादरम्यान मंडळ पंचायत निवडणूक लागल्या. तात्कालीन आमदार सुभाष जोशी, कै.शंकरराव सासणे, कै.वाय.एल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जनता दलात पक्षांतर केले. त्यानंतर जत्राट मंडळ पंचायतीवर मंडळ पंचायत प्रधान म्हणून पदभार स्वीकारला.तसेच जनता दल ग्रामीण भाग अध्यक्ष म्हणूनही काम केले.

जत्राट, श्रीपेवाडी, लखनापूर, पडलिहाळ, नांगनूर, भिवशी या परिसरात कै.शंकरराव सासणे यांच्या मार्गदर्शनाखाली लोककल्याण को.ऑप.क्रेडिट सोसायटीची स्थापना केली. माजी आम. सुभाष जोशी यांच्या सहकार्याने हालसिद्धनाथ कारखान्याच्या शासननियुक्त संचालक म्हणून त्यांची निवड झाली.त्यानंतर १९९५ सालच्या कारखाना निवडणुकीत ते अधिकृत संचालक निवडून आले. तसेच जनता दलातून ते जत्राट तालुका पंचायत सदस्य म्हणूनही निवडून आले. तसेच दिवंगत माजी आम. काकासाहेब पाटील यांच्याशी त्यांचा संपर्क आला.सन २०१३ साली आमदारकीच्या निवडणुकीमध्ये त्यांचा जोल्ले कुटुंबाशी संबंध वाढला.त्यानंतर आमदार शशिकला जोल्ले यांच्या काळापासून राजकीय, सामाजिक, धार्मिक कार्याला गती मिळाली.२०१९ साली अण्णासाहेब जोल्ले खासदार म्हणून निवडून आल्याने विकासाला आणखी चालना मिळाली. त्यांच्यावर २०२३ साली श्री हालसिध्दनाथ कारखान्याच्या अध्यक्षपदाची धुरा सोपविण्यात आली. तसेच एस. निजलिंगाप्पा शुगर इस्टिट्यूट बेळगाव या संस्थेच्या संचालकपदीही निवड झाली. अशा या निस्वार्थी व्यक्तिमत्वास वाढदिवसानिमित्त लाख..लाख शुभेच्छा!

**विठ्ठल केसरकर–निपाणी**

# व्यापारी दांपत्याची ७५ लाखांची फसवणूक

मिरज,ता.१३(प्रतिनिधी) –

**मिरजेतील व्यापारी दांपत्याची बेदाणे खरेदी करून त्यांची सुमारे ७५ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी सदर दांपत्याकडून पोलिसात फिर्याद देण्यात आली असून मिरजेतील महात्मा गांधी चौक पोलिसांनी पाटणा बिहार येथील व्यापाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सदर व्यापाऱ्याने बेदाने घेतल्याचे पैसे दिले नाहीत आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.**

केयूर गिरीश कुमार शहा (वय ४०, रा. सुंदर नगर मिरज) यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी मनोजकुमार यादव (वय ४८, रा. पाटणा, बिहार) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सुमारे ७५ लाख २८ हजार ३७७ रुपयांची फसवणूक झाल्याची नोंद पोलिसात झाली आहे. पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, मनोजकुमार यादव याने पुष्कर किराणा ट्रेडर्स मारूफगंज, पाटणा, बिहार या फर्म करिता फिर्यादी शहा यांच्या जी. एस. शहा अँड कंपनी या फर्मकडून १५ लाख २८ हजार ३९५ रुपये किमतीचा बेदाणा व शहा यांच्या पत्नी दृष्टी यांच्या ॲग्रोटेक फॉर्म कडून ५९ लाख ९९ हजार ९८२ रुपये किमतीचा बेदाणा खरेदी करून घेतला.

मात्र, व्यवहारातील रक्कम देण्यास टाळाटाळ करू लागला. सुमारे ७५ लाख २८ हजार ३७७ रुपयांची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर शहा यांनी पोलिसात धाव घेतली.

तसेच सदर मनोजकुमार यादव याने शहा यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. मिरजेतील महात्मा गांधी चौक पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास करीत आहेत.

# कार्यकाळ संपल्याने नामफलकावरील नगरसेवकांची नावे हटविली

## निपाणी पालिकेस पत्र मिळताच कार्यवाही

निपाणी,ता.१३(प्रतिनिधी)–

**येथील नगरपालिकेतील नगरसेवकांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याचे अधिकृत पत्र पालिकेस मिळाल्यानंतर शनिवारी पालिकेच्या नामफलकावरील नगरसेवकांची नावे हटवण्यात आली.**

नियमानुसार नगरपालिका सभागृहाचा कार्यकाळ ३१ ऑक्टोबर रोजी संपुष्टात आला होता.३१ ऑक्टोबरनंतर सदर फलकावरील नावे हटवली होती.मात्र, न्यायालयाने प्रशासक नेमणुकीस स्थगिती दिल्यामुळे पदाधिकाऱ्यांच्या पाट्या व नामफलक पुन्हा लावण्यात आले.

कार्यकाळ वाढवून देण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी धारवाड उच्च न्यायालयात धाव घेतली होती.पालिकेवर प्रशासक नेमू नये असा आदेश न्यायालयाने दिला होता.त्यानंतर याबाबत चार ते पाच वेळा न्यायालयात सुनावणी झाली होती.

कर्नाटकातील विविध पालिकांचा दावा एकत्रित करून त्यावर उच्च न्यायालयात सुनावणी झाली होती.मात्र नगरसेवकांचा कार्यकाळ संपल्याचे पत्र पालिकेस मिळाले असल्यामुळे पालिका अधिकाऱ्यांनी तात्काळ पालिकेच्या नामफलकावर असलेली नगरसेवकांची नावे हटवली.सध्या नामफलकावर आम. शशिकला जोल्ले व खास. प्रियंका जारकीहोळी ही दोनच नावे शिल्लक राहिली आहेत.

# टाकवडेत आजपासून सामूहिक पारायण

टाकवडे,ता.१३(प्रतिनिधी)–

टाकवडे (ता. शिरोळ) येथे **श्रावण पायी दिंडी सोहळ्यातर्फे चैतन्य सद्गुरू हभप तात्यासाहेब वासकर महाराज यांच्या आशीर्वादाने हभप गजानन भगत महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली १४ ते मंगळवार १६ अखेर सामूहिक पारायण व अखंड हरिनाम जागर श्री करवीर देवालयाच्या हॉलमध्ये आयोजिला आहे.**

रविवारी १४ रोजी सकाळी आठ वाजता पंचायत समितीचे माजी सभापती प्रकाश पाटील टाकवडेकर यांच्या हस्ते विणापूजन, लोकनियुक्त सरपंच सविता चौगुले यांच्या हस्ते ध्वज पूजन, पंचायत समिती माजी सदस्या अर्चना चौगुले यांच्या हस्ते ग्रंथ पूजन, आप्पासो पाटील व यशवंत पाटील,दिलीप सुतार यांच्या हस्ते कलश पूजन होणार आहे.

# चिक्कोडी जिल्ह्यासाठी सहाव्या दिवशीही आंदोलन सुरूच

## शिवप्रसाद स्वामींचा सहभाग; बसव सर्कलमध्ये रास्ता रोको

चिक्कोडी,ता.१३(प्रतिनिधी)–

**स्वतंत्र चिक्कोडी जिल्ह्याच्या मागणीसाठी सहाव्या दिवशीही आंदोलन सुरू राहिले.या आंदोलनाला चिंचणी येथील शिवप्रसाद स्वामी व ग्रामस्थांनी पाठिंबा दिला. बसव सर्कलमध्ये रास्ता रोको करून मानवी साखळी उभारत चिक्कोडीला जिल्ह्याचा दर्जा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.या आंदोलनात सीएलई संस्थेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आंदोलनानंतर तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांच्या नावे निवेदन देण्यात आले.**



**चिक्कोडी जिल्ह्याच्या मागणीसाठी आंदोलनात सहभागी झालेले शिवप्रसाद स्वामी, संजू बडिगेर, चंद्रकांत हुक्केरी, चंद्रशेखर आरभावी व ग्रामस्थ.**

शिवप्रसाद स्वामी म्हणाले, अल्लमप्रभू स्वामी यांनी चिक्कोडी जिल्ह्यासाठी उभारलेला लढा आजही सुरू आहे. चिक्कोडीत बहुतांश शासकीय कार्यालये कार्यरत असून, आणखी काही कार्यालये सुरू झाल्यास चिक्कोडी जिल्हा होण्यासाठी पूर्णतः पात्र ठरेल. त्यामुळे सरकारने तात्काळ चिक्कोडी जिल्हा घोषित करावा.गेल्या तीस वर्षांपासून जिल्हा न झाल्यामुळे या भागातील जनतेला विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. चालू अधिवेशनात चिक्कोडी जिल्ह्याची घोषणा न झाल्यास श्रीमठ व असंख्य भक्तांसह तीव्र आंदोलन छेडले जाईल.

चंद्रकांत हुक्केरी म्हणाले, केवळ विनंती करून सरकार जिल्ह्याची निर्मिती करणार नाही. यासाठी आमदार गणेश हुक्केरी यांनी विधानसभेत ठाम भूमिका घेऊन संघर्ष करावा.यावेळी बाळगौडा पाटील, बसवराज पाटील, बाबासाहेब पाटील, अनिल पाटील,लक्ष्मण डांगेर, अक्षय पाटील, सौरभ पाटील, बाबासाहेब निंगणवर, बाबू निलजगे, शिवानंद व दीपक मूदप्पगोल, शंकर संगोटे, बस्सू काळप्पगोल, मलगौडा रामलिंग, दादा काळप्पगोल, शेखर कुंभार, काशीनाथ पुजारी, सुरेश मळवाडे, पुंडलिक कुंभार, सुनील किल्लेदार, संतोष सनदी, शशिकांत मलापूरे, भीमराव खंचनाळे, अणण्पा कबाडगे, संतोष चिक्कोडे, राजू बेनाडे, शिवानंद पुजारी, मिथुन अंकली, लक्ष्मण बाळीकाई यांच्यासह शेकडो आंदोलनकर्ते उपस्थित होते.

# कराडच्या उड्डाणपुलाचे काम तीन वर्षांपासून संथगतीने

## आम.अतुल भोसले यांची लक्षवेधी

कराड,ता.१३(प्रतिनिधी)–

**नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात भाजपाचे जिल्हाध्यक्ष तथा कराड दक्षिणचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी पुणे ते बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वरील कराड परिसरातील रखडलेल्या सहापदरीकरणाच्या कामाबाबत विधानसभेत लक्षवेधी मांडत शासनाचे लक्ष वेधले.**

आमदार डॉ. भोसले यांनी सांगितले की, पुणे–बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील सहापदरीकरणाचे काम अनेक दिवसांपासून सुरू आहे. मात्र, कराड येथील पंकज हॉटेलपासून नांदलापूरपर्यंतच्या उड्डाणपुलाचे काम गेल्या तीन वर्षांपासून अत्यंत संथ गतीने सुरू आहे. या अर्धवट अवस्थेतील पुलामुळे आतापर्यंत १०० हून अधिक अपघातांची नोंद झाली असून, त्यामध्ये सुमारे ५४ नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे हा महामार्ग अक्षरशः अपघातांचा सापळा ठरत असल्याची गंभीर बाब त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.

आमदार डॉ. भोसले यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना थेट प्रश्न विचारला की, या उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्याची नेमकी डेडलाईन काय आहे? यापूर्वी सभागृहात ऑक्टोबरपर्यंत काम पूर्ण होईल, असे सांगण्यात आले होते. मात्र अद्यापही पुलाचे काम अपूर्ण आहे.

यावर उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले की, सातारा–कागल या राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांच्या माध्यमातून सुरू असून, सध्या ते प्रगतीपथावर आहे. काही ठेकेदारांकडून दिरंगाई झाली असल्याचे मान्य करत, या संदर्भात केंद्र सरकारशी आधीच पत्रव्यवहार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

कराड येथील मोठ्या उड्डाणपुलाचे काम सध्या ८३ टक्के पूर्ण झाले असून, उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी सभागृहात दिले.

# २५ लाखांच्या विकासकामांचा शुभारंभ

कोल्हापूर, ता.१३ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील शिवाजी विद्यापीठ, तपोवन राजलक्ष्मी नगर या प्रभागांमध्ये २५ लाखांच्या विविध विकासकामांचा शुभारंभ माजी आमदार ऋतुराज पाटील यांच्या हस्ते झाला.**

खासदार इम्रान प्रतापगढी यांच्या निधीतून शिवाजी विद्यापीठ प्रभागातील प्रगती हौसिंग सोसायटी येथे ओपन स्पेसला कंपाऊंड बांधणे, तसेच तपोवन प्रभागातील सोमराज कॉम्प्लेक्स येथील ओपन स्पेसमध्ये विरंगुळा केंद्र बांधण्यासाठी प्रत्येकी १० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्याचबरोबर राजलक्ष्मीनगर प्रभागातील वसंतराव सरनाईक पार्क येथील अंतर्गत गटर्स करण्यासाठी महापालिकेकडून ५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. यावेळी काँग्रेस शहराध्यक्ष सचिन चव्हाण, माजी नगरसेवक प्रवीण केसरकर, शोभा कवाळे, मधुकर रामाणे, दिपा मगदूम, दुर्वास कदम यांच्यासह सुयोग मगदूम, दिग्विजय मगदूम, सचिन शेंडे, सचिन काटकर, अशोक मुसळे, ॲड. सुनील धुमाळ, दत्तात्रय बामणे, डॉ. पाटील, आनंदराव साळोखे, सुजित नाईक, जयदीप सरनाईक, अनिल शिंदे, प्रदीप नलवडे, अमित कवाळे, इम्तियाज नाईकवडे, अशोक भोसले, विनायक पोवार, किशोर जाधव, सुभाष नाईक आदी उपस्थित होते.

# मुस्लिम समाजाच्या विकासासाठी सवलती द्याव्यात : शब्बीर अन्सारी

टाकवडे,ता.१३ (प्रतिनिधी)–

**मुस्लिम समाज आर्थिक, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागास आहे. या समाजाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी विशेष सवलती मिळायला हव्यात, असे प्रतिपादन ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी शब्बीर अहमद अन्सारी यांनी केले.**



टाकवडे (ता.शिरोळ) येथे ओबीसी ऑर्गनायझेशनच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मान सोहळा झाला.अध्यक्षस्थानी लोकनियुक्त सरपंच सविता चौगुले होत्या. अन्सारी पुढे म्हणाले, सर्वांच्या सहकाऱ्यांने मुस्लिम ओबीसी संघटनेला बळ मिळाले आहे.मुस्लिम समाजातील मुलांना अनेक सवलतींपासून वंचित राहावे लागत आहे. समाजाला जे संघर्षामुळेच प्राप्त झाले आहेत. मुस्लिम ओबीसी संघटना ही राजकीय संघटना नसून सामाजिक संघटना आहे. चळवळ टिकणे गरजेचे आहे. घटनेने जे आपल्याला अधिकार दिले आहेत ते अधिकार आपल्याला मिळवून देण्यासाठी मुस्लिम ओबीसी संघटना काम करत आहे. हिंदू– मुस्लिम आम्ही सगळेजण एकच आहोत. त्यांना एकत्र आणण्याचे काम ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशन होत नसल्याने सर्व समाजाचे नुकसान होत आहे.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी ग्रा. पं. सदस्य अमोल चौगुले,नूतन जिल्हा अध्यक्ष जमाल फकीर, तालुका अध्यक्ष सरदार जमादार, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. एम.जी बागवान, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष बशीर फकीर, जिल्हा उपाध्यक्ष मियाखान मोकाशी, युनुस हासुरे, जिल्हा कार्याध्यक्ष मुन्नाभाई नदाफ, जिल्हा सरचिटणीस अन्सार पटेल, जिल्हा उपाध्यक्ष आलम मुल्लाणी, जिल्हा प्रांत अध्यक्ष लाला मांजरेकर, तालुका उपाध्यक्ष दिलावर दानवाडे, तालुका सचिव अब्बास मुजावर, तालुका उपाध्यक्ष काशीम मुल्ला, तालुका संघटक अजित दानवाडे, अरमान मुजावर, रुस्तम मोकाशी, समीर फकीर, समाज अध्यक्ष जावेद शेख, जॉइंट सेक्रेटरी रमजान नदाफ (शिरढोण), दाऊद मुल्लाणी, महिला जिल्हा अध्यक्षा रेश्मा चिलू, जिल्हा उपाध्यक्ष शमा खलीफा, तालुका अध्यक्ष नौशादबी मुजावर, तालुका उपाध्यक्ष शानम इनामदार, तालुका सचिव जिनत मुजावर, संघटनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

# मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी घेतले जोतिबाचे दर्शन

जोतिबा,ता.१३ (वार्ताहर)–

**केंद्रीय वहातुक मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी श्री.क्षेत्र जोतिबा डोंगरला सदिच्छा भेट देऊन पारंपारिक पध्दतीन कुलदैवत श्री.जोतिबा देवाचे दर्शन घेतले.जोतिबा मंदिरात आगमन होताच त्यांचे सनई चौगडा वाजवून राजेशाही थाटात स्वागत करण्यात आले.**



श्री क्षेत्र जोतिबा डोंगरावर शनिवारी सायकाळी ७ वाजता केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांचे आगमन झाले. सनई चौगडा वाजवून त्यांचे पारंपारिक पद्धतीने राजेशाही थाटात स्वागत करण्यात आले. श्री .जोतिबा मंदिर प्रवेशव्दारावर महिलांनी पंचारती ओवाळून औक्षण केले .जोतिबा समस्त पुजारी समाजाच्यावतिने त्यांचा श्रीफळ ,फेटा शाल श्री जोतिबाची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला .ग्वाल्हेर सिंधिया संस्थान आणि मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी दर्शनाच्या आपल्या पारंपारिक पद्धतीने प्रथम नंदी देवाच्या दर्शना पासुन प्रारंभ केला.या नंतर त्यांनी श्री .महादेव श्री.चोपड़ाई श्री .जोतिबा श्री .काळभैरव ,श्री .दत्त, श्री .यमाई देवीचे दर्शन घेतले .या वेळी देवस्थान सचिव शिवराज नायकवडी,देवस्थान समितीचे माजी अध्यक्ष महेश जाधव, प्रांताधिकारी समीर शिंगटे ,पन्हाळा तहसिलदार माधवी शिंदे ,जोतिबा मंदिर कार्यालयाचे प्रभारी धैर्यशील तिवले ,सिंधिया ट्रस्ट कार्यालयाचे प्रभारी अजित झूगर समस्त सिंधिया घराण्याचे वंश परंपराचे मिटके पुजारी ,ग्रामस्थ उपस्थित होते.

# पत्नीला मारहाण : पतीविरूध्द गुन्हा दाखल

मिरज,ता.१३(प्रतिनिधी) –

**मिरज तालुक्यातील बेडग येथे दारू पिऊन पतीने पत्नीस ऊस तोडण्याच्या कोयत्याने उलट्या बाजूने मारहाण केली. तसेच पत्नीने विषारी औषधाची बाटली नाका जवळ धरल्याने त्या बेशुद्ध झाल्या. यामुळे त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.**

या घटनेची नोंद मिरज ग्रामीण पोलिसात झाली आहे. पोलिसांनी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या सदर विवाहित महिलेचा जबाब घेतला असून त्याद्वारे पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. बेडग येथील कंगुने मळा येथे ही घटना घडली आहे. सुषमा गुरुलिंग कंगुने (वय ३२, रा. बेडग) यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी गुरुलिंग भीमराव कंगुने (रा. बेडग) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# भारतासमोर कमबॅक करण्याचे आव्हान

धर्मशाला,ता.१३–

**भारत विरूध्द दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या टी २० सामना १४ डिसेंबरला धर्मशाला येथील स्टेडियममध्ये होणार आहे. टीम इंडियासमोर कमबॅक करण्याचे आव्हान असणार आहे. उभयसंघातील ५ सामन्यांची मालिका ही १–१ ने बरोबरीत आहे. टीम इंडियाने या मालिकेत विजयाने सुरुवात केली. मात्र, दुसऱ्या सामन्यात टीम इंडियाच्या गोलंदाज आणि फलंदाजांनी सुमार कामगिरी केली. त्यामुळे टीम इंडियाला पराभूत व्हावे लागले. त्यामुळे आता मालिकेच्या दृष्टीने तिसरा सामना हा अत्यंत निर्णायक असा ठरणार आहे.**



तिसरा सामना जिंकणाऱ्या संघाला मालिका विजयासाठी उर्वरित २ पैकी १ सामना जिंकावा लागणार आहे. मात्र, तिसऱ्या सामन्यात पराभूत होणाऱ्या संघाला मालिका जिंकण्यासाठी उर्वरित दोन्ही सामने जिंकावे लागतील. त्यामुळे दोन्ही संघांमध्ये या सामन्यात चांगलीच खडाजंगी पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

उभयसंघातील तिसरा टी २० सामना १४ डिसेंबरला धर्मशाला येथील स्टेडियममध्ये होणार आहे. दुसऱ्या सामन्यातील पराभवानंतर कॅप्टन सूर्यकुमार यादव प्लेइंग ईलेव्हनमध्ये बदल करणार असल्याचे जवळपास निश्चित म्हटले जात आहे. त्यामुळे आता सूर्या कुणाला डच्चू देणार? याकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष असणार आहे.

टीम इंडियाचा उपकर्णधार शुबमन गिल पहिल्या २ सामन्यात ठार अपयशी ठरला. त्यानंतरही शुबमनला संधी मिळणार असल्याचे निश्चित समजले जात आहे. तसे झाल्यास पुन्हा एकदा अभिषेक शर्मा आणि शुबमन हे दोघे ओपनिंगला येतील.

दुसऱ्या सामन्यात बॅटिंग ऑर्डरमध्ये केलेले अनावश्यक बदल हे टीम इंडियाच्या पराभवाचे प्रमुख कारण ठरले. अक्षर पटेल तिसऱ्या, सूर्यकुमार यादव चौथ्या तिलक वर्मा पाचव्या आणि शिवम दुबे थेट आठव्या स्थानी बॅटिंगला आले. त्यानंतर आता टीम मॅनेजमेंट तिसऱ्या टी २० सामन्यात चूक दुरुस्त करतील, अशी आशा चाहत्यांना आहे.कॅप्टन सूर्यकुमार त्याच्या हक्काच्या आणि नेहमीच्या तिसऱ्या स्थानी बॅटिंगसाठी येऊ शकतो. तिलक वर्मा याला चौथ्या स्थानी बॅटिंगची संधी मिळू शकते. तिलकने दुसऱ्या सामन्यात सर्वाधिक ६२ धावा केल्या होत्या.ऑलराउंडर हार्दिक पंड्या याला पाचव्या स्थानी बॅटिंगची संधी मिळू शकते. जितेश शर्मा सहाव्या स्थानी येऊ शकतो. याचाच अर्थ असा की संजूला तिसऱ्या सामन्यातही संधी मिळण्याची शक्यता फार कमी आहे. तसेच अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंह आणि जसप्रीत बुमराह हे प्लेइंग ईलेव्हनमध्ये कायम असतील.

**शिवम दुबे याला डच्चू?**

मुंबईकर ऑलराउंडर शिवम दुबे याला बॅटिंग आणि बॉलिंगने काही खास करता आलेले नाही. त्यामुळे शिवमच्या जागी कुलदीप यादव याचा समावेश केला जाऊ शकतो.तिसऱ्या टी २० मॅचसाठी

**टीम इंडियाची प्लेइंग ईलेव्हन :** अभिषेक शर्मा, शुबमन गिल, सूर्यकुमार यादव (कर्णधार), तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, जितेश शर्मा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंह आणि जसप्रीत बुमराह.

# कोलकातामधील मेस्सीच्या कार्यक्रमात राडा

## थेट आयोजकांना बेड्या ठोकल्या; प्रेक्षकांचे पैसे सुद्धा परत करणार!



कोलकाता,ता.१३–

**साल्ट लेक स्टेडियमवर झालेल्या लिओनेल मेस्सीच्या फुटबॉल कॉन्सर्टचे मुख्य आयोजक सताद्रु दत्ता यांना पोलिसांनी अटक केली आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात राडा झाल्यानंतर, अर्जेंटिनाचा विश्वचषक विजेता कर्णधार लिओनेल मेस्सीला कार्यक्रमाचे ठिकाण सोडून लवकर परतण्यास भाग पाडल्यानंतर पोलिसांनी हे पाऊल उचलले आहे.**

कार्यक्रमाच्या गैरव्यवस्थापनाच्या आरोपाखाली दत्ता यांना कोलकाता विमानतळावर अटक करण्यात आली, जिथे ते मेस्सी आणि इतरांना हैदराबादला जाण्यासाठी निरोप देण्यासाठी गेले होते. पश्चिम बंगालचे पोलिस महासंचालक (डीजीपी) राजीव कुमार यांनी जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाईचे आश्वासन दिले. या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल. प्रेक्षकांना त्यांचे तिकीट परत मिळावेत असेही त्यांनी सांगितले.

**स्टेडियममध्ये गोंधळ का?**

संपूर्ण कोलकाता मेस्सीच्या स्वागतात मग्न होता. पण जसजसा दिवस पुढे सरकत गेला तसतसे परिस्थिती बदलत गेली. साल्ट लेक स्टेडियमवर अभूतपूर्व गोंधळ उडाला. तिकिटे खरेदी करण्यासाठी हजारो रुपये खर्च करूनही, अनेक चाहते त्यांच्या आवडत्या खेळाडूला पाहू शकले नाहीत. मेस्सी देखील नियोजित वेळेपूर्वी मैदान सोडून गेला. यामुळे मेस्सीच्या चाहत्यांचा संताप वाढला आणि स्टेडियम युद्धभूमी बनले. बाटल्या फेकण्यात आल्या,





खुर्च्या फेकण्यात आल्या आणि शेकडो लोक कुंपण तोडून मैदानात घुसले. स्टेडियमला आगही लावली. पोलिसांनी लाठीमार केला, पण परिस्थिती नियंत्रणात आली नाही. सुरक्षा कर्मचारी असहाय्य दिसत होते. अखेर मुख्य आयोजक सतद्रु दत्ता यांना अटक केल्याने चाहत्यांचा राग काहीसा कमी झाला आहे.

**पोलिस महासंचालकांची पत्रकार परिषद**

या घटनेनंतर राज्य पोलिस महासंचालक राजीव कुमार यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यांच्यासोबत एडीजी कायदा आणि सुव्यवस्था जावेद शमीम होते. राजीव कुमार म्हणाले की ,सरकारने चौकशीसाठी एक समिती स्थापन केली आहे आणि आयोजकांकडून लेखी उत्तर मागितले आहे. त्यांनी विकलेल्या तिकिटांचे पैसे परत करावेत, अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल. मेस्सी पाहता न आल्याने संतापाची लाट पसरली. मुख्य आयोजकाला ताब्यात घेण्यात आले आहे; कोणालाही सोडले जाणार नाही. जावेद शमीम म्हणाले की, एफआयआर दाखल केला जात आहे. आयोजकाला ताब्यात घेण्यात आले आहे. त्यानुसार कायदेशीर कारवाई केली जाईल. त्यांनी पुढे सांगितले की, तपासानंतरच दोषी निश्चित केले जातील, ज्याला थोडा वेळ लागेल. फसवणूक झालेल्या आणि संतप्त झालेल्या मेस्सी चाहत्यांच्या चिंता दूर केल्या जात आहेत.

**ममतांनी मेस्सीची माफी मागितली**

दरम्यान, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कोलकाता येथे झालेल्या फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या कार्यक्रमातील गैरव्यवस्थापनाबद्दल नाराजी व्यक्त केली. या घटनेची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा केली. ममता बॅनर्जी म्हणाल्या की, त्या साल्ट लेक स्टेडियमवर मेस्सीच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी जात होत्या, जिथे हजारो चाहते प्रसिद्ध फुटबॉलपटूची एक झलक पाहण्यासाठी जमले होते. एक्स वरील एका पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, 'या दुर्दैवी घटनेबद्दल मी लिओनेल मेस्सी, त्यांचे चाहते आणि सर्व क्रीडाप्रेमींची नम्रपणे माफी मागते.'

**तपास समिती स्थापन**

ममता बॅनर्जी म्हणाल्या की, त्या न्यायमूर्ती (निवृत्त) असीम कुमार रे यांच्या नेतृत्वाखाली एक चौकशी समिती स्थापन करत आहेत. गृह विभागाचे मुख्य सचिव आणि पर्वतीय व्यवहार विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव या समितीचे सदस्य असतील. समिती या घटनेची सविस्तर चौकशी करेल, जबाबदारी निश्चित करेल आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना सुचवेल. ममता म्हणाल्या, 'पुन्हा एकदा, मी सर्व क्रीडाप्रेमींची मनापासून माफी मागते.'



राजू बोंद्रे यांचा वाढदिवस विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी विविध विकास कामांचे उद्घाटन करताना आम.राहूल आवाडे, आयुक्त पल्लवी पाटील यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# राजू बोंद्रे यांचा वाढदिवस विविध कार्यक्रमांनी साजरा

इचलकरंजी,ता.१३–

**प्रभाग क्रमांक ११ चे माजी नगरसेवक राजू बोंद्रे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभागात विविध विकासकामांचे उद्घाटन उत्साहात पार पडले. हनुमान नगर परिसरात नानानानी पार्क, वॉकिंग ट्रॅक, लहान मुलांसाठी खेळण्यांची बाग तसेच युवकांसाठी सुसज्ज व्यायामशाळेचे लोकार्पण करण्यात आले. याचबरोबर महिला भगिनींसाठी होम मिनिस्टर कार्यक्रम व पैठणीची मेजवानी असा संयुक्त सामाजिक कार्यक्रमही यावेळी संपन्न झाला.**

या प्रसंगी आमदार राहुल आवाडे म्हणाले की, प्रभागाचा सर्वांगीण विकास हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून सातत्याने काम करणारा, जनतेचा सच्चा मित्र आणि कैवारी म्हणजे राजू बोंद्रे आहेत.असे प्रतिपादन केले.तसेच आयुक्त पल्लवी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाला प्रभागातील नागरिक, महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजू बोंद्रे यांना शुभेच्छा देण्यासाठी माजी पाणी पुरवठा सभापती विठ्ठल चोपडे,दीपक सुर्वे, मनोज साळुंखे,हुपरीचे मंगलसिंग मालगे, बंडू मुळीक,नितेश पवार,इम्रान मकानदार,नागेश पाटील, महेश पाटील, सचिन लायकर, प्रशांत पांढरपट्टे, सचिन मासाळ, शंतनु पवार, राहुल पाटील, ललिता पुजारी, बसवेश्वर डोईझड, राजीव कोंनूर, सदा मलाबादे,आदिंनी भेटून शुभेच्छा दिल्या.तसेच फोनवरून माजी मंत्री प्रकाश आवाडे, जनता बँक चेअरमन स्वप्नील आवाडे, पी.आय. श्री.लोहार , पी.आय.सचिन पाटील, पी.आय.महेश चव्हाण आदिंनी शुभेच्छा दिल्या.सदर कार्यक्रमासाठी सौ.श्वेता राजू बोंद्रे व परिसरातील महिला व नागरिकांनी परिश्रम घेतले.

# विट्यातील रिंग रोडसह अन्य प्रस्तावांबाबत कार्यवाहीचे आदेश

## नागपुरात आ. सुहास बाबर यांनी घेतली केंद्रीय मंत्री गडकरींची भेट

विटा,ता.१३(प्रतिनिधी)–

**नागपूर येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांची आ. सुहास बाबर यांनी भेट घेऊन मतदारसंघातील तसेच सांगली जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या विकासकामांबाबत निवेदन दिले. या निवेदनाची दखल घेत मंत्री नितीन गडकरी यांनी विटा शहरातील रिंग रोड सह अन्य प्रस्तावांबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले.**

या भेटीत आ.बाबर यांनी विटा शहर तसेच आसपासच्या ग्रामीण व शहरी भागातील वाहतूक कोंडी, अपघातांचे वाढते प्रमाण तसेच औद्योगिक- शेतीमाल वाहतुकीस होणाऱ्या अडचणी यांचा सविस्तर आढावा केंद्रीय मंत्री गडकरी यांच्यासमोर मांडला. यावर गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सर्व मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.



नागपूर येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन निवेदन देताना आ. सुहास बाबर.

या भेटीत आ. सुहास बाबर यांना, विटा शहरासाठी रिंग रोड उभारणी करावी, जेणेकरून शहरातील वाहतूक कोंडी कमी होईल तसेच व्यापारी व नागरिकांना दिलासा मिळेल. गुहागर-विजापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ अंतर्गत येणाऱ्या रेणावी,रेवणगाव,सुलतान,गादेहिवरे हद्दीतील रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून सदर ठिकाणी रस्ता धोकादायक झाला असून त्या ठिकाणचे काम तातडीने सुरू करावे. हा रस्ता दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. अहमदनगर-बारामती-फलटण-विटा-तासगाव-म्हैसाळ राष्ट्रीय महामार्ग क्र. १६० मधील फलटण ते विटा या रस्त्याचे काम चालू असून त्यापुढील विटा ते म्हैसाळ या लांबीतील रस्त्याचे चौपदरीकरणासह मंजुरी देऊन काम लवकरात लवकर सुरू करावे तसेच कवठेमहांकाळ-शेटफळे-आटपाडी-दिघंची-म्हसवड-फलटण हा नवीन राष्ट्रीय महामार्ग घोषित करून त्यास मंजुरी देण्यात यावी, जेणेकरून या दुष्काळी भागाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल.या सर्व मागण्यांची दखल घेत मंत्री गडकरी यांनी संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना तात्काळ अहवाल सादर करून आवश्यक ती प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

# बालगोपालने जुना बुधवारला रोखले; उत्तरेश्वरची विजयी हॅट्ट्रिक

कोल्हापूर, ता.१३(प्रतिनिधी)–

**जुना बुधवारच्या थुलूँगा ब्रम्हा याने उत्तरार्धात संघाला आघाडी मिळवून दिली. या गोलच्या जोरावर जुना बुधवार सामना जिंकेल अशी शक्यता असताना बालगोपालला कॉर्नर किक मिळाली. सामना संपण्यास काहीसा अवधी असताना प्रणव गायकवाडने मारलेल्या कॉर्नर किकवर विश्वविजय घोरपडेने हेडव्दारा गोल नोंदवून सामन्यात १-१ अशी बरोबरी साधली. बालगोपालसाठी हा गोल महत्वपूर्ण ठरला.**



टर्निंग पॉइंट ठरलेल्या या गोलमुळे जुना बुधवारचा विजय हुकला तर बालगोपालने सामना बरोबरीत राखून एक गुण प्राप्त करून संघाचे खाते उघडले. तर उत्तरेश्वर प्रासादिक वाघाची तालीम मंडळने स्वयंगोलमुळे सुभाषनगर फुटबॉल क्लबवर मात करून विजयी हॅटट्रिक साधली.

दरम्यान, रविवार आणि सोमवारी स्पर्धेतील सामन्यांना सुट्टी आहे. मंगळवारी (दि.१६) दुपारी चार वाजता शिवाजी तरुण मंडळ विरूध्द वेताळमाळ तालीम मंडळ हा सामना होईल.

कोल्हापूर स्पोर्ट्स असोसिएशन आयोजित शाहू छत्रपती केएसए लीग स्पर्धा छत्रपती शाहू स्टेडियमवर सुरू आहे. शनिवारी जुना बुधवार आणि बालगोपाल संघादरम्यान झालेल्या सामन्यात पूर्वार्धात गोलफलक कोराच राहिला. जुना बुधवारच्या रविराज भोसले, सचिन मोरे, प्रसाद सरनाईक, प्रथमेश जाधव, शुभम जाधव यांनी खोलवर चढाया केल्या पण त्यांना यश मिळाले नाही. बालगोपालकडून अभिनव साळोखे, सुजित राजगोपालन, विश्वविजय घोरपडे, देवराज मंडलिक, प्रणव गायकवाड यांनी गोलची आघाडी घेण्यासाठी केलेल्या चढाया समन्वयाअभावी वाया गेल्या. दोन्ही संघाकडून वेगवान खेळ झाला पण गोलची नोंद झाली नाही.

उत्तरार्धात गोलची आघाडी घेण्यासाठी दोन्ही संघाकडून खोलवर चढाया झाल्या. जुना बुधवारच्या एका चढाईत गोलक्षेत्रात उडालेल्या गोंधळाचा फायदा थुलूँगा ब्रम्हाने गोल नोंदवून संघाला आघाडीवर नेले. ६२व्या मिनिटाला १-० ची आघाडी मिळाली. अखेर याच गोलफरकावर सामन्याचा निकाल लागेल असे असतानाच, बालगोपालला कॉर्नर किक मिळाली. प्रणव गायकवाडने मारलेल्या फटक्यावर गोलक्षेत्रात असलेल्या विश्वविजय घोरपडेने हेडव्दारा चेंडूला थेट गोलजाळ्याची दिशा दाखवली. जादा वेळेत झालेल्या या गोलमुळे सामना बरोबरीत राहिला. बालगोपालसाठी हा गोल महत्वपूर्ण ठरला तर जुना बुधवारचा विजय थोडक्यात हुकला. दरम्यान, सामन्यात अखिलाडूवृत्तीबद्दल जुना बुधवारचा खेळाडू शुभम जाधव याला दोनदा यलो कार्ड मिळाले. त्यामुळे त्याला मुख्यपंचानी रेडकार्ड दाखवत मैदानाबाहेर घालवले.

**उत्तरेश्वरची विजयी हॅटट्रिक...**

दुपारच्या सत्रातील पहिल्या सामना उत्तरेश्वर आणि सुभाषनगर संघादरम्यान झाला. पूर्वार्धात दोन्ही संघाकडून वेगवान खेळ झाला पण गोलची कोंडी फुटली नाही. उत्तरार्धात सुभाषनगरकडून स्वयंगोल झाला. रोहन गाडेकर या खेळाडूकडून ६५व्या मिनिटाला हा गोल झाला. या स्वयंगोलच्या आघाडीमुळे उत्तरेश्वरला आपसूकच १-०ची आघाडी मिळाली. हिच आघाडी कायम राखत उत्तरेश्वरने सलग तिसऱ्या विजयाला गवसणी घातली.

# निपाणीत ७ जानेवारीपासून क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

निपाणी,ता.१३ (प्रतिनिधी)–

**येथील रोहन साळवे फौंडेशनतर्फे यंदाही डे –नाईट क्रिकेटचा थरार रंगणार आहे. ७ ते ११ जानेवारी दरम्यान या स्पर्धा होतील. युवा खेळाडूंना वाव देण्याच्या उद्देशाने मालक चषक निपाणी शहर वॉर्ड वॉईज क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे,अशी माहिती उद्योजक रोहन साळवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

संयोजन समितीचे समन्वयक अंजुम उर्फ अनिल भोसले म्हणाले, ७ जानेवारीपासून म्युनिसिपल हायस्कूलच्या मैदानावर टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा भरवण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी ५१ हजार, ३१ हजार ११ हजार अशी अनुक्रमे बक्षिसांसह आकर्षक चषक, सन्मान चिन्ह देण्यात येणार आहे. मालिकावीरसाठी ५००० रू., सामनावीरसाठी २५०० रू., उत्कृष्ट फलंदाजसाठी २५०० रू, उत्कृष्ट गोलंदाजसाठी २५०० रू. अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धेकरीता २.५ लाखांहून अधिक बक्षिसे देण्यात येणार आहेत. सहभागी संघांना स्मृति चिन्ह, रंगीत टी-शर्ट देण्यात येणार आहे. स्पर्धा सायंकाळी ५ वाजलेपासून रात्री ११ वाजेपर्यंत खेळविण्यात येणार आहेत.

स्पर्धा ६ षटकांच्या असतील.यावेळी अस्लम शिकलगार, दिपक सावंत, रघुनाथ नाईकवाडे, बबलू मांगोरे, संतोष कांबळे, राजू नाईक, सुनील हिरुगडे, अरविंद पारळे, दादासो हाळवणकर,ओंकार बोंगार्डे, चेतन पांगिरे उपस्थित होते.

## क्रीडा सप्ताहास उत्साहात प्रारंभ

कोल्हापूर, ता. १३ (प्रतिनिधी)–

**जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने १६ ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.**

१३ रोजी महाराष्ट्र हायस्कूल येथे विविध क्रीडा स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला. १४ रोजी नंदिनी जाधव नगर, कळंबा येथे 'जॉय स्ट्रीट' कार्यक्रम, तर दि. १५ रोजी हलकर्णी, ता. चंदगड येथे प्रदर्शनीय क्रीडा सामने आयोजित करण्यात येणार आहेत. दि. १६ रोजी छत्रपती संभाजी महाराज विभागीय क्रीडा संकुल, कोल्हापूर येथे 'स्पोर्ट्स सायन्स लॅब'चा परिचय व चर्चासत्र होणार असून दि. १७ डिसेंबर रोजी आजरा येथे आठवणीतील व पारंपरिक खेळांची प्रात्यक्षिके सादर केली जाणार आहेत. दि. १८ डिसेंबर रोजी महाराष्ट्र हायस्कूल, कोल्हापूर येथे प्राविण्यप्राप्त खेळाडूंचा सत्कार, क्रीडा सप्ताहाचा समारोप होणार आहे.